








# माझे अमेरिकाटन

## डॉ. अरविंद वैद्य






# माझे अमेरिकाटन

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# माझे अमेरिकाटन

लेखक

## डॉ. अरविंद वैद्य

# माझे अमेरिकाटन

## लेखक... डॉ. अरविंद वैद्य

पत्ता-.सहकारनगर -२, पुणे
M: ९४२०१७५८०३
arvind.vaidya51@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ३० ऑक्टोबर २०२० (कोजागिरी)**



©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मी डॉ. अरविंद भालचंद्र वैद्य (वय वर्ष ६९ )**



बालपणापासून महाराष्ट्राची सांस्कृतिक नगरी असलेले पुणे. येथेच माझे शालेय शिक्षण श्री शिवाजी मराठा हायस्कुल या बहुजनांचे शाळेत व पुढे फर्ग्युसन कॉलेज पर्यंतचे शिक्षण झाले. शनिवारड्याच्या साक्षीने आचार्य प्र.के.अत्रे , पु. ल. देशपांडे, शिवाजीराव भोसले, यांच्या अमोघ अश्या वक्तृत्वाने व द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्या कथाकथन कार्यक्रमाने बालपण समृद्ध केले. तसेच येथील वसन्त व्याख्यानमाला मधील व्याख्यानांनी ज्ञानाचे भांडार खुले केले असे पुणे. गणपतीउत्सवात अरुण दाते, गजानन वाटवे, बबनराव नावडीकर, यांचे गायन व सुधीर फडके यांचे गीत रामायण याने कर्ण तृप्त केले.

वैद्य- नावाला जागण्यासाठी अहमदनगरच्या कै.गं.शा.गुणे आयुर्वेद कॉलेजमधून बी.ए.एम.अँड-एस. वैद्यकीय पदवीधर (डॉक्टर) झालो. पुढे पुणे महानगर पालिकेच्या आरोग्यविभागात सलग २४ वर्ष वैद्यकीय अधिकारी ते क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी पदावर

कार्यरत राहून पुणेकरांना आरोग्य सेवा दिली. अन २००९ साली निवृत्त झालो.

पेन्शन रुपी आर्थिक ठिबक सिंचन सुरु झाल्याने चिंता अशी नव्हतीच. मंदार -मिलिंद या दोन्ही मुलांनी त्यांचे स्वअध्ययनाचे बळावर इंग्लंड -अमेरिका येथे शिक्षण व आय. टी.क्षेत्रात यशस्वी पणे आपला पाय रोवला. त्यामुळेच आम्हालाही आमच्या पासपोर्टवर त्या त्या देशांच्या व्हिसाचा ठसा सहजपणे मिळाला.

२००७ पासून सुरू झालेले परदेश पर्यटन इंग्लंड -अमेरिका - युरोप-कॅनडा -श्रीलंका - दुबई -या देशांच्या प्रदक्षिणेने २०२० साली चंचू प्रवेश केलेल्या ‘‘कोरोना ‘‘मुळे' भू- स्थिर झाले.

या नेत्रसुखद -विलोभनीय पर्यटनानेच अंगच्या ’’सुप्त लिखाणास ‘‘चालना मिळाली. संगणकाशी मैत्री केली अन अनेक मित्र परिवार-नातेवाईकाना घरबसल्या परदेश प्रवास वर्णन इ -.मेल द्वारे पाठविले व आभासी आनंद पोहोचविला. पत्नी सौ.जयश्री हिने न कुरकुरता लिखाणास शांतता व संधि उपलबद्ध करून दिली. आज पुणे मुक्कामी सौ. सह घरामध्येच सुरक्षित राहून दैनंदिन पहाटे व्यायामाचे धडे गिरवीत आरोग्य पूर्ण वाटचाल तसेच लिखाण कामाची ऊर्जा घेत आनंदात वास्तव्य करीत आहे.

डॉ. अरविंद वैद्य –(२८ ऑक्टोबर २०२०)

# माझे मनोगत -

****

सद्य परिस्थितीत घरबसल्या सर्व काही मिळणे शक्य झाले आहे.

अश्यातच इ - साहित्य प्रतिष्ठानचे सुनील सामंत यांचे व त्यांच्या इ -बुक खजिन्याचा परिचय झाला.

या उपक्रमासाठी माझे नुकतेच प्रकाशित केलेले “कवडसे “पुस्तक या उपक्रमासाठी उपलब्ध करून दिले.

हे प्रवास वर्णन -ललित लेखन -पत्र लेखन -अंशतः कौटुंबिक परिचय असे सुमारे ४७० पानाचे पुस्तक आहे. श्री. सामंत सरांनी त्याचे अवलोकन करून त्वरित अभिप्रायही दिला. आणि याच पुस्तकांची विषयावर अशी लहान लहान ४-५ इ -पुस्तके तयार करू असा प्रस्ताव ठेवला. त्यास मीही आनंदाने मान्यता दिली. एकमेकांचे मसलती नंतर प्रथम अमेरिका वारीबद्दल पुस्तक करण्याचे ठरले.

त्याबद्दलचे सर्व लेख मी सरांकडे पाठवून दिले. त्यावर इ - बुक साठीचे योग्य ते संस्करण त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी केले. त्याचेच फलित म्हणजे हे -"**-माझे अमेरिकाटन”.! हे पुस्तक रूपातील- दुसरे अपत्य होय.**

हे वाचून आपणास घरबसल्या अमेरिकेची आभासी पण आनंदी सफर होईल अशी खात्री वाटते. पुस्तक वाचून अवश्य अभिप्राय कळवा. त्यांने आणखी पुस्तक लिहिण्याची स्फूर्ती येईल.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकारी मंडळाचे आभार-!

डॉ. अरविंद वैद्य

सहकारनगर-२,

पुणे

२७ ऑक्टोबर २०२०

९४२०१७५८०३

अनुक्रम

१) अराउंड द वर्ल्ड
२) विमान प्रवासाची पात्रता -
३) विमान प्रवासाची पूर्व तयारी
४) हवा हवासा वाटणारा हवाई प्रवास -१)
५) हवा हवासा -२)
६) अमेरिकेच्या -इस्ट वाटेवर -
७) अमेरिकेच्या वाटेवर -१
८) अमेरिकेतील वाटेवर-२)
९) अमेरिकेतील वाटचाल
१०) अमेरिकेचा -आकर्षक इतिहास
११) अमेरिकेतील दैनंदिन जीवनाची झलक
१२) अमेरिकेतील आमचा २०११चा गणेशोत्सव
१३)) अमेरिकेतील नव्हे जगातील उंच स्मारक
१४) यॉर्क ते न्यूयॉर्क
१५) अमेरिकेत भेटलेले मार्कुस -
१६) अमेरिकेतील चॉकलेटच्या बंगल्याची सफर
१७) अमेरिकेतील पशु प्राण्यांचे स्नेहसंम्मेलन
१८) अमेरिकेतील अपार्टमेंट -अंगणातील आठवणींचा पारिजात
१९) अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट -
२०) अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट -२

२१) अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट -३
२२) अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट-४
२३)अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट-५
२४)अमेरिकेतील लाईफ टाइम अचिव्हमेंट -६
२५) सनीवेल मधील ज्ञानसागरास भेट.
२६) नायगऱ्याच्या तुषारांनी भिजलेले क्षण -१)
२७)नायगऱ्यांच्या तुषारांनी भिजलेले क्षण-२)
२८) गोल्डन गेट ब्रीज -लोकल ते ग्लोबल
२९) कॅलिफोर्नियातील -जुना बाजार ( ग्यराज सेल)
३०)कॅलिफोर्नियातील- हनुमान टेकडी
३१) डी एंझा पार्क -पॉटलक चा जॅकपॉट
३२) अमेरिकेचे अनोखे अंतरंग
३३) आमचा पर्यटक गणपतीबाप्पा
३४) सण सुट्या अन जल्लोष -(ह्यलोवीन )
३५) यसोमेटी -निसर्ग सुंदर स्वप्न शिल्प
३६) शंभर नंबरी -अष्टोन ब्रुक
३७) फिनिक्स भरारी
३८) अमेरिकेतील आठवणींनचा गाशा गुंडाळताना
३९) ऋतू

अर्पण पत्रिका -

***

ज्यांच्या भेटीच्या उत्सुकतेने आम्ही पश्चिमेकडे प्रवास करण्यास झेपावलो ती आमची
‘‘दुधावरील साय ‘‘रुपी असलेली नातवंडे ,-
चि.अनुष्का -रुमानी -नील व रावी -

तसेच माझ्या प्रवास वर्णन लिखाणास ज्यांनी -
वेळीच प्रोत्साहन दिले व त्याचे पुस्तकही तयार झाले असे
अमेरिकेत भेटलेले गुरू बंधू
तुल्य व्यक्तिमत्व असलेले वसईचे -श्री. मार्कुस डाबरे याना सस्नेह अर्पण.!

# अराउंड द वर्ल्ड

***

“देखी है. सारी दुनिया - जापानसे लेकर- रशिया

ऑस्ट्रेलीयासे -लेकर. अमेरिका ”

मेड इन इंडिया - प्यारा सोनिया 'एक दिल चाहिये - बस्स?

हे गाणे प्रत्यक्ष्यात म्हणता येण्याची तयारी जोरात सुरु झाली आहे. अलिशा चिनॉय चे हे फेमस गाण्याने आज स्फूर्ती आली आहे.

“आधी कळस मग पाया”- या नेहमीचा मार्ग न अनुसरता. इंग्लंड पासून -अमेरिके पर्यंत तर मजल मारली आहे. अर्धी लढाई तर पूर्ण झाली आहे. म्हणतात ना. Thousand miles journey starts with one step ahead.

खरेच आपले भौगोलिक ज्ञान प्रत्यक्षात. उतरविण्याची उत्तम संधी म्हणंजे जगभराचा प्रवास करण्याची मानसिक व आर्थिक तयारी करणे. भूगोलाच्या नकाशा वरील तीम्बांच्या शहराचे विशाल दर्शन घडण्यास विमानप्रवास हा छान पर्याय आहे. पाहूया कसे जमते ते. Lets hope for the Best. -Will will find a way-!

सगळ्याची पूर्व तयारी म्हणजे -पासपोर्ट -व्हिसा -आणि फायनान्स.

चला तर मग तयारीला लागा. विमान कंपन्या आपल्या स्वागतास उत्सुक आहेतच.

घस घशीत सवलत देण्यास.

चला भेटू या तर -

# विमान प्रवासाची पात्रता

अश्या प्रकारे अडथळ्याची शर्यत पार. केल्यानंतर मग कुठे मुलांच्या कर्तुत्वाला वाव मिळतो.

तो संगणक वा जी मिळेल त्या शाखेचा इंजिनियर होऊन नशिबाने चांगली साथ दिली तर डिग्री मिळण्यापूर्वीच क्याम्पस इंटरव्यू मधून सिलेक्ट होतो.

व खऱ्या अर्थाने अर्थार्जनास लागतो. व पालकांना हायसे वाटते.

कंपनीत काम. मिळणारे प्रोजेक्ट इंग्लंड -अमेरिकेतील असतील तर वेळी अवेळी काम करावे लागते. त्याची तयारी असावी लागते. व कामामध्ये चांगला प्रोग्रेस दिसला तर कंपनी डायरेक्ट त्यांच्या क्लायंत कडे म्हणजेच. इंग्लंड -अमेरिकेस पाठविते.

त्या अगोदर आपला पासपोर्ट मात्र तयार असावा लागतो. आणि मग घरात सुरु होते ती वेगळीच - लगीन घाई.

परदेशात जाण्याच्या अनोख्या तयारीस.

दुसरा परदेशी जाण्याचा खुष्कीचा मार्ग म्हणजे बी. ई. झाल्या नंतर- M. S. करण्यासाठीची G. R. E. परीक्षा देऊन

स्व खर्चाने. तिकडील नामांकित विद्यापीठात प्रवेश घेणे. तेथे गेल्यावर कांही विद्यापीठात स्टायपेंड मिळते. अथवा तेथे सुटीचे दिवशी काम करून बऱ्यापैकी पोकेट मनी मिळू शकतो.

आता मुलांची खरी तेथे ‘‘एकटे राहण्याची -स्वैंपाक करून खाण्याची -तेथील हवामानाशी जुळवून घेण्याची -होम सिक न होण्याची परीक्षा सुरु होते ती वेगळीच. आणि या सर्वातून जो ‘‘सही सलामत सुटतो - ‘‘तो खरा ‘‘मुकद्दर का सिकंदर ‘‘ठरतो.

हळू हळू येथील उत्तम -स्वच्छ -नीट नेटक्या वातावरणाची सवय होत जाते. बँक ब्यालंस नजरेच्या टप्प्यात येतो. ब्याचलर असे पर्यंत’’शेयरिंग रूमचा ‘‘अनुभव मिळतो.

आता सुरु होते आई -बाबांना परदेश वारी घडविण्याची तयारी.

-

पासपोर्ट व व्हिसा काढणे - एक दिव्य

परदेश प्रवासास निघण्याची पहिली पायरी-पास पोर्ट असणे. सध्या त्यासाठी भक्तांची मोठी रांग असते.

तसेच पोलीस व्हेरिफिकेशन वगैरे बाबींची पूर्तता होण्यास २-४ महिन्याचा कालावधी लागतो. पासपोर्ट आला म्हणजे परदेशी जाण्याचे बेत हवेत रंगवायला प्रारंभ होतो. पण दाल आटे का भाव काय असतो त्याची प्रचीती हळू हळू येऊ लागते. पासपोर्ट १० वर्ष कालावधीसाठी मिळतो.

परदेश प्रवासास निघण्या पूर्वी त्या त्या देशाच्या नियमानुसार - अधिकृत व्हिसा (Visitor Intended to Stay Abroad ) काढावा लागतो.

त्यासाठी प्रत्येकाला स्थावर जंगम मालमत्ता -बँक पुस्तके -इन्कम ट्याक्स रिटर्न इ माहितीची सर्व मूळ कागदपत्रे सादर करावी लागतात.

ज्याच्या कडे परदेशी राहणार त्याचा- पत्ता- -बँक अकौंट -पासपोर्ट -व्हिसा-आमंत्रण केल्याचे पत्र इ. सर्व माहितीची कागद पत्रे लागतात

फिंगर प्रिंट्सचे वेळी हातावर मेंदी असता कामा नये याची खबरदारी महिलांनी घ्यावी.

इंग्लंड U. K. चा व्हिसा - ६ महिन्यांसाठीच मिळतो. इतर युरोप देशासाठी पुन्हा वेगळा शान्घैन व्हिसा लागतो.

अमेरीका व्हिसा साठी - पत्यक्ष मुलाखत द्यावी लागते. U. S. व्हिसा नशिबात असेल तर पहिल्या फटक्यात मिळतो

अन्यथा कोणतेही कारण न देता नाकारला जाऊ शकतो. ६ महिने थांबावे लागते हा व्हिसा -सलग १० वर्षाचा मिळतो.

या सर्व सोप संस्कारातून अर्थात अग्निदिव्यातून पार पडल्यावर आपण सुटकेचा निश्वास सोडतो आणि हवाहव्याश्या विमान प्रवासास पात्र ठरतो. यासाठी आपली प्रकृती उत्तम असणे जरुरीचे असते त्यामुळे परदेश प्रवासाचा चांगला आनंद लुटता येतो. वेगवेगळया देशात गेल्यावर तेथील खाद्य पदार्थांचा आस्वाद घेण्याची तयारी करून ठेवावी म्हणजे निराशा होत नाही.

एखाद्या प्रवासी कंपनी बरोबरही परदेशी प्रवास करता येतो. पण त्यामध्ये थोडी घाई होते कारण थोड्या वेळात जास्त स्थळे ते दाखवितात. पण त्याची एक वेगळी मजा असते. विमानप्रवासाची पूर्व तयारी करून ३ महिने अगोदर विमान तिकीट काडल्यास बऱ्या पैकी स्वस्त मिळते. आयता वेळी ८ -१० हजारापर्यंत फरक पडतो.

# अधांतरी

## विमान प्रवासाची पूर्व तयारी

ज्या विमान कंपनीचे तिकीट काढले असेल त्यांचे- नियमानुसार आपण किती वजनाचे सामान घेऊ शकतो याचा अंदाज घ्यावा.

साधारण पणे २ मोठ्या ब्यागा -(२३ किलो प्रत्येकी ) या ब्यागा विमानात स्वतंत्र विभागात असतात. व -१ केबिन ब्याग ७ किलो एवढे सामान घेता येते.

केबिन ब्यागेत ( विमानात आपल्या बरोबर असणारी ) द्रव पदार्थ -कोस्म्यातीक्स -धारदार वस्तू अजिबात घेता येत नाही हे चांगलेच ध्यानात असू द्यावे. पासपोर्ट -व्हिसा -तिकिटाच्या झेरोक्स प्रत्येक ब्यागेत असू द्यावी. मूळ पासपोर्ट -तिकीट -जेथे जायचे तेथील पूर्ण पत्ता फोन सह एका स्वतंत्र छोट्या ह्यांडी पर्स मध्ये घ्यावे. कारण ही माहिती जाता -येता स्वतंत्र पेपरवर लिहून द्यावी लागते.

आपल्या जवळ लागणारी औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिपशन सह असू द्या.

एवढी सर्व तयारी करून आपण अविस्मरणीय अश्या विमान प्रवासास निघतो. बरोबर एक वेळचे जेवण व एक दोन दिवस टिकणारे खाद्य पदार्थ घ्यावेत. विमातळावर सुमारे ३ तास अगोदर पोहोचावे अश्या बेताने पोहोचा. छान पैकी जेवण करावे फ्रेश होऊन तयार व्हावे. बरोबर आलेल्या स्नेहीजनांचा निरोप घेऊन-त्यांना पुन्हा भेटण्यासाठी थांबवून ,

आपले सामान त्र्वोलीवर घेऊन पास्स्पोर्त /तिकीट दाखवून आत प्रवेश करावा. आत गेल्यावर ज्या कंपनीच्या विमानाने जायचे त्या कौन्तर पाशी जावे. तेथे आपले पास-पोर्ट /तिकीट पाहून मोठ्या ब्यागाचे वजन करून त्या ताब्यात घेतल्या जातात. त्यावर नंबर टाकून आपला विमानात प्रवेश करण्यास लागणारा बोर्डिंग पास मिळतो. त्यावर ब्यागांचे नंबरचे स्टिकर्स असतात. आता विमानात घ्यावयाच्या प्रत्येक ब्यागेला-पर्स अथवा स्याक असेल त्याला विमान कंपनीचा

ट्याग लावून घ्या म्हणजे ते अधिकृत पणे आपल्या बरोबर ठेवता येणारे सामान समजले जाते.

एवढ्या प्रक्रीये नंतर आपण पुन्हा एकदा सर्व ओ के -झाल्याचे सांगण्यास व आपणास सोडवायला आलेल्या नातेवैकांना भेटण्यास जावू शकतो.

कारण यानंतरची प्रक्रिया असते ‘‘इमिग्रेशन ‘‘अर्थात हा-देश सोडल्याचा अधिकृत ‘‘शिक्का ‘‘पास पोर्ट वर बसण्याची. ह्या साठी आपल्या बद्दलच्या माहितीची एक स्लीप भरून द्यावी लागते. त्या मध्ये नाव -पत्ता -पासपोर्टची माहिती इ. गोष्टी भराव्या लागतात. व आपण सिक्युरिटी चेकिंग साठी पुढील दालनात येऊन त्यांच्या - पुनर्भेटी पर्यंत दृष्टी आड होतो.

येथ पर्यंतचा प्रवास प्रथमच विमान प्रवास करणाऱ्यांना उत्चुक्तेचा -संभ्रमाचा -वाटतो.

अश्या या’’अधांतरी ‘‘प्रवासास आता अर्धविराम देऊया!

## हवाहवासा वाटणारा. “हवाई”. प्रवास

**(भाग** १)

हवा में उडता जाये. मेरा लाल दुपट्टा मलमल का-जी हा-

या गाण्यातील दुपट्टा ज्या सहजतेने हवेत उडत जातो तसाच आजचा विमान प्रवासही सहज सुलभ झालेला आहे.

याचा अनुभव एवढ्यात मुंबई -वाशिंग्टन या विमान प्रवासात आला.

आजच्या आय. टी.च्या युगात घरोघरची मुले आणि हो मुलीसुद्धा आपले ज्ञान अधिक समृद्ध करण्यासाठी ह्या मार्गाचा अवलंब करतात. अन सहज पणे उच्च शिक्षण घेऊन तेथेच इंगलंड -अमेरीका -जपान - जर्मनी -ऑस्ट्रेलिया येथे स्वछय -शांत -निसर्ग रम्य वातावरणात रमतात. तेथे मिळणाऱ्या सुखसोई मुळे तेथील प्रतिकूल हवामानातही हळू हळू सवयीचे होऊन जातात.

त्या नंतर सुरु होते पालकांची वारी कधी कन्व्होकेशन - अर्थात मुलांच्या पदवीदान समारंभाच्या निमित्ताने तर कधी लग्नाळलेल्या मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी. त्यामुळेच अनायासे मिळणाऱ्या"आजी-आजोबा "या परदेशात मुफ्त मध्ये मिळणाऱ्या नव्या पदवीमुळे. त्यामुळे मिळणारा आनंद काही वेगळाच असतो.

पण या '"वर वर "दिसणारा आनंद उप भोगण्यासाठी त्यानाही बरीच कळ- काढावी लागलेली असते. हे मात्र -"वा वा.! निघालात वाटत- इंग्लंड -अमेरिकेला. मज्जा आहे बाबा तुमची! असे म्हणणार्या नातेवाईक मंडळीच्या अथवा मित्र मंडळींच्या गावीही नसते. ह्या कळा सुद्धा भविष्यात सुखद आनंद देतात त्याचा प्रत्यय येतो तो या परदेश गमनाने.

त्यांचे माहिती साठीच हा प्रदीर्घ लेख -प्रपंच.

या सुखानंदाची मुहूर्त मेढ आपल्याला मुले झाल्यापासूनच सुरु होते त्यासाठी काही - स्वानुभवाचे '- तंत्र आणि मंत्र"

१) हल्लीच्या सुखी जीवनाच्या मंत्राप्रमाणे एक या दोन अपत्यान वरच फुल स्टोप वेळीच द्यावा.

२) मातृभाषेतूनच शक्यतो प्राथमिक शिक्षण मुलांना द्यावे.

३) मुलांच्या सर्वांगीण गुणवाढी साठी आपला वेळ मुलांना द्या सह कुटुंब सहल काढा.

४) टी. वी. पाहण्याच्या- व्यसनापासून आपण सर्वजण जरा दूरच रहा (मोजकेच कार्यक्रम सह कुटुंब पहा )

५) मुलांमधील सुप्त गुणांचा शोध घ्या त्या साठी अधून मधून शाळेतील शिक्षकांना भेटा.

६) आपली मते मुलांवर लादू नका.

७) मुलांना एखादा छंद जोपासू द्या -

८) त्यांच्या मित्रांना घरी बोलवा आपणही त्यांचे घरी जा.

९) शाळे व्यतिरिक्त एखादी परकीय भाषा ८ वी -९ वी पासूनच शिकू द्या.

१०) घरातील वातावरण नेहमीच शांत व प्रसन्न ठेवा.

११ ) आलेला निकाल आनंदाने स्वीकारा- पुढील वेळी सुधारण्यास वाव असतो याचे भान ठेवा.

१२ ) व्यावसाईक शिक्षणाची निवड करण्याची मुभा पूर्णपणे मुलांना घेऊ द्या.

१३) स्पर्धा परीक्षा देण्याचा प्रयत्न करा.

१४ ) मुलांना नेहमी प्रोत्चाहनच द्या.

१५ ) इतर मुलांशी आपल्या मुलाची तुलना करू नका. कारण''आपण प्रत्येक जण ''जगातील एकमेव असे असतो

आपल्या सारखा दुसरा नसतो यातच धन्यता बाळगा.

१६) शिक्षक - अनुभवी प्राध्यापकांचा सल्ला घ्या.

१७) आपण तसेच मुलांनाही वेळीच संगणक साक्षर करा.

१८) पोकेट मनी -मोबाईल- हॉटेलिंगच्या खर्चावर नियंत्रण ठेवा.

१९) मुलांकडे -पती - पत्नी दोघांनी सारखेच लक्ष्य द्यावे.

२०) प्रयत्नांती परमेश्वर या मंत्रावर विश्वास ठेवा.

२१) स्वतःसाठी- दररोज १ तास वेळ काढा त्यात व्यायाम -मेडीटेशन -ध्यान धारणा करावी.

२२ ) देव धर्माचे “अती अवडंबर”- आचरण नसावे

२३ ) महत्वाचे -मुलांची - लग्न ठरविताना मात्र मुलांच्या पसंतीलाच वाव द्या.

२४) त्यांचे संसारात अती ढवळा ढवळ “आयांनी”करू नये.

२५) येतील ते - प्रसंग -परिस्थिती -फायदा -नुकसान याचा फार विचार न करता मन मोकळ्या मनाने”Accept”करा

व Forget and forgive चा मंत्र सतत ध्यानात असू द्या.

कारण एखादी मनाविरुद्ध गोष्ट घडून गेल्या नंतर त्याचा फारसा त्रास करून घेऊन उपयोग नसतो.

## हवाहवासा वाटणारा. “हवाई”. प्रवास .

## भाग 2

## “अधांतरी"- विमान प्रवासाचा प्रत्यक्ष अनुभव

****

हवाई सुंदरींच्या सुहास्य ' मुखवट्यानी' आपले विमानात स्वागत होते. आपल्याला स्थानापन्न होण्यास आपले सामान वरील केबिन मध्ये ठेवण्याबाबत मार्गदर्शन करतात. विमान कंपनी नुसार- त्यांचे आकर्षक असे चेहरे - पेहेराव- भरपूर- ”मेकप “असे प्रसन्न व्यक्तिमत्व प्रथमच जवळून पाहण्याची व त्यांचे कडून आरामशीर सेवा मिळविण्याची ती दुर्मिळ संधी असते.

आरामशीर सीट -विंडो सीट असेलतर उत्तमच. प्राथमिक सूचना माईक मधून ऐकू येतात. त्याचे प्रात्यक्षिक आपल्या सीट समोरील छोट्या स्क्रीनवर दिसतात. थोड्याच वेळात सीट बेल्ट आवळण्याची सूचना मिळते. सीट समोरील

कप्प्यामध्ये काही सूचना पत्रके असतात. त्याचे जरूर अवलोकन करावे. आपल्या सीटवर एक छोटी उशी -ब्लान्केट आणि ईअर फोन इ. वस्तू-''उसन्या''म्हणून आपणास मिळतात. त्याचा योग्य वापर कसा करायचा ते यथावकाश कळतेच.

आणि विमान टेक ऑफ- घेण्यासाठी तयार होते. धाव पट्टीवर योग्य अशी पोझिशन घेऊन हळू हळू धावू लागल्याचे जाणवते अन क्षणार्धात ते आकाशात झेपावून इप्सित-स्थळाकडे मार्गस्थ होते.

विंडो सीट असेल तर दिवसा व रात्रीच्या वेळी त्या शहराचे विहंगम दृश्य पहावयास मिळते. थोड्याच वेळात विमान हवेत मार्गक्रमण करताच लगबग सुरु होते ती हवाई सुंदरींच्या कसरतीची. ट्रोलीवर थंड -गरम -पेयपान घेऊन पत्येकाच्या आवडी प्रमाणे ते दिले जाते. हवेत भरपूर अश्या उंचीवर त्याचा स्वाद घेणे हा एक वेगळा अनुभव असतो. आपल्या समोरील टी. व्ही. टच स्क्रीनवर गाणी -सिनेमा -बातम्या पाहता येतात. तसेच एकाच्यानल्वर आपले विमान किती उंचीवरून व कसे चालले आहे याचे सचित्र माहिती

मिळत राहते. त्यामुळे चांगला टाईम पास होतो. आपल्या काहीही अडचणी असल्यास हवाई सुंदरींना सांगाव्यात.

थोड्यावेळाने हवाई सुंदरींच्या दुसऱ्या प्रवेशास सुरुवात होते ती ब्रेक फास्ट सर्व्ह करण्याच्या यामध्ये व्हेज -नोन व्हेज असे दोन्ही प्रकार असतात. विमान तिकीट बुक करताना याबाबत तसेच स्मोकिंग की नोन स्मोकिंग झोन हवा याची माहिती घेतली जाते. विमान कोणत्याही वेळी सुटले तरी वरील पद्धतीने कार्यक्रम चालतो.

लहान बालकांना झोपण्यासाठी पाळण्याची सोय असते. त्या बाबत ही अगोदर सूचना द्याव्या लागतात. अश्या प्रकारे प्रवास सुरु असतो. विमानातील वातावरण ए. सी. असते. कांही जण वाचन करतात तर काहीजण ब्रह्मानंदी टाळी वाजवून झोपी जातात. साधारण दोन तासानंतर मुख्य भोजनाचा कार्यक्रम सुरु होतो. यामध्ये स्टार्टर मध्ये आवडीनुसार सोफ्ट व हार्ड ड्रिंक दोन्हीची सोय असते. हे सर्व आपल्या जागेवर आणून देण्यासाठी हवाई सुंदरींची चांगलीच दाम- छाक होते.

आता विमानातील रेस्ट रूम विषयी जाणून घेऊ यात. हा ही एक महत्वाचा भाग असतो. अगदी छोट्या जागेत पण

उत्तम व्यवस्था असते. याबाबत योग्य ती माहिती अगोदर समजून घ्यावी. हात धुण्यासाठी साबणासह बेसिन मध्ये गार गरम पाण्याची सोय असते. टोईलेट चे मागे पुश बटन असते ते दाबल्यास-"जोरात"-आवाज करत सक्शन पद्धतीने मोठा आवाज होऊन त्याची."बिन पाण्यानेच"चकाचक साफ सफाई होत असते.

दिवसा विंडो सीट वाल्या प्रवाशांना पांढऱ्या शुभ्र ढगातून चाललेल्या विमानातून दिसणाऱ्या विशाल समुद्राचे ,अरब प्रदेशातील वाळवटांचे आगळया वेगळया अश्या दृश्यांची डोळ्यात साठवण करता येते.

साधारणपणे ८ तासांच्या प्रवासानंतर ब्रेक घेण्याची वेळ येते. विमान उतरण्यापूर्वी तशी सूचना मिळते सीट बेल्ट पुन्हा एकदा आवळावे लागतात. उसन्या दिलेल्या. वस्तू आठवणीने परत घेतल्या जातात. एअर पोर्ट वर उतरून दुसऱ्या विमानासाठी ४-५ तासांसाठी आपणास थांबून रहावे लागते.

तेथे असणाऱ्या दैदीप्यमान अश्या मोल मधून कस्टम-फ्री वस्तूंची पहाणी वा खरेदी करता येते. त्यासाठी आवश्यक

असते ते तेथील चलनाची. तेथील- एक्स चेंज काऊनटरवर त्याची सोय असते.

आपल्या जवळ जरुरीपुरते. डॉलर्स असू द्यावेत तसेच- जोखमीचा विमा उतरविणे ही विमान प्रवासा अगोदर करून ठेवणे सोयीचे ठरते. या प्रवासात पास पोर्टला आपल्या -जीवा भावाच्या मित्राप्रमाणे जपण्याची- विशेष काळजी घ्यावी लागते. या वेळात तेथे असलेल्या विविध सूचनांची -सुख सोयींची माहिती घ्यावी -आपल्या कॅमेर्यात तेथील आठवणी बंदिस्त करून ठेवाव्यात -इतर प्रवांश्याशी संवाद साधावा म्हणजे वेळ मजेत निघून जातो.

पुढील प्रवास दुसऱ्या विमानाने अश्याच प्रकारे पार पडतो.

आपणास आपली माहिती भरण्याचा फॉर्म दिला जातो. त्यावरची माहिती -कोठे जाणार त्या ठिकाणचा पत्ता -फोन नंबर नाव पासपोर्ट वरील माहिती लिहून तयार ठेवावा लागतो. थोड्याच वेळात अलगदपणे खालील विशाल एअर पोर्टवर आपल्या इप्सित स्थळी विमान उतरून आपले स्वप्नातील''हव्या हव्याश्या अश्या पहिल्या - अधांतरी हवाई

प्रवासाची सांगता होते. पुन:शच्य एकदा प्रसन्न - हसमुख चेहऱ्याच्या हवाई सुंदरींचे दर्शनाचा गुड बाय चा निरोप घेऊन आपण इमिग्रेशन चेकिंग साठी एका भव्य दालनात येतो.

या ठिकाणी आपणास एकत्रितपणे देशो देशीचे- विविध रंगाचे, पेहेरावातील लहान थोर अश्या नागरिकांचा मेळावा आपापल्या भाषेत-हाव भाव करत संवाद करताना दिसतो. वसुधैव कुटुंबकम-चे विशाल दर्शन घडते.

भरलेला फॉर्म व पासपोर्ट- तयार ठेऊन आपणास इमिग्रेशन ऑफिसरला रांगेत उभे राहून सामोरे जावे लागते. येथे आपणास कोणाकडे आलात.? कश्यासाठी.? आपल्या बरोबर कांही विशेष सामान आणले आहे का.? याबाबत चौकशी करून त्या देशात आल्या बाबत चे शिक्का मोर्तब होऊन आपण ( विमानातील) -"आग्याहून “सुटका झाल्याचा आनंद घेतो आणि आतापर्यंतचा अधांतरी प्रवास संपवून जमिनीवर स्थिरावतो.

आपले लगेज- घेण्यास दुसऱ्या एका भव्य दालनात - फिरणाऱ्या रुंद अश्या अनेक सरकत्या पट्टयावर सर्वांच्या मोठ मोठ्या ब्यागा फिरताना दिसतात. तेथील टी. व्ही. स्क्रीन वर

कोणत्या विमानाचे सामान कोणत्या क्रमांकांच्या पट्ट्यांवर येईल याची माहिती मिळते. आपल्या विमानाचे क्रमांकानुसार संबंधित फिरणाऱ्या पट्या जवळ जावून आपले सामान दिसताच बाजूला काढून तेथे असणाऱ्या ट्रोलीवर ठेऊन मोठ्या दिमाखात बाहेर पडावे. आपल्या स्वागतास आपले सुहृद मंडळी- अरायव्हल विंग. मध्ये अधीर झालेले असतातच. विमान ल्यांड झाल्यापासून बाहेर येई पर्यंत साधारण १ तासाचा अवधी लागतो.

अश्या तऱ्हेने नव्या देशाच्या अनोख्या वातावरणाशी- दोस्ती करण्यास सुहृदांच्या गळा भेटीने"श्रीगणेशा होतो". व सुरुवातीस गुणगुणलेल्या गाण्यातील सहजतेने हवेत उडणाऱ्या. देशी -लाल मलमली दुपट्याचा. केंव्हाच विसरही पडतो. तो- परदेशातील निसर्गरम्य. अशी हिरवीगार मखमली दृश्ये पाहण्याचे ओढीने.

त्यामुळेच. "हिरवे हिरवे गार गालिचे. हरित तृणांच्या मखमालीचे -. या बालकवींच्या ओळी न आठवतील तर नवलच नाही का.?

# अमेरिकेच्या (इस्ट) वाटेवर

*****

आमच्या आयुष्यतील विमान प्रवासाची ‘‘ह्यात्रिक ‘‘यंदाच्या अमेरिकेच्या विमान प्रवासाने होत आहे.  याचा वेगळाच आनंद आहे.

वेळेच्या बाबतीत भारताच्या ‘‘मागे ‘‘राहूनही हा अमेरिका देश एव्हडा आघाडीवर कसा आहे बर? . याचा’’मागोवा ‘‘घेण्याची उत्तम संधी ‘‘मिलिंद -प्राजक्ता ‘‘यांनी मराठी नव वर्षाच्या प्रारंभी उपलब्ध करून दिली आहे. यासंधीचे ‘‘सोने ‘‘कसे करता येईल हेच आता पाहायचे आहे. नाहीतरी या सोन्यासारख्या संधीची ‘‘चांदी ‘‘झाली तरी आनंदी आनंदच आहे.

प्राथमिक पण कट - कटीची ‘‘पूर्व ‘‘तयारी व्यवस्थित पूर्ण झाल्याने, ‘‘पश्चिमेकडील ‘‘गोष्टींचा उलगडा यथावकाश सुलभ पणे होईल अशी खात्री आहे.

“लुफ्तांझा “या कंपनीच्या LH - 765 * या फ्लाइटने दिनांक. २८ एप्रिल २०११ रोजी भल्या पहाटे मुंबई - सहारा वरून भल्या पहाटे १. १० वाजता आमचे विमान अमेरिकेकडे प्रस्थान करेल. व “२८ एप्रिल २०११ रोजी दुपारी ३ चे “सुमारास अमेरिकेच्या भूमीवर. वाशिंगटन येथे आमचे - पहिले वहीले पाऊल पडेल.

सर्वच पहिल्या गोष्टींची उत्छुकता माणसाला असते तशीच आमची अवस्था झाली आहे. अमेरिका व अमेरिकेतील आपले सगे सोयरे यांच्या भेटीस आतुर.!

टी. वी. वरील “मृण्मयीच्या “शब्दात सांगायचे तर, आता तर.”लई भारी वाटतंय”.!. आणि काय सांगू.? .

बाकी नंतर सर्व तेथूनच - “थंड “डोक्याने सुचेल तसे कळवूच.

अनुष्का - अश्विनी - मंदार यांच्या बरोबरच्या''इंग्लंड''अबिंग्डन मधील मधुर''आठवणी ''धूसर होत नाहीत - तोच

मिलिंद -प्राजक्ता बरोबर राहण्याचा व अमेरिकेच्या प्रवासाचा ' दुग्ध - शर्करा ' असा योग ४-५ महिन्यातच लवकर जुळून आला आहे.

आणि नव्या पर्यटन ''अध्यायाचा ''शुभारंभ नव्या मराठी वर्षाच्या प्रारंभीच आणि तोही ''अक्षय तृतीयेच्या ''आगामी शुभ मुहूर्तावर होत आहे यातच ''अक्षय ''आनंद भरून राहिला आहे.

## अमेरिकेच्या वाटेवर -( २ )

*****

दोन महिन्यांच्या प्रदीर्घ पूर्व तयारी नंतर २७ एप्रिल २०११ दुपारी ४. ३० वाजता स्यान्डीजच्या तवेराने सहार विमानतळाकडे प्रस्थान केले. सामान वगैरे चेकिंग थोड्याच वेळात झाले ,सर्व सामान व्यवस्थित नियमानुसार झाल्याने सुटकेच निश्वास सोडला तब्बल ६ ब्याग्स होत्या. LH-765 - विमानाने पहाटे १. १० ला उड्डाण केले. भौगोलिक असा अरबी समुद्र ओलांडून आम्ही सकाळी ६ वाजता''म्युनिच''जर्मनी येथे ५ तासांच्या ब्रेक साठी उतरलो.

फ्रेश होऊन सभोवतालच्या भव्य वेटिंग एरियातिल भव्य दुकानात आपल्या परिचयाची ''जर्मनची भांडी '. कोठे दिसतात का? हे पाहिले पण त्याचा मागमूसही दिसला नाही -पिकते तिथे विकत नसावे - बहुतेक?

म्युनिच हे नवीनच विमानतळ आहे लहानमोठ्या विमानांची चहल पहल दिसत होती. डाव्या बाजूस विस्तीर्ण मैदानावर रन वे व हिरवे गवताचे पट्टे असे अनोखे नेत्र सुख देणारे

मिश्रण पहावयास मिळाले. त्यावर अलगद पणे उतरणारी विमाने''मोठ्या''फुलपाखराप्रमाणे भासत होती. पुढचे विमान १ तास उशिरा सुटणार असल्याचे समजले. त्यामुळे पुन्हा एकदा फ्रेश होऊन तेथेच पेपर्स वाचत वेळ घालविला

१२. ३० वाजता LH- 414 हे विमान वाशिंग्टन डी सी कडे झेपावले. अटलांटिक हा महाकाय महासागर उल्लंघून - 'अमेरिकेतील वाशिंग्टन डी सीच्या''डलेस ''विमानतळावर १० तासांच्या प्रवासानंतर दुपारी ४ वाजता पोहोचलो. 'स्वप्नवत '- वाटणाऱ्या व आतापर्यंत फक्त भौगोलिक परिचयाच्या अश्या अमेरिकेच्या भूमीवर आमचे पहिले पाऊल ठेवले व चंद्रावर उतरलेल्या चांद्रवीरांप्रमाणे आनंद अनुभवला.

मिलिंद - प्राजक्ता स्वागतासाठी हजार होतेच. विमान तळाबाहेर पडताच विशाल अश्या पार्किंग लॉट मधून कार बाहेर काढली व अमेरिकेच्या उबदार कुशीत ऐतिहासिक अश्या HERNDON ,VA 20171 येथे विसावलो देखील.

## * अमेरिकेतील वाटेवर * ३

-

वाशिंग्टन डी सी - Dulles विमानतळावरून घरी जातानाच अमेरिकेच्या रस्त्यावर वावरताना पहिला फरक जाणवला तो म्हणजे डाव्या बाजूस असणारे कारचे “ड्रायविंग सीट “डाव्या बाजूने जाणारी व उजव्या बाजूने येणारी वाहतूक. प्रशस्त चकाचक रस्ते - सिग्नलच्या दिव्यांचे लांबलचक आडवे खांब व रस्त्याचे कडेला असलेले दिव्यांचे उंच असे खांब. बाकी सर्व आकाश मोकळे मोकळे भव्य दिसते. आपल्या सारख्या लाईटच्या तारांचे जाळे ,भले मोठे होर्डींग्स ,जाहिरातींची भाऊ गर्दी येथे अजिबात नसते.

त्यामुळे भव्यता जाणवते. आणि -फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश- या गाण्याची प्रकर्षाने आठवण येते.

मिलिंद -प्राजक्ता रहात असलेली -Herendon-Little current DR (DRIVE) HE छोठे खानी दुमजली

अपार्टमेंटची वसाहत ,सुबक आखीव रेखीव पार्किंगची व्यवस्था ,सभोवती हिरव्या गार झाडांची फौज. प्रत्येक इमारतीवर त्यांचे नंबर्स ,दारावर फ्ल्यातचे नंबर्स आमच्या अपार्टमेंटचा नंबर -2444 व फ्ल्याट क्रमांक - 4442 असा वैशिष्ट्य पूर्ण आहे. सर्व फ्ल्याट एकसारखे आतून बाहेरून पांढऱ्या शुभ्र रंगाचे,. लाकडी जीने,. एक वेगळाच रुबाब दिसतो.

या घराची व्यवस्था - आत शिरताच डाव्या बाजूस किचनची व्यवस्था डाव्या कोपऱ्यात. दिवाणखाना व नंतर २ बेड रूम्स. दिवाणखान्याला लागून छोटी ग्यालरी.

कॉलनीच्या मध्यभागी छोटेसे पटांगण-लहान मुलांना खेळण्यास झोका ,घसरगुंडी ,स्विमिंग पूल

प्रशस्त आवार. चालण्यासाठी सिमेंट कोन्क्रीतचा हिरवलीभोवतीचा छानसा वळणा वळणाचा रस्ता.

आपल्याकडे सध्या टाउन शिप कॉलनीत असा प्रकार पहावयास मिळतो. इंग्लंडच्या तुलनेत येथे रस्ते -दुकाने -पार्किंग -कार्स सारे काही प्रशस्त असे दिसून येते. काचेची तावदाने असलेल्या भव्य कार्यालयामध्ये सर्रास रात्रभर दिवे चालूच असल्याचे आढळतात. सगळीकडे नैसर्गिक हिरवळ मात्र आवर्जून पहावयास मिळते त्यामुळे डोळ्यांना आपोआपच थंडावा मिळतो.

# अमेरिकेतील वाटचाल ५

-

आमचे पाहिले औटींग

Harpers Ferry-National Historical Park

West Viriginia-,Maryland,-Virginia

****

येथील शिरस्त्या प्रमाणे विक एंड ला शनिवारी सकाळीच नाश्ता करून व दुपारच्या पोट पुजेची व्यवस्था बरोबर घेऊन निघालो.

दिमतीला -Mitsubishi- Verginiya-XMS-2100 कार होतीच. प्राजक्ताने ड्रायविंग सीटची तर बाजूस''गाईड''म्हणून मिलिंद होताच. मागे आम्ही

“जेष्ठ नागरिक “व मिलिंदचा एक मित्र. स्वप्नील कार्येकर एक बडबडे व्यक्तिमत्व.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात- कारने आपली मार्गक्रमणा लांबवर पसरलेल्या रस्त्यावरून सुरु केली. आणि यथोचित असे -पल पल पल

- हरपल हरपल- कैसे कटेगा -पल- हरपल-हरपल -या सुमधूर गाण्या सोबत रस्ता मागे पडू लागला. दुतर्फा हिरव्या गार गवताच्या गालीच्या मधून पसरलेल्या रस्त्यावरून पळणारी कार- Harpers Ferry-National Historical Park -जवळ केंव्हा आली हे कळले देखील नाही.

आपली कार पार्क करून तेथील मोठ्या गाडीने आत गर्द झाडीतून दूरवर सर्वांना घेऊन जाण्याची उत्तम व्यवस्था होती.

डोंगर दऱ्यातून खळ खळ वाहणाऱ्या Shenandoah आणि potomac या नद्यांच्या संगमाच्या व सभोवतालच्या दरीमधील विलोभनीय अश्या थंड वातावणात आपण येऊन पोहोचतो. येथून पाऊल वाटेने विस्तीर्ण पसरलेल्या सभोवतालच्या पार्क मध्ये भटकंती सुरु केली.

हे पार्क म्हणजे -जॉर्ज वाशिंग्टन -अब्राहम लिंकन यांनी प्रस्थापित केलेली त्यावेळच्या''अम्युनिशन फ्याक्टरीचा परिसर''. येथेच युद्धास लागणारा दारुगोळा व बंदुका तयार होत असत. त्याची माहिती म्युझियम मधून आजही जपून ठेवली आहे. आजू बाजूस टुमदार वसाहत ,. डोंगर माथ्यावर चर्च, उंचावरून दिसणारा नयन मनोहारी असा परिसर पाहून आनंद दुणावतो

अश्या वातावरणातच झाडाखालील असलेल्या बाकावर बसून वनभोजनाचा आस्वाद घेतला. अन पुनश्य नव्या उत्चाहात मेरील्यांड -वेस्ट वर्जिनिया-वर्जिनिया या तीन विभागांचा दुवा असलेल्या नदीकाठी भटकंती करून तेथील आईस्क्रीमची मजा चाखत

तेथील आठवणी मनात साठवून सायंकाळी आकाशात उडणाऱ्या पाखरान समवेत आम्हीही घराकडे परतलो.

## **अमेरिकेचा-आकर्षक - आधुनिक इतिहास.**

*****

“४ जुलै”. अमेरिकेचा स्वातंत्र्यदिवस”

.

स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे व मी तो मिळविणारच.! हा टिळकांचा करारी बाणा.

तर -अहिंसा परमोधर्म -हा तर गांधींचा - बालपणापासूनचा हट्ट.!

या दोन युक्तीच्या गोष्टींमुळे चतुराईने- 'ब्रिटिशां पासून ' भारताला मुक्त केले.

त्यामुळेच -’’मेरा भारत महान’’.! म्हणण्याची स्फूर्ती येते.

*****

अमेरिकेतील जनतेच्या दृष्टीने त्यांच्या - स्वातंत्र्याचा हिरो "जॉर्ज वाशिंग्टन"

George Washington- "first in war, first in peace, and first in the hearts of his countrymen

. " Historical scholars rank him as one of थे-greatest United States presidents.".!

- महाकाय स्वतंत्र लोकशाही अमेरीका. खंडाचा इतिहास जाणून घेताना या देशाचा - पांढरा -लाल -व नीळा या तीन रंगाचा ध्वज बरेच कांही सांगून जातो. झेंड्या वरील लाल आणि पांढरे एंकसारख्या रुंदीचे १३ पट्टे. मूळ अमेरिकन वसाहतींचे दर्शक आहेत. तर कोपऱ्यातील निळ्या रंगाचे चौकोनातील ५० पांढरे स्टार्स हे या देशातील राज्यांची संख्या दर्शविते. स्वातंत्र्य - समता आणि- बंधुता या त्रिसूत्रीवर अमेरिकन जीवनपद्धती आणि मानसिकता आधारित आहे.

१७७५ मधील -पहिल्या युद्धानंतर फ्रान्सच्या मदतीने "ब्रिटीशांच्या "जोखडातून मुक्त झाले. ४ जुलै १७७६ हा अमेरिकेचा स्वातंत्र्य दिवस. जेमतेम. २३५ वर्षाच्या कालावधीत. ख्रिस्तोफर कोलंबसाची ही अमेरीका. १९९१

मध्ये माहिती तंत्र ज्ञानाच्या मदतीने उच्च पदाला पोहोचली. यशस्वी लोकप्रिय योद्धा -प्रथम प्रेसिडेंट - जॉर्ज वाशिंगटन - विद्वान अब्राहम लिंकन -अंतराळ युगाचे जनक जॉन एफ केनेडी -रेगन -क्लिंटन -बुश -ते आताचे पहीले- आफ्रिकन अमेरिकन प्रेसिडेंट- हार्वर्ड विद्यापीठ पदवीधर. बराक ओबामा यांनी आपापल्या कर्तुत्वाने व देशप्रेमाने अमेरिकेचा आजतागायतचा यशस्वी इतिहास जगापुढे. नावारूपास आणला आहे.

मार्टिन ल्युथर किंग ( ज्युनिअर )हाही अमेरिकेच्या इतिहासातील १९६४ चा. नोबेल पीस- प्राईज विजेता- आफ्रिकन अमेरिकन, गुलामगिरी संपविणारे. अब्राहम लिंकन व तरुण राजबिंडे. जॉन एफ केनेडी या गुणी- जनांची माथे - फिरूनी केलेली हत्त्या हे -ऐतिहासिक ‘‘कलंक ‘‘येथील गोरेपणावर चांगलेच उठून -( खुपून ) दिसतात.

तर- ‘‘माय. ,सिस्टर्स अन्ड ब्रदर्स ऑफ- अमेरीका.! असे संबोधून- भारताच्या संस्कृतीची आणि अध्यात्मिक श्रेष्ठतेची ओळख अमेरिकेच्या व्यासपीठावर ‘‘शिकागो’’येथे जगाला पटवून देणारे -थोर भारतीय सुपुत्र -स्वामी विवेकानंद -त्यांचे हृदयात कायमचे स्थान मिळवून राहतात.

विस्तृत भू भाग- -विलोभनीय सृष्टी सौंदर्य -अत्याधुनिक यंत्र सामग्रीचा सुयोग्य वापर आणि उच्च शिक्षणाचे. खुले महाद्वार यामुळे अनेक परदेशस्थांना येथे येण्याचा मोह. न झाल्यासच आश्चर्य. वक्तशीरपणा -वाहतुकीची- करडी शिस्त - सार्वजनिक स्वच्छता - दैदिप्यमान - इतिहासाची भव्य म्युझियम्सद्वारा व स्मारके उभारून भावीपिढीसाठीला मार्गदर्शक अशी केलेली जपणूक. व्यक्तीच्या योग्यते नुसार जगातील. उत्तुंग असे स्मारक उभारून त्यांच्या त्यागाला- शौर्याला आणि विद्वत्तेला योग्य तो दिलेला-सलाम येथे पहावयास मिळतो. संशोधनाच्या असंख्य संधी येथे उपलब्ध आहेत.

कॉम्पुटरच्या अलौकिक शोधामुळे येथे.". वर्क फ्रॉम होम "- फोर्मल ड्रेस - ही संकल्पनाही उदारपणे स्वीकारली गेली आहे. प्रत्येकाच्या गुणवत्तेला येथे- वाव आहे व. उत्कृष्ट कामाचे भरघोस. दामही आहे. येथील आय बी एम कंपनीने एवढ्यात शंभरी गाठली आहे. जग भराच्या जिव्हाळयाचे तसेच विवंचनेचे - पेट्रोलचे भावाची चढ उतार येथे. तर सोन्याचे भाव लंडन मध्येच ठरतात आणि आपले वेगळेपण जपतात.

माणसाला पक्ष्याप्रमाणे. विहंगम दृश्याचा अनुभव घेण्याची. कायम स्वरूपी व्यवस्था करून ठेवलेल्या- राईट बंधूच्या प्रेरणेने आतापर्यंतच्या - भल्या मोठ्या बोईंग विमानापासून - ते - खिश्यातील मोबाईल पर्यंतच्या असंख्य दैनंदिन लागणाऱ्या सुख सोयींच्या शोधांच्या या जननीने -राईट बंधू. ते बिल गेट्स या सारखे असंख्य सुपुत्र दिले आहेत. जगभरातील. मानवी विद्वत्तेच्या. हिऱ्यांना उत्कृष्ट पैलू पाडण्याचे काम येथील- समृद्ध अश्या विद्यापीठातून चालते. आणि त्यातूनच जगप्रसिद्ध. असे. नोबेल *- ऑस्कर *- विम्बल्डन *- कान्स* -असे- अवार्ड विजेते-या मावळतीकडील कोंदणात. उदयास येत आहेत.

हे पाहूनच आता पूर्वेकडील. चीन -जपान. मधील विद्यार्थीसुद्द्धा आपल्या पारंपारिक भाषेच्या. पाश्यातून मोकळे होऊन इंग्रजी भाषा आत्मसात करीत आहेत व या भाषेच्या. सुताचे जोरावरच- पश्चिमेकडील. स्वर्गाचे दार असंख्य. भारतीयांप्रमाणे ठोठावू लागले आहेत. मातृभाषेतील शिक्षणाच्या नाण्याची दुसरी बाजू- इंग्रजीची असली की ते खणखणारच यात आता शंका राहिलेली नाही.

याच मोहाने अमेरिकेच्या वाटेवर असंख्य. इच्छुकांची भाऊगर्दी- देशातील पासपोर्ट ऑफिसमध्ये पहावयास मिळते. तेथील. सत्व परीक्षेत -तावून सुलाखून जो उ-तरतो. तो - जी आर इ टोफेल. चे अडथळे पार केलेला जिज्ञासू - विद्यार्थी येथे आल्यावर आपल्या ज्ञानाचे. सोने करतो अन. डॉलर्स - कमाईस- व येथील विविध पदास पात्र ठरतो. त्यामुळेच भारतीय वंशाचे श्री. सुखात्मे हे येथील नामांकित विद्यापीठाचे आज कुलगुरू आहेत.

येथे सध्यातरी दक्षिण भारतीय. विद्यार्थी. (यांचे एकमेकांना खूप सहकार्य मिळते -तसे महाराष्ट्रीय तरुणात याचा- अभाव आढळतो ), गुजराथी. व्यापारी मंडळी व पंजाबी. हॉटेलओनर्स प्रामुख्याने अमेरिकेत विखुरलेले पहावयास मिळतात. त्यामुळेच एव्हड्यात अमेरिकेने आपली कौन्सिलेटही. हैद्राबाद येथेही उघडली आहे.

असे हे आधुनिक. 'श्रावणबाळ' आपापल्या ‘‘दीर्घदृष्टीच्या ‘‘आईवडीलांना ‘‘ऐटीत ‘‘या मोहमयी माया नगरी -अमेरिकेची-वारी घडवून आणल्याचे-भरघोस पुण्य गाठीशी बांधण्याचे तयारीस लागतात, ते येथील आपल्या

भटकंतीतल्या - प्रेक्षणीय स्थळी दृष्टोत्पत्तीस पडते. पालकांच्या चेहऱ्यावरील मनस्वी समाधानाच्या. प्रतिमांचे प्रतिबिंबही "क्यामेर्याच्या क्लिकने अन विडिओच्या सी डी मध्ये"कायमचे बंदिस्त होते ते पुनःपुन्हा- मायदेशी. "उजळणी "करण्यासाठी व सुहृदांनाही. आभासी (virtual ) अमेरीकावारी घडविण्याचे. प्रेझेंटेबल. प्रेझेंट देण्यासाठीच.

देशोदेशीचे - गुणी बौद्धिकभक्त. न्यूयोर्क मधील- स्वातंत्र्य देवतेची - पूजा -अर्चेने - आळवणी करतात -त्यांना ती प्रसन्नही होते. व प्रत्येकास यथावकाश ,- डॉलर्स -** U. S. - ड्रायव्हिंग लायसन. *** ग्रीनकार्ड. ****स्वतःचे अपार्टमेंट अथवा स्वतंत्र घर. तसेच *****सिटीझनशिप व उरला सुरला - अमेरिकेचा पासपोर्ट या स्वरुपात प्रसाद यथावकाश देत रहाते -आणि -"-स्वार्थाबरोबर परमार्थ"- या शब्दांना नवा - अर्थप्राप्त होतो- हे ही नसे थोडके.

अश्या या अजब -आकर्षक अमेरिकेस -४ जुलै - स्वातंत्र्य दिनाच्या शुभेछया.!

2 जुलै – २०११

## अमेरीकेतील -दैनंदिन जीवनाची एक झलक

****

वेळेलाही किंमत असते. म्हणूनच तिच्या मोजणीला. “डाऊन पेमेंट करावे “तसे काउंट करावे लागते हे आपण अनुभवतोच की.

वेळ आणि काळ- काही सांगून येत नाही म्हणून- वेळ आणि पैसा जपूनच वापरावयाचा असतो. अन्यथा वेळ एकदा का निघून गेली तर ती मात्र कितीही पैशाने भरून निघू शकत नाही हे ही लक्षात घेण्यासारखे आहे.

अनेकदा त्याने माझा वेळ खाल्ला - वेळ खूप घेतला- वेळ फुकट गेला. त्याची वाट पाहण्यातच माझा वेळ गेला. आत्ता येतो सांगून तास झाला तरी अजून आला नाही. अशी तक्रार आपण बऱ्याचदा ऐकतो. “TIME IS MONEY. “- याची जपणूक करणारी -अमेरीकीन -संस्कृती अनुभवली. बस -रेल्वे -याचे परफेक्ट टायमिंग येथे पाळले जात असल्याचे येथे जाणवले. त्यामुळे त्या त्या वेळेला येवूनच प्रत्येक जण आपली

जागा घेतो. अशाने कोणाचाच वेळ वाया जात नाही. डॉक्टर असो अक्टर असो कामगार असो वा वकील. प्रत्येकाला वेळेचे बंधन असतेच असते.

वाशिंगटन येथे युझियम्स-प्रेक्षणीय स्थळे -व्हाईट हाउस पाहण्यासाठी मोफत का होईना अगोदर तिकिटे काढून आपली भेटण्याची वेळ निश्चीत करावी लागते त्या प्रमाणेच गटागटाने लोकांना आपापल्या वेळेत - सोडण्यात येते. येथील वास्तव्यात एक प्रकर्षाने जाणवले ते हे की कोठेही गर्दी -रेटारेटी आढळली नाही. मंदिराचे बाहेर सुद्धा त्यात सामावणाऱ्या माणसांची संख्या नमूद केलेली असते. त्यानुसारच आत माणसे असतील या बाबत दक्षता घेतली जाते. तसेच रांगेचा फायदा सर्वांनाच होताना दिसतो. सब वे -पिझ्झा -कॉफी हाउस -अगदी-रेस्ट रूमला देखील गर्दी झाली तर -रांगेतच प्रवेश असतो. त्यामुळेच एक रांगेची एक अशीही वेगळीच शिस्त येथे पहावयास मिळाली. मुंग्या देखील रांगेने दूरवरचा पल्ला गाठतात ते आपण पाहतोच की.

कार प्रवास करताना -जी पी एस ( ग्लोबल पोजिशनिंग सिस्टीम ) या उपकरणा द्वारे आपल्या इप्सित स्थळाचा

जवळचा -दूरचा - टोल टाळणारा अश्या आपल्या निवडीचा मार्ग ते निर्धोक पणे दाखविते. तसेच प्रत्येक रस्त्याचे वेग मर्यादिनुसार -आपण - जाण्याच्या - ठिकाणावर पोहोचण्याची निश्चित वेळ ही आपणास ते दाखविते. ना गडबड ना गोंधळ. रस्त्यावर वाहनांची वाहतूक ही नियंत्रित वेगात सुरु असते. असंख्य कार असूनही हॉर्नचा वापर अभावानेच होतो.

कार पार्किंगचे कडक नियम आहेत. बहुतेक ठिकाणी पेड पर्किंग्ज असते. लेन शिस्तही अत्यंत महत्वाची. लेन चुकली तर पुढेच जावून पुढे असणार्या एक्झिट ने यु टर्न घेवून यावे लागते. कारचे नियमित सर्विसिंग करावे लागते. त्या बाबतची पुढच्या दिनाकाची नोंद दर्शनी भागावर दिसेल अशी लावावी लागते. नियमांचा भंग केल्याचे दिसताच पोलीस मामा कधी मागे येवून दत्त म्हणून उभा राहील याचा नेम नसतो.

स्कूल बस-रस्त्याने जात असेल व ती मुलाना घेण्यास अगर सोडण्यास थांबली असता -इतर वाहनांची दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प थांबून राहते असे एक वेगळेपण येथे आढळले. स्कूल बसच्या स्टोपवर येण्याच्या वेळाही तंतोतंत असतात.

विमानाने या देशात येताच- सिक्युरिटी चेकप होताच आपल्या परतीच्या प्रवासाच्या शेवटच्या दिवसाचा शिक्का - I -94 या फॉर्म वर बसतो. त्या दिवसा पर्यंतच आपल्याला या देशात राहण्याची परवानगी असते. याची मुदत जास्तीत जास्त ६ महिनेच असते. तसेच ६ महिन्याचे आत पुन्हा आल्यास या वेळी तुमची जास्त खोलात चौकशी होऊ शकते असा एकंदरीत अनेकांचा अनुभव आहे.

या देशात मुक्तपणे -फीरता येते. सुप्रीम कोर्ट -स्पेस सेंटर -कॅपिटोल येथे सहज प्रवेश मिळू शकतो. काही ठिकाणी प्रवेश फी असते. आमच्या एकूण प्रवासात फक्त -अना पोलीस येथील -नेव्ही सेंटर पाहतानाच फक्त -फोटो -आय डी प्रुफ असल्याशिवाय आत प्रवेश मिळाला नाही. अश्यावेळी येथे फिरताना आपल्या बरोबर -आपले पासपोर्ट जवळ असल्यास कोणती अडचण येत नाही. पण तो सांभाळणे फार महत्वाचे असते.

आर्थिक व्यवहार सर्व क्रेडीट कार्डने होतात. रोख कॅश बाळगण्याची झंझट येथील लोकांना अजिबात नसते. तसेच- ’’चौकशी काउंटर’’ऐवजी -सर्व ठिकाणांचे नकाशे -रेल्वे -बसचे

वेळापत्रक ठिकठिकाणी स्टेशनवर उपलब्ध असतात त्याचा वापर करण्याची सवय लावून घ्यावी लागते. कारण तुमचे शुद्ध उच्चार-एक्सेन्ट येथील लोकांना समजतीलच याचा भरवसा नाही.

ऑन लाईन -एखादी वस्तू घरपोच सहज येते , व प्रत्यक्ष्य जावून खरेदी पेक्षा स्वस्त मिळते. पुन्हा पसंत न पडल्यास ३ महिन्यात किंवा त्यांच्या स्कीम प्रमाणे बदलून अथवा परतही घेतात. जेवण करण्याचा कंटाळा आला असेल तर लगेच हॉटेलला फोन करून गरमागरम जेवण -पिझ्झा -बर्गर घरपोच मिळू शकते.

येथे घर बदलणे -एक राज्यातून दुसऱ्या राज्यात नोकरी निमित्ताने -जॉब बदलल्याने हे हमखास चालू असते. घरातील सुखसोई सर्वत्र सारख्याच असल्याने व हॉटेल मध्येही तशाच सोई असल्याने फारसा फरक पडत नाही. त्या मुले एक सुरीपणा भासतो. घर भाडे - लाईट- पाणी - ग्यास -ह्या मध्ये पगारातील सुमारे -१/३ रक्कम खर्ची पडते.

परंतु त्याचा पुरेपूर मोबदला -कम्फर्ट-मिळून,-वेळ -श्रम -पैसा याची बचतही होते. लाईट जाण्याची -नळाला पाणी

नसण्याची -ग्यास संपल्याची येथे चिंता अजिबातच आढळत नाही. अखंड पुरवठा चालूच असतो अन वापरलेल्या प्रमाणात बिले ही दर महिन्यास येतच असतात. ती वेळेत भरली की तुम्ही निश्चिंत राहू शकता.

घराचे आजू बाजूस स्वच्छता -हिरवाई - शांत वातावरण नम्रतेने आदबशीर वागणारी मंडळी. कोणी ना अध्यात ना मध्यात,ना भांडणे ना तंटा याने जणू स्वर्गीय सुखाचाच अनुभव घेता येतो.

या आत्यंतिक सूख-सोई बरोबरच ५दिवस कामात पूर्णपणे -बिझी राहायचे - विक एन्डला कार ने आवूटिंग करून फ्रेश व्हायचे अशी येथे प्रथा आहे. घरटी माणसागणिक कार असते. तशी आवश्यकताही असते ते येथे राहताना ध्यानात येते.

इमर्जन्सी- मध्ये फोन करताच -अम्बुलंस -फायर फायटर त्वरित हजरही होतात,त्यामुळे चिंतेचे कारणच उरत नाही.

बॅंक -शासकीय कामेही फोन वर अपोईन्ट- मेंट घेवून त्वरित होत असल्याचे जाणवते.

येथील विविधतेने नटलेला निसर्ग व हवामानातील आत्यंतिक विषमता याचेशी समर्थ पणे तोंड देण्याची मानसिक तयारी-व बळ मात्र आपल्याजवळ असण्याची आवश्यकता असणे आत्यंतिक गरजेचे आहे तरच तुम्ही येथील -स्वर्गीय सुखाचा अनुभव घेवू शकाल.

अश्या सर्व "स्वर्गीय सुख सोई मुळेच "अनेकांची या स्वप्नमय परदेशी"-अमेरीका "यु. एस. ए. दुनियेस भेट देण्याची मनोमन' स्वप्न ' असते त्यात वावगे ते काय -?

त्यासाठी आपल्याजवळ डॉलर कमाईस लागणारी- बौद्धिक हुशारी- योग्यता व सचोटीचे प्रयत्न मात्र हवेच हवे त्यास मात्र पर्याय नाही हेही ध्यानात असू द्या.

त्याचीच येथे- चांदी होते-तर चला तर या संधीचे- सोने करण्याचा-ध्यास घ्या व तयारीस लागा.

स्वप्न उद्याचे आज पडते -चित्र चिमणे गोजिरवाणे.

नयना पुढती दुड दुडते - यातील स्वप्नाचा शोध घ्या.

८ आक्टोबर २०११

**अमेरिकेतील - यंदाचा ( आमचा ) गौरी - गणपती उत्सव. २०११**

.

पर्यटनासाठी - आमचा श्री गणेशा - बैलगाडी पासून विमान प्रवासापर्यंत पोहोचला.

पण वर्षानुवर्षे -"-मूषक-’’हेच वाहन असलेला- गणराज - त्याच वाहनावर बसून मागील वर्षी’’अरबी समुद्र पार करून - आमचे सह इंग्लंडला अबिंगडनला तर या वर्षी अटलानटीक महासागर लीलया तरून -अमेरिकेत -हंडन - व्हर्जिनिया पर्यंत भाद्रपद -शुद्ध चतुर्थीला वेळेवरच पोहोचले सुद्धा. ( १ सप्टेंबर - २०११ ).

घरातील छोटेशे टेबल हॉलमध्ये ठेवले त्यावर - रंगीबेरंगी-’’क्विल्ट’’पांघरून ते सजविण्यात आले. -डॉलर - स्टोअरमध्ये उपलब्ध झालेले लाल रंगाचे कार्डशिट -कागदी रिबीन्स -जांभळी -पिवळी फुले झुर्मुल्या अशी डेकोरेशन साहित्याची जमवाजमवी करून सून-बाई सौ प्राजक्ताने हौसेने मखर तयार केले. एका जाड जूड पुस्तकाचा आधर घेऊनच त्या

विद्देच्या देवतेचे -आसन लाल रंगाच्या रुमालाने कव्हर करण्यात आले. अश्या तऱ्हेने पूर्व- रंग सजले.

सकाळी- गणेशाचे आगमनाची तयारी सुरु झाली. कलशामध्ये विड्याची पाने -नारळ ठेंवून सजविला. गणेशाची छोटी चांदीची मूर्ती-''इको फ्रेंडली''अशी आम्ही गेल्या काही वर्षापासून बसवीत आहोत. त्यामुळे फारच सोयीचे व गजानन ही खुश आहेत. त्यामुळेच ते देशोदेशीचे पर्यटन काळातही -आरामात आमचे -सहाय्यास येत आहेत व कृपाशीर्वाद देत आहेत. नव्याने आलेल्या सुनानाही परदेशातही -लम्बोदराची- लांबवर राहून ही सेवा करण्याचा लाभ होत आहे. हे ही नसे थोडके.

मागील वर्षी- मोठ्या सुनेने सौ. अश्विनीने- इंग्लंडला गणपती -प्रतीष्ठापनेचा आनंद घेतला. या वर्षी''श्री''स भेटण्यास -''अनंत चतुर्थीच्या ''एक दिवस अगोदरच सह कुटुंब येथे हजर झाली आहे. त्यासाठी लागणारा- यु. एस. -व्हिसाची सोय- वक्रतून्डाने काळजीपूर्वक - एक महिना अगोदरच करून- ''वरदहस्त''- कायम ठेवला आहे. त्यामुळे अनंत चतुर्दशीचा

सोहळा चांगलाच रंगणार तर. याचा आनंद घेण्यास सर्व जण उत्साहात होतोच.

एकदंताची -यथासांग''प्रतिष्ठापना''करून -सुख-कर्ता-दुःखहर्त्याचे आगमन झाले. मोदकाचा नैवेद्य. तसेच उपलब्ध फुले अर्पून पूजा करण्यात आली. यंदा हळद-कुंकू -पान- सुपारी -गुळ -खोबरे -अक्षता -गुलाल -घंटी -कापूर -उदबत्ती व फुलवात अश्या- फुल तयारीतच गणेश- आगमन झाले. त्यामुळे मागील वर्षीची- त्रूटीची भरपाई भरगच्चपणे झाली होती.

बाहेर जवळच-हिरवा निसर्ग -उन पावसाच्या खेळात रमला होताच. हिरव्यागार - कोवळया लुसलुशीत दुर्वा -विविध झाडांची पाने -लाल- पिवळी- जांभळी -पांढरी फुले व रंगीबेरंगी-''फॉलची''नांदी देणारी ''पाने ''याने तबक सजत असे. त्याने- भक्ती भावाचा रंगही अधिकच खुलत असे.

यथावकाश- गौरी पूजनाची तयारीची- लगबग सुरू झाली. गोडधोड पदार्थ तसेच चकली वगैरेची पूर्व - तयारी केली होतीच. आता कृतीची जरुरी होती. गौरी आवाहनही झोकात झाले. यंदा प्रथमच सौ. जयश्रीचे- मार्गदर्शनाखाली सुनबाई सौ. प्राजक्ताने गौरी आवाहन केले. त्यामुळे पुढील पिढीस ही घरचे

-कुलाचार माहिती झाले याचे समाधानाने मन प्रसन्न झाले. भाजी - भाकरी, -कढी - थालीपीठ,-तसेच पारंपारिक पुरण पोळीचा बेत होताच. लाडू -चकली -चिरोटे -करंज्या -फळे अश्या पदार्थांची- झलकही दूर वरच्या -अमेरिकेत असूनही '"गौराईस यथाशक्ती"-प्रयत्न पूर्वक दाखविण्यात आली.

एकदन्ताचे-भेटीस ,माहेरपणास येणारी -"गौराई "हीचे तीन दिवसासाठी आगमन होते. आपापल्या घरातील परंपरे नुसार याची एकत्रित मांडणी ,सजावट केली जाते. गौरी आपल्या बरोबर येताना , घरातील भाविकांसाठी मुलाबाळांसाठी. धनधान्य -सुख- शांती - समृद्धी -आयुरारोग्य - व आनंदी आनंद घेऊन येते असे मानले जाते. त्यासाठी तिचे दर्शनास-'"आप्त-स्वकीय"भाविकपणे पूजन करून दर्शन व प्रसादाचा लाभ -आवर्जून घेतात अशी आपली परंपरा आहे.

येथे मिलिंदचा- मित्र स्वप्नील कार्येकर ,तुषार गोखले -त्याची नव वधू सौ. निशा, सौ. प्राजक्ताची आते बहिण बाल्टी मोअरचे सौ. श्वेता व श्री. सचिन वायचळकर व त्यांची मुले चि. अमृता -व जय तसेच आमचे अपार्टमेंट मधील सौ. व श्री खेडकर यांची मुलगी रुचा आणि सौ व श्री. डाबरे त्यांची दोन

गोड मुले चि. एमिली व सोफिया व घरातील आम्ही सर्वजण असा सर्वांनी मिळून. गौरी - गणपतीचे -पुरण पोळी नैवेद्याचा प्रसादाचा लाभ घेतला. स्वप्नीलने "स्व-हस्ते"-गोडाचा शिरा उत्तम पणे बनवून आणला होता. परदेशात उच्च - शिक्षणाबरोबरच आता -उत्तम स्वैपाकी ही बनत असल्याची खात्रीच त्यामुळे झाली. त्यानेच हा कार्यक्रमही भरगच्च भोजन व प्रसादाचा आनंद देऊन गेला.

सुख कर्ता -दुःख हर्ता- या सुस्वर - आरती बरोबरच , मंत्र पुष्पांजली ,गणपती अथर्वशीर्ष ,संकटनाशन स्तोत्र याचे पठणही दररोज होई. अश्या भावपूर्ण वातावरणाने दहा दिवस घरातील वातावरण सुगंधीत -सुरेल -व भक्तिमय रसाने भारावून जाई व मन:शांती ही मिळे अन भक्तीला ही पूर अन नवा सूर येई.

मायदेशापासून दूर असूनही-"वेब क्यामेर्याचे सहाय्याने"-तिकडील आप्त स्वकीय -"-दूर दर्शनाचा"-लाभ घेत होते व आरतीला उपस्थित राहिल्याचे आत्मिक समाधानही मिळवीत होते ते सुख काही वेगळेच आणि

आगळेच असे होते. स्काय पी -गुगलची कमाल आणि आपली मात्र -धमाल चालू असते.

अनंत चतुर्दशी -९ ११-सकाळीच मंदार - अश्विनी आम्ही सकाळी घरामागील- निर्झर -व छोट्या जंगलातील सफर करून आलो. येताना दुर्वा -फुले -पाने असा फ्रेश- वाण आणला. अनुष्का बरोबर - छान छान गुलाबाची फुले पूजेसाठी घेतली. जोशात आरती झाली. कालच इंग्लंडहून ही कंपनी इकडे आली आहेत. आता गणपती विसर्जना नंतर उद्या पासून त्यांचे - अमेरिका दर्शनाचा श्री गणेशा होणार त्याचीच आज झलक सुरु केली. नैवैद्यासाठी -उकडीचे मोदक-!

गणपती विसर्जन-

नैवेद्य दाखवून सर्वजण गणपती बाप्पास समारोप देण्यास सज्ज झालो. /गणपती बाप्पा मोरया -पुढच्या वर्षी लवकर या.!या स्वरात - स्वप्नील -मिलिंद -मंदार -अश्विनी -प्राजक्ता - जयश्री -अनुष्का -सामील झाले. व आम्ही दहा दिवस भक्ती - भावाने पुजलेल्या मूर्तीस -गणपती बाप्पा मोरया -पुढच्या वर्षी लवकर या.!च्या गजरात घरातच ,श्रींची मूर्ती पाण्यात विसर्जन करून भावपूर्ण निरोप दिला. अश्या प्रकारे ६ महिन्यापूर्वी -

आम्ही एकमेकांपासून -हजारो मैल दूर होतो या भावनेतील अंतर-खरेच- झिरो झाले होते. जाता जाता ,अमेरिकेची वारी घडलेल्या ‘‘पिंगाक्षाने ‘‘पुढील-तब्बल * २१ * दिवस आम्हासही एकत्रित -राहण्याचा व -"फ्लोरिडा - ओल्र्यान्डो टूर ‘‘घडविण्याचा’’कृपाप्रसाद ‘‘दिला आहे. त्याचे तयारीचा आम्ही आता -श्री गणेशा -करीत आहोत तो आनंदही वेगळाच आहे.

अश्या रीतीने यंदा- २०११ चा नेहमीचा -पुण्यातील -१७१ ,घोरपडे पेठ पुणे -येथील’’लक्ष्मी-छायेतील’’लम्बोदराच्या- भक्तीभावाचा लाभ- पश्चिमेकडे- लांबवर पडणाऱ्या- सावलीप्रमाणे थेट अमेरिकेतील - ‘‘एकत्र ‘‘भेटीचा (भारत + इंग्लंड + अमेरिका ) त्रिवेणी -संगम रूपाने झाला आहे. हा आनंद द्विगुणीत करणारा व चिरकाल स्मरणात राहील असाही झाला. अश्या ऐतिहासिक भेटीच्या योग घडवून आणल्या बद्दल त्या -एक दंतास -त्रिवार अभिवादन!-.’’

‘‘गणपती बाप्पा मोरया -पुढच्या वर्षी लवकर या.’’-!

# अमेरिकेतील -नव्हे जगातील उंच स्मारक

-

साद- देती हिम शिखरे- शुभ्र पर्वतांची -/

हिमालय हा नैसर्गिक उंच पर्वत आहे. त्याची बरोबरी तर करणे केवळ अशयक्य. पण माणूस हा मोठा कल्पक प्राणी आहे. तो आपल्या कल्पकतेने निसर्गाची बरोबरी करू पहातो आहे. याची साक्ष म्हणजे''वाशिंग्टन येथील''वाशिंग्टन मोन्युमेंट ''हे - ५५५ फुट उंच- संपूर्ण मार्बल -ग्र्यानाईटचे - येथील लोकप्रिय महान योद्धा - जॉर्ज वाशिंग्टन याचे स्मरणार्थ उभारलेले जगातील उंच प्रसिद्ध स्मारक.

देश मोठा- की माणूस -खरे तर देशातील थोरामोठ्या माणसांमुळेच तो देश आपोआप मोठा होत जातो. लोकप्रिय योध्याने- ब्रिटन बरोबर झालेल्या युद्धात विजय मिळवून अमेरिकेस स्वतंत्र केले व अमेरिकेचा पहिला प्रेसिडेंट होण्याचा मानही पटकाविला.



वाशिंग्टन येथे आल्यावर या स्मारकाचे प्रथम दर्शन घेतल्यास त्यावरून आपोआपच संपूर्ण वाशिंग्टन शहराचे गरुड भरारी -दर्शन घेता येते. फ्री एन्ट्री -असली तरी आपली तिकिटे व त्यास द्यावयाच्या भेटीची वेळ ठरवून घ्यावी लागते.

एका भव्य अश्या विशाल मैदानावर - सभोवतालच्या हिरवळीवर उत्तुंग चौरसाकृती संगम रवराचे स्मारक. वरील टोकाचा भाग निमुळता पिऱ्यामिड सारखा. भोवती अमेरिकन झेंड्यानी अखंड फेर धरलेला आहे. बसण्यासाठी संगमरवरी लांबलचक बेंच. आपआपल्या वेळे नुसार आत एन्ट्री मिळते. आत मधील ए. सी. लिफ्टमधून एका वेळेस १० -१२ जणांना वरपर्यंत घेऊन जाते. तेथून चारही बाजूचे अखंड विहंगम दृश्य पाहण्यास जाड काचेची मोठी तावदाने. त्यामधून संपूर्ण शहराचे विहंगम नेत्र सुखद दर्शन उंचावरून पाहण्यास मिळते.

रात्रीचे अंधारात आजू बाजूची सर्व मुख्य स्मारके दिव्यांनी उजळून निघतात. दिवाळीतील सुंदर भव्य किल्ला पहावा तसे भासते. एका बाजूस युएस कॅपिटोल-एका बाजूस व्हाईट हाउस '-तिसऱ्या बाजूस असणारे वॉर मेमोरियल अन लिंकन मेमोरिअल ,अन चौथ्या बाजूस जणू बेटावर असल्याचे

भासणारे पोटोम्याक नदीच्या- कुशीतील “रोनाल्ड रेगन डी. सी. विमान तळ. एका बेटावर असल्याचा भास होतो. विमानांचे ल्यानडिंग -व फ्लाइंगही किल्ल्यातील चिमुकल्या विमानाप्रमाणे मोहक दिसते. “टायडल बेसिन”हे बेसिनच्या आकाराचे मोठे तळे व सभोवती जपानी- चेरीची बाग.

१८४८ ते १८८४ या काळात बांधल्या गेलेल्या व मध्येच फंड्स अभावी खंडित झालेले हे स्मारक त्यामुळे दोन रंगाच्या मार्बल मध्ये तयार झालेले दिसते.

हे स्मारक पहात असताना- ब्रिटनचे आयकॉन असलेले -"लंडन आयच्या”पारदर्शक कॅप्सूल्स मधून पाहिलेल्या लंडन शहराच्या - २००७ मधील सुखद स्मृती जागृत झाल्या.

दुसरी आठवण झाली ती- १९८६च्या -”संगे मरमरका -आग्र्याच्या ताज महालची. एक आहे शुभ्र धवल असे पत्नीवरील निस्सीम प्रेमाचे प्रतिक व कलाकुसरीचा असामान्य नमुना तर हे- आहे देशभक्तावरील पराक्रमाच्या -अभिमानाच्या उच्च पराकोटीची परीसीमा. आजही ह्या स्मारकाचे रुपात- ताडासनात- उभे राहून जॉर्ज वाशिंग्टन आपल्या देशाच्या संरक्षणाची जबाबदारी अविरत पार पाडत असल्याचे दिसते

,आणि “मरावे -परी कीर्ती रुपी उरावे”.! या शब्दांना खरा अर्थ प्राप्त होतो तो यासारख्या देश प्रेमींच्या स्वार्थ त्यागाने.

मनसोक्तपणे- वरील दृष्ये कॅमेऱ्यात साठवून ठेवत व डोळाभरून पहात वेळ कसा जातो ते कळतही नाही.

जगातील एका ऐतिहासिक वास्तूच्या सहवासाची. खुणगाठ मनाशी बांधून व- पर्यटन खात्यात जमा करून परतीच्या लिफ्टसाठी कांही पायऱ्या उतरून यावे लागते. खाली येताना त्या मनोऱ्याच्या आतील बाजूसही काही अप्रतिम कलाकृतीच्या कोनशिलेचेही दर्शनही गाईड आपणास दाखवीत असतो. खाली येऊन पुन्हा त्या वास्तूची-”टोक केलेल्या पेन्सिली “प्रमाणे दिसणाऱ्या प्रतिमेसह फोटो काढून त्या थोर स्मारकाचा आम्ही निरोप घेतला. आणि अमेरिकेतील एक रात्र -”अरेबियन नाईट”च्या - आविर्भावात संपुष्टात आली.

# यॉर्क- ते न्यू- यॉर्क -

****

म्यांचेस्टर मार्गे - यॉर्क -इंग्लंड मधील प्रवास-(-सप्टेंबर-२००७ ), आज- वाशिंग्टन मार्गे (ऑगस्ट -२०११) अमेरिकेचे प्रवेश द्वार -न्यू यॉर्क येथे येवून पोहोचला. येताना दुतर्फा उंच उंच दिसणारी- झाडांची हिरवीगार भिंतीची तटबंदी भिंत - नेवार्क विमानतळावरील विमाने बसमधून -दिसू लागताच दृष्टी आड होते. अन दूरवर उंच बाहुल्या प्रमाणे एकत्र गर्दीकरून आपापली मान उंचावणाऱ्या काचेच्या शालुने लपेटलेल्या, दाटीवाटीने उभ्या असलेल्या इमारतींचे दूर-दर्शन होते व न्यू-यॉर्क आल्याची चाहूल लागते. न्यू जर्सी. या लगतच्या शहरातूनच लांबलचक अश्या -हडसन नदीतील -लिंकन टनेल मधूनच आपल्याला न्यू योर्क शहराची वाट मोकळी होते.

एलीस- आयलंड वरील''स्टयाचू ऑफ लिबर्टी ''या फ्रेंच मित्राकडून अमेरिकेस मिळालेल्या तांब्याचे धातूची असल्याने - हिरव्या पडलेल्या भेट वस्तूने ने तेवढ्याच दिमाखात आमचेही स्वागत मूकपणे हातातातील मशाल उंचावून केले. हा धातूचा देखण्या स्त्रीचा डाव्या हातात पुस्तक

व उजव्या हातात मशाल घेवून अमेरिकेची- दैदिप्यमान वाट दाखविणारा हा पुतळा एकूण ३०० वेगवेगळया होणाऱ्या भागांचा बनलेला आहे. तिचे दर्शन घेण्यासाठी - सिक्य्वूरीटी- चेकअप ओघाने आलेच. त्यामुळे युरोपातून- ३०० वर्ष्या पूर्वी आलेल्यांची इमिग्रेशन चेकप ची झलकच झाली म्हणाना. सुरवातीपासूनच या देशात येतानाची ही पद्धत असल्याने स्वतःचे वेगळेपण अमेरिकेने - जपले आहे. याचा सर्व इतिहास या येथील एलीस आयलंड वरील भव्य दालनात ३० मिनिटानचा सिनेमा व रजिस्टर -त्यावेळच्या प्रवासी ब्यागा - फोटो माध्यमातून पहावयास मिळतो. विस्तृत अश्या चांदणीच्या आकाराचे चोथर्यावर हा भव्य - पुतळा अटलांटिक महासागरातील बेटावर उभारलेला आहे. त्या पुतळ्याचे तळाशी ,१५६ पायऱ्या चढून जातायेते. व सभोवतालच्या महाकाय -महासागराचे भन्नाट सुटलेल्या वाऱ्या संगे खेळत राहून अवलोकन करता येते.

ब्याटरी पार्क येथील स्टेटन आयलंड फेरी मधून असंख्य देशी विदेशी नागरिक मोफत प्रवासाचा आनंद मुक्त पणे घेताना दिसतात. म्यानहटन डाऊन टाउन मध्ये फिरण्यास (ब्याटरी पार्क

- ब्रुकलीन) ह्या काही मार्गावर मोफत बसेस आहेत त्यामुळे पायावरील चालण्याचा भार सुखावह होतो. अन्यथा पायी भटकंती शिवाय पर्याय नाही.

१००-१०० मजली देखण्या इमारतीची देखणी मालिकाच येथे पहावयास मिळते. निसर्गाची हिरवाई आता अभावानेच- बागेच्या स्वरुपात दिसू लागते. त्याची भरपाई मात्र-ब्रुकलीन ब्रिज -हडसन नदीचे सागरात बेमालूमपणे सामावलेले पात्र खळाळणार्या लाटांवर नाचणारी -बागडणारी लहानमोठी -पांढरी -केशरी -निळया रंगांची जहाजे -वाटर बसेस अन वेगात पळणाऱ्या स्कूटर्स व क्षितिजाचा शोध घेत जाणारे व दररोज नव्या सूर्य बिम्बास जन्म देणारे नयनमनोहारी दृश्य पाहून निघते

स्टेट एम्पायर -च्या ८० व्या मजल्यावरील त्या इमारतीचा फोटोजनिक इतिहास जाणून घेता येतो , -व ८६ व्या मजल्यावरून दिसणारे रात्रीचे लक्ष लक्ष दीपांनी नेत्रांना तृप्त करीत उजळलेले चौफेर दिवे नेत्र दिपवून तर टाकतातच. पण त्यासाठीची रात्रीची पाहण्याची शिस्त बद्ध सोय व क्षणात

तुम्हाला ८० -८६ मजले घेवून जाणारे उद्वाहक -(लिफ्ट )हे सारे प्रत्यक्ष अनुभवले




वॉल स्ट्रीट-म्हणजे जणू न्यूयॉर्कच्या हृदयाची धडकनच. कारण याच रस्त्यावर न्यू यॉर्क स्टोक एक्स्चेंज ची भव्य इमारत आहे. बाजूलाच पहीले प्रेसिडेंट जॉर्ज वाशिंग्टन यांनी शपथ ग्रहण केलेला हॉल आहे. थोड्याच अंतरावर दैनंदिन शेअर - स्टोक मार्केट हलवून सोडणारा-उसळणारा- बैल ,अर्थात पितळी धातूचा चौकात धुमाकूळ घालत असलेला दिसतो.

शेअर बाजार चढला अन उतरला तर त्यास -बुल -व- बेअर अशी संज्ञा व्यापारी जगतात असल्याची नवी माहिती मिळाली. त्याचेच हे प्रतीकात्मक रूप. त्यांचे सह फोटो काढण्यासही- हौशी - पर्यटकही त्यांचे बरोबर उसळी घेताना पहावयास मिळतात.




"टाईम स्क्वेअर"-हा रात्रीचे वेळी -वेळ काळाचे भान विसरायला लावणारा चौक. निओन साईनचा झगमगाट पाहण्यात दंग झालेली देशोदेशीची आबाल थोर मंडळी ,म्हणजे

-पुण्यातील गणपती -व दिवाळीतील लक्ष्मी रोडची रात्र जागविणारी- मेगा आवृतीच. आपापल्या क्यामेऱ्यात बंदिस्त करून ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्नही करण्यात दंग असतात. येथील इमारतींचे टोकाचे दर्शन घ्यावयाचे झाल्यास मानेला -पूर्णपणे मागे खेचावेच लागते त्याशिवाय नजर- पुढे सरकतच नाही हे मात्र १०० टक्के अनुभवास येते.

"ब्रुकलीन ब्रिज"-हा असाच एक ऐतिहासिक हडसन नदीवरील दगडी देखणा पूल जो न्यू योर्क व ब्रुकलीन मधील भरभक्कम दुवा. एव्हडी सारी रपेट मारल्यानंतर"स्टार बक्स "मधील चहा म्हणजे आपल्याकडील अमृततुल्यच त्याचा आस्वाद घेतल्यावाचून गत्यंतरच नसते. अन पुन्हा नव्या दमाने पायपीट करीत -परतीच्या मेट्रोसाठी -पार्थ -स्टेशन कडे आगेकूच करावी लागते.


BUMP
AHEAD
WARNING!

“पाथ स्टेशन”-म्यानहटन डाऊन टाऊन- परिसर हा तर अगदी जिव्हाळयाचा बनलेला परिसर. याच पाथ स्टेशनच्या डाव्या व उजव्या हाताला -झिरो-ग्राउंड -नावाने ओळखल्या जाणाऱ्या -भूत काळातील - १० वर्ष्या पूर्वी - अमेरिकेच्या हृदयावर कोरलेल्या जखमांची अर्थात -वर्ल्ड ट्रेड सेंटर -या अती उंच इमारतीवर झालेल्या विमान हल्ल्याची -, असंख्य निष्पाप लोकांचा बळी घेतलेल्या घटनेची आठवणींचा- मूक संदेश देणारा ठेवा.

सध्या त्यापैकी- एक टोवर पुन्हा दिमाखात उभा राहण्यास -न्यू -वर्ल्ड फिनान्शीयल सेंटर-(न्यू वर्ल्ड ट्रेड सेंटर) या नावाने उंच उभारी घेत असल्याचे दिसून येते.

अमेरिकेतील माणसांच्या हृदयातील या- कोंदणास लवकरच मूर्त स्वरूप यावे यासाठी - १२०० कामगार रोज तेथे आपली हजेरी लावत आहेत व एक भव्य दिव्य देखणे उंची शिल्प “पुनश्च्य “तयार करण्यात मग्न आहेत हे दिसून येते.



एका- माथेफिरू माणसाने मोह -गर्व -व अतिरेकाचा कळस करून ,आधुनिक विमानांचे मदतीने जीवावर उदार होण्यास भाग पाडून माणसा करवीच ते दोन- हिरे क्षणार्धात जमीनदोस्त करून, धुळीस मिळाले. तो -दुर्दिन म्हणजेच -९ /११ , ची २००१ ची घटना.

ते स्थान प्रत्यक्ष पाहताना- क्षणभर. त्या दुर्दैवी घटनेच्या बातम्या दूर वरून पाहिल्याचे स्मरणाने मन गहिवरले.

माणसातच देव- व माणसातच- दानव असतो याचीच ती- प्रचीती दुसरे काय.?

थर्टी थर्ड स्ट्रीट ते जर्नल स्क्वेअर. या स्टेशन दरम्यान दोन तीन वेळा न्यू योर्क ते न्यू जर्सी असा पाथ प्रवास सुखकर रीतीने पार पडला व आमची न्यु-योर्क दर्शन सहल सुफळ संपूर्ण झाली. यात सिंहाचा वाटा होता - श्री. भसाळे यांचे मेव्हणे श्री. किरण बारटक्के यांचे जावई व कन्या श्री. ललित व सौ. गौरी चवाथे व त्यांची कन्या चि. रुचा वय वर्ष २. यांच्या घरातील आदरा तिथ्याने,रुचकर भोजनाने व रुचाचे असंख्य बोबड्या गप्पांनी -दिवसभराचा श्रम परिहार -विना सायास होत असे.

त्यांचे सह जागविलेली”टाईम स्क्वेअर “परिसरातील रात्र व “ग्र्यांड 'सेन्ट्रल' टर्मिनस”ह्या देखण्या स्टेशन मधील भटकंती कायमच स्मरणात राहील अशीच झाली.

लिबर्टी स्त्याचू- येथे भटकंती करण्यास आलेले श्री. कमलाकर भसाळे यांचे जावई श्री. निखील खटावकर व सौ. गौरी व त्यांची मुले देबाशिष व वैदेही यांची ही अनपेक्षीतपणे गाठ भेट ओळख झाली त्यांनी आणलेले -रव्याचे लाडू -त्या बेटावर - चाखताना एक वेगळीच गोडी निर्माण झाली ती कायमची.

आमचे, उत्साही व्याही श्री. चंद्रकांत भसाळे यांनी अमेरिकेच्या मूळ- १३ राज्यांचे एकेक प्रतिनिधी आमच्या सेवेसाठी अगोदरच मूकर्रर केल्याने आमची बाल्टी मोअर ट्रीप झाली. कनेक्टिकट -ची ट्रीप मात्र वेळे अभावी इच्छा असूनही - होऊ शकली नाही. यांचे थोडे वाईट ही वाटले. पण थोडा पाहुणचार पुढच्या वेळेस ठेवलेला बरा नाही का -? आणि अती सर्वत्र वर्जयेत.! असेच बरे नाही का.?

कारण- -चवाथे-न्युयोर्क ,खटावकर -शिकागो ,मुळे-कनेक्टिकट ,वायचळकर-बाल्टीमोअर , दिंगणकर -स्यान दियागो ,शिंपी -बोस्टन ,चुटके -आयोवा ,वनारसे - अटलांता , अशोक काकडे -क्यालिफोर्निया ,ओतूरकर -न्यू हम्प्श्याअर ,मिलिंद- हन्डन,स्वरदा - मिनिया पोलीस ,शशी पाटील - सियाटल -अशी फौज तयार आहेच. त्यामुळे कांही काळजी नाही. असो न्यू योर्क मधील उंच टोवर-प्रमाणे लांबलेले न्यू-योर्कचे -आधुनिक. पुराण आवरते घेतो.

दिनांक -२६ ऑगस्ट २०११ रोजी- ग्रीफित स्ट्रीट वरून सौ. गौरीने आमचा - छोट्या -रुचा- सह त्यांचे कारने. न्यू जर्सीच्या पाथ स्टेशनवर ड्रोप करून हृद्य - निरोप घेतला. -परत पुन्हा असेच कधी तरी भेटण्यासाठी. -

२७ ऑगस्ट २०११

## अमेरिकेत भेटलेले सुहृद -मार्कुस. (. परीस स्पर्श जणू )

'गुरुवार '

दिनांक ४ ऑगस्ट २०११

फ्रेंड इन- नीड ईज- अ फ्रेंड- इन डीड.!

अमेरिकेत- येऊन महिना झाला होता. दररोज पायी फिरण्यास आम्ही सगळेजण जात असू. इतर वेळेस कधी कधी मी एकटाच फिरत असे. येथे पायी फिरणारे फारच''दुर्मिळ "लोक असतात. त्यामुळे फिरताना- एकाकी वाटे. जोडीला कोणीतरी सम विचारी मनमोकळ्या गप्पा मारण्यासाठी असावे मनात येई. असेच एके दिवशी शेजारच्याच अपार्टमेंट मध्ये त्यांच्या मुलाकडे -वसईहून आपल्या पत्नीसह आलेले- ''मार्कुस"यांची भेट झाली. ७० ,वर्षाचे तरुणच. काळेभोर भरपूर केस डोक्यावर राखून असलेले, उंच शिडशिडीत बांध्याचे,व्यसन मुक्त अश्या प्रसन्नतेच्या चेहऱ्याचे. तरुणच जणू. तेही फिरायला जाताना- जोडीदाराचे शोधात होतेच.

* दोन - जेष्ठांची होते- अशी अमेरिकेत भेट -

सुरेल - सुरांच्या- झनकारांची फुटे. नवी पाऊल वाट -*



दररोज नित्य नियमाने आम्ही भेटू लागलो. नवनव्या विचारांची -गप्पांची मैफल रंगू लागली. सायंकाळच्या भटकंतीत नवेनवे स्नेहाचे - रंग क्षितिजावर फुटू लागले. इतिहासाचे अभ्यासातील पदवीधर , एके काळचे -"व्होल्टास कंपनीत कामास असलेले -तेथील कामगार युनियनचे सेक्रेटरी पद भूषविलेले व -आपल्या परखड विचारांनी कामगारांना सुयोग्य- मार्गदर्शक म्हणून लाभलेले असे हे- मार्कुस डाबरे. तरुणपणाचा काहीकाळ तडफदार नेते- जॉर्ज फर्नांडीस -यांच्या सहवासात घालविल्याने त्यांच्या वक्तृत्वाची छाप लोकांच्या- हृदया पर्यंत पोहोचत होती. त्यामुळेच वसई नगरपालिकेचे -

नगरसेवक पद भूषविण्याची व वसईकरांच्या तोंडचे पाणी पळविणारी-पाण्याची समस्या दूर करण्याच्या - महतकार्याचे ते शिल्पकार झाले.''हरित वसई''-हे पुस्तकही त्यांचे लेखणीतून-झरझर पाझरले.

काँग्रेसच्या जेष्ठ उमेदवाराचा- पराभव करून निवडून आले खरे पण- तो कार्यकाल-यशस्वीपणे पूर्ण करून पाय उतार झाले -'ते पुन्हा- या अश्या छोट्या वसई गावातीलच - कांही भली माणसे -दुरावणाऱ्या -निवडणुकीच्या भानगडीत -न - पडण्याच्या- ठाम निश्चयानेच ,गावातील स्नेहपूर्ण माणूसपण अखंडपणे जपण्यासाठी. त्यांनी अनेक सामान्य माणसांना - तंबाखू व्यसन- त्यास युक्तीच्या चार गोष्टींने पटवून दूर करण्यास उद्युक्त केले आहे.

स्वतः कॅथोलिक ख्रिस्ती -असूनही धर्माला - घराच्या- उंबऱ्याची- लक्ष्मण रेषेची मर्यादा. - केंव्हाच अधोरेखित करून घेतलीआहे. सर्व धर्मातील रंजल्या गांजल्याचे पाठीशी एक - आधारवड बनून राहिले आहेत वसई -"पापडीतील "हे लोकप्रिय मार्कुस. समाज प्रबोधनासाठी- ज्ञान -मनोरंजनासाठी- व्यापारी जाहिराती "नसणारे"- "वसई टाईम्स"-नावाचे १६

पानांचे छोटेसे. संपादित मासिकही वसईतील मराठी भाषिकांची रुची जपण्यासाठी आजही सुरु आहे. त्यामध्ये त्यांना आवडलेला माझा’’नायगरा’’-धब -धबा यावरील लेख-ऑगस्ट -२०११च्या अंकात इथूनच संबंधिताना योग्य सूचना देऊन छापूनही आणला आहे. त्यामुळे आनंद झाला व खऱ्या मैत्रीचे बंध आगामी' रक्षाबंधाना ' पुर्वीच घट्ट झाले आहेत.

मार्कुस यांचे वडीलही ‘‘रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर’’- (हा आमच्या मैत्रीतील एक समान भक्कम धागा )- ब्रिटीश काळची शिस्त अनुभवलेले. त्यामुळे घरात शिस्तीचे व अभ्यासू वातावरण होते. सहधर्मचारीणी. सौ. क्याथरीन मार्कुस डाबरे ,त्यांच्या समाजातील पहिल्या ( सायन्स ) पदवीधर महिला. त्याही शिक्षक पदावरून पुढे सायन्स कॉलेजच्या प्राचार्या - म्हणून निवृत्त झाल्या आहेत. वसईच्या मातीत - व घरात जपलेले- मराठी भाषे वरील प्रेम- त्यांची अमेरिकेतील नाती - चि. एमिली व सोफिया पर्यंत दूर देशीही सहजपणे झिरपले आहे हे- एमिलीच्या मराठीच्या सहजपणे बोलण्यातून जाणवते.

क्रिकेटवरील प्रेमापोटी मुलांची नावे असलेली -' विजय ' व ' सुनील '- ही -त्यांची दोन्ही कॉम्पुटर इंजिनीअर - पदवीधर-

मुले. घरातील शैक्षणिक वारसा थेट साता -समुद्रा- पलीकडे अमेरिकेत घेऊन गेली आहेत. १० -१२ वर्षापासून आपल्या स्वकर्तुत्वाचे बळावर - डॉलर्स -तसेच ग्रीन कार्ड धारक होऊन अमेरिकेतील मेरील्यांड -व -हन्डनच्या मातीत रुजली आहेत व त्यांचे संसारही - चि. क्यारलीन-जस्टीन , व एमिली - सोफिया या सुंदर - फुलांनी फुललेही आहेत. अश्या फुलांना मायेचे - प्रेमाचे -ठिबक सिंचन करण्यासाठी डाबरे पती- पत्नी यंदा अमेरीकेची तिसरीवारी करत आहेत. रिझर्व ब्यान्केतून सेवा निवृत्त झालेले हरहुन्नरी- व्याही श्री. परेरा पती -पत्नी यांचीही योग्य साथ त्यांना मिळत आहे.

कामाच्या निमित्ताने -भारतभर तर. पर्यटनाचे आवडीने फ्रान्स-इटली -रोम -फिरलेले श्री. मार्कुस डाबरे हे ऐतिहासिक -ज्ञान व अनुभव संपन्न असे जेष्ठ नागरिक बनले आहेत हे त्यांच्याशी मनमोकळया गप्पा मारताना समजून येते. तश्यातच ते एकेकाळी -मधुर चवीच्या-' केळीसाठी ' प्रसिद्ध असलेल्या वसईचे. अर्थात कोकण- किनार पट्टीतील रहिवासी. अर्थातच -

कोकणची माणसे साधी भोळी -! काळजात त्यांच्या भरली शहाळी-!

या शब्दांना नवा अर्थ प्राप्त करून देणारे असेच आहेत. केळ जसे हिरवे -पिवळे -असे सुंदर तनुचे - नंतरच्या ठिपक्यांनी त्याच्यात तर अधिकाधिक गोडी येत जाते तसेच कांहीसे -"स्नेह पूर्ण अश्या दररोजच्या 'मार्कुस ' यांचे बरोबरील गप्पात एक वेगळीच मिठास येत आहे. वसईची-' मराठी 'ही पुण्याच्या - पेशवांच्या वास्तव्याने अधिकच मधाळ झाली असावी.

वसईचेच- सुपुत्र असल्याने. ते आता आधुनिक - ”वसईच्या झपाट्याने बदलणाऱ्या स्वरूपाने “कांहीसे व्यथित होतात हे जाणवते. परंतु -कालाय तस्मै : नमः.! याचीही त्यांना तितकीच जाण आहे.

असो-दहा वर्षांनी मोठे असणारे असे- सक्ख्या भावाप्रमाणे दररोजच्या- आमच्या “भरत भेटीत”- ज्ञान - स्नेहाचे ठिबक सिंचन करणारे - मार्कुस यांनी-”जीवन,- आनंदात अन निरपेक्षपणे जगण्यातच खरा -श्री-राम -आहे “हे स्वानुभवाने व कृतीने दाखवून दिले आहे. त्याच “दीप-स्तंभाचे “प्रकाश झोताने आमची- पुढील. वानप्रस्थ. आयुष्याची वाटचाल- सुखावह होणार आहे यात शंका नाही. त्यांच्याच प्रेरणेने- -"आयुष्यावर लिहू -काही”-!- या लेख मालिकेची

कांही पानाचे लिखाण माझे हातून,- न संपणाऱ्या शाईच्या - पी. सी.च्या पेनातून होत आहे. - ही. मोरपंखी - आठवण आयुष्यभर- प्रेरणा देणारी अशीच रहाणार आहे.

लवकरच ते आपल्या -माय देशात परत आपल्या सग्या- सोयर्यात त्यांच्या सुख -दु:खात रमण्यास- वसईला. प्रस्थान करत आहेत.

“. शुभास्ते पन्थान :.! /-"

अश्या सुहृदास- यापुढील आरोग्य संपन्न- -दीर्घायू वाटचालीस व आमच्या,. अमेरिकेत अंकुरलेल्या “मैत्रीचा वेल” असाच - वारंवार होत राहणाऱ्या - “पुनर्भेटीसाठी”. बहरत राहण्यास मनःपूर्वक शुभेच्छा.!

ऋणानुबंधाच्या-इथेच - पडल्या- गाठी -! भेटीत तुष्टता- मोठी.!

४ ,ऑगस्ट २०११

' गुरुवार ' (श्री. बराक ओबामा ह्यांचा वाढदिवस)

# अमेरिकेतील - चॉकलेटच्या बंगल्यातील सफर

असावा सुंदर चोक्लेटचा बंगला -

चंदेरी -सोनेरी चमचमता चांगला -

असा बाल- विश्वातील भला मोठा-''बंगला''आज प्रत्यक्षात अमेरिकेतील पेनसिल्वानिया राज्यातील - हरशी येथील चॉकलेटच्या फ्याकटरीच्या रुपामध्ये बालचमुंच्या समवेत पहावयास मिळाला. आणि तो दिवस लहानपणच्या विश्वात हरवून गेला.

हंडन -व्हर्जिनिया -मेरील्यान्ड -नंतरच्या पेनसिल्वानिया राज्यातील''हरशी''येथे तीन तासाच्या कार प्रवासाने १२ चे सुमारास दाखल झालो. तेथील प्रवेशद्वारावरील आकर्षक फलकच आपल्याला आगामी चॉकलेटी सफरीची चुणूक दाखवितो. कार पार्किंगसाठी त्या भल्यामोठ्या पार्किंगलॉट मध्ये- जागाशोधून कार पार्क करणे हे येथील कलाकौशल्याचे -आन्हिक- उरकून घेतले. समोर दूरच्या टेकडीवरील हिरवळीतील''WEL-COME TO HERSHY ''अशी पांढरी - अक्षरे दुरूनच दूरदेशींच्या - सगळया बाल राजकुमारांचे स्वागत करीत होती.


HERSHEY'S
MILK CHOCOLATE
HERSHEY'S
Reese's
CHOCOLATE WORLD

समोरच एक लाल पांढऱ्या रंगाची आकर्षक टर्याम आम्हास लवकर येण्यास खुणावत होती. असंख्य लहान थोर मुलांचे रंगीत कपडे व सर्व पालकांचे चेहऱ्यावरील उत्सुकता स्पष्ट दिसत होती. पोपटी रंगाचा रुबाबदार पोशाख केलेल्या चालकाच्या त्या ट्रोलीत बसून आतील फयाकटरीच्या मुख्य दालना जवळ ५ मिनिटाच्या प्रवासातच आलो. तेथील चॉकलेटी रंगाच्या भिंतीवर-''HERSHY'S -GREAT AMERICAN -CHOCOLATE -WORLD TOUR''या पाटीकडे पाहताच क्यामेर्याची कवाडे उघडली. तेथे अजून एक वैशीष्ट्य नजरेत भरले ते म्हणजे -बाहेरील- भागातील ''कव्हर्ड प्र्याम पार्किंग लॉट ''लहान मुलांच्या चार चाकी. कार्स येथे ओळीमध्ये. आज्ञाधारक लहान मुलां प्रमाणेच- गुपचूप आपल्या बाल- मालकाच्या प्रतीक्षेत उभ्या होत्या.

सगळ्यांची पावले आता त्या- अदभूत विश्वात रमण्यास वळाली. सुरवातीस चॉकलेट ज्या फळापासून बनते त्या अननसाप्रमणे असणाऱ्या कोको - फळाची झाडा पासून कशी तोड केली जाते याची माहिती टी. व्ही. वरील फिल्म मध्ये

आपणास मिळत रहाते. या पिवळसर रंगाच्या फळातून फणस बी प्रमाणे दिसणाऱ्या बिया वेगळ्या करून त्या वाळवतात. हे बी- कडवट चवीचे असते. त्याची वर्गवारी करून वाळलेल्या बिया कारखान्यातील बेल्टवर पसरून त्यांचा चोकलेटी प्रवास सुरु होतो. त्याची बारीक भुकटीत-पावडर बनते. त्यात शुद्ध दुध व साखर यांचे मिश्रणाने संपूर्ण यांत्रिक

प्रक्रियेने विविध आकाराचे चॉकलेट्स बनलेले व त्याचे लहान मोठी आकर्षक प्याकिंग बाहेर येई पर्यंतचा सर्व प्रवासाचे दर्शन आपल्याला तेथील अंधाऱ्या- गुहेमधील ट्रोलीच्या प्रवासाद्वारे पहावयास मिळते. या अदभूत दुनियेची सफर "प्रत्येकास खमंग सुवास व"चोकलेटचे दोन लहान मोदकांचा प्रसाद देऊन मोठ्या आनंदाचा ठेवा मिळून केंव्हा संपते हे कळतही नाही. विनामूल्य- सफरीचे दार आता उघडते ते- "विविध मूल्य"असलेल्या- चोकलेटच्या खऱ्या मॉलमध्ये.

येथे आपापल्या आवडी निवडीनुसार मनसोक्त चॉकलेटची खरेदी केल्याशिवाय बाहेर पडण्याचा मोह आवरता येत नाही. चॉकलेटच्या आकाराची खेळणी -टी शर्टस -की चेन्स -बॉल्स-याचीही हौसेने खरेदी होते. बाहेर येवून तेथील

रंगीत फुले व हिरवळीच्या सहवासात आपणास पोट पूजा -करण्याची आठवण होते. आजू बाजूच्या नयनरम्य वातारणात फिरत असतानाच परतीच्या- कडवट- औषधाचीही आठवण होते.

"अननस आहे जात फळाची खाण्या लागे फार मधुर

आगगाडीही जलद धावते निघतो तीच्या बंबी धूर -"

या बाल गीताचीही आज प्रकर्षाने आठवण झाली. अननसाप्रमाणे दिसणाऱ्या -परंतु कडवट चवीच्या फळातील बियांपासून तयार होणाऱ्या व लहानथोरापर्यंत सर्वांच्याच पसंतीस उतरलेल्या मधुर अश्या "चोकलेटी दुनियेच्या रम्यआठवणी"- खिसा भर -भरून घेतच आम्ही तिचा निरोप घेतला तो- चोक्लेटचा रसमधुर आस्वाद घेतच.

२८ जून २०११

## **अमेरिकेतील- पशु -प्राण्यांचे स्नेह सम्मेलन.**

****

( व्हर्जिनिया - सफारी पार्क -सफर )

.

सन २००० साली- अमेरिकेतील- व्हर्जिनिया येथे - साहित्य संमेलनाचे धर्तीवर एक पशु -पक्षी - प्राणी संमेलन भरविण्याचे ठरले. देशोदेशी -पक्षी वेगे निरोप धाडले गेले. सर्व देशात वार्ता पोहोचली. वसंत ऋतू -ठरला. कारण म्हणे-

काका काकः, पिका काकाः -को भेदयो काका पिक:/

वसंत समये प्राप्ते काका- काकाः -पिका पिकः

कावळा काळा कोकीळाही काळी मग - दोघातील फरक कसा ओळखायचा.? तर वसंत ऋतू येताच कावळा- काव काव तर कोकीळा- कुहू कुहू -ओरडते त्यावेळी दोघे वेगवेगळे ओळखता येतात म्हणे. झाले एकमताने ठराव पास झाला.

देशो देशीचे प्रतिनिधी जमू लागले. अमेरिकेतील हवा - तेथील निसर्ग -विस्तीर्ण जंगल पाहायला मिळणार तेथे राहायला वर- खायलाही आयतेच मिळणार असा सारा बेत असल्याने सर्व खुश होते. हळू हळू सर्वजण जमू लागले. त्यासाठी मुलाखती पण घेण्यात आल्या होत्या. यथावकाश संमेलन पार पडले खरे पण नंतर कोणी- परत जाण्याचे नाव घेईनात. येथेच राहू असे म्हणू लागले. बैठक झाली. बहुमताने निर्णय झाला. शेवटी एकदाचे ग्रीन - कार्ड मिळाले व तेंव्हा पासून -व्हर्जिनिया सफारी पार्क- या अरण्यात ते गुण्या गोविंदाने राहू सुद्धा लागले. आतल्या - गोटातील गोष्ट वेगळीच होती त्या सर्वांना येथे मुक्त - पणे राहण्यास मिळणार होते. पिंजरा वगैरे काहीच नाही. उलट जे मनुष्य प्राणी त्यांना पहावयास येणार त्यांनीच म्हणे आपापल्या कार मधून येवून त्यांना येथे १ -२ मैल फिरत फिरत पाहायचे अशी योजना होती ती. सर्वांना ती आवडली. तेव्हा पासून ते सर्वजण येथेच शांत वातावरणात गुण्या गोविंदाने राहू लागले.

कोण कोणते प्राणी आहेत ते जवळून कसे दिसतात ते काय खातात. हे पाहण्यास माणसे -छोटी मुले जमू लागली. त्यला आम्हीही नुकतीच २० ऑगस्ट २०११ रोजी -भेट दिली व त्या प्राण्यांशी संवाद साधला व त्यांची मुलाखत घेऊन माहिती घेतली त्याचाच हा थोडक्यात वृत्तांत -

ऑस्ट्रीच (शहामृग )- -हा सर्वात मोठा पक्षी. पण न उडणारा. धावतो मात्र तशी ३० मैल वेगाने. लांब पाय व दोन बोटांचा. पुरुष काळे पण बायका मात्र करड्या रंगाच्या. यांचे अंडे सर्व पक्षात मोठे परंतु त्याचे शरीराचे प्रमाणात लहानच असते. हा आफ्रिकेतील -गावात खाणारा पक्षी.

येमू-हा पण न उडणारा. पाण्यात पोहोताना रमणारा. हा ऑस्ट्रलियाचा- राष्ट्रीय पक्षी. बायको कर्कश आवाजाची. पण पुरुष नुसतेच गुरगुरणारा.

रेह -हा स्थानिक पण दक्षिण अमेरिकेतील. हे सह कुटुंब प्रवास करतात. ५-६च्या ग्रुपने. एक पुरुष एक वेळी ५० अंडी उबवितो. पुरुष घर बांधतो व बायका त्यात अंडी घालून फिरायला मोकळ्या गावभर.

सस्तन -प्राणी -हरीण -तपकिरी रंगाचे अंगावर पांढरे शुभ्र ठिपके असलेले. शिंगे उंच व माणसाच्या -हाताच्या पंजाच्या आकाराची. हा उत्तर -अमेरिकेतील वूड ल्यांड पार्कमधील रहिवासी.

जपानी -सिका हरीण -हे जपानी लहान हरीण. पण १० प्रकारचे -मंजुळ शिटी पासून कर्कश अश्या पट्टीत आवाज काढणारा निशाचर प्राणी. पहाटे पासून सायंकाळ पर्यंतही दक्ष असणारा.

चितळ -हे भारतीय वंशाचे. पांढरे ठिपके तपकिरी रंगावर. गळ्यापाशी पूर्ण पांढरे असे. सुंदर -देखणे हेच ते- सीतेला मोहात टाकलेले - अन रामाला वनवासात ही - वणवण करायला लावलेले हरिणाचे वारसदार.

डेव्हिडस -हरीण -चीन मधील. उंटा प्रमाणे लांब मान -शिंगांच्या फांद्या -गायी सारखे खुर -व गाढवा प्रमाणे शेपटी असलेले.

उंट -आफ्रिकेतील -एका वेळी -३० ग्यालन पाणी पिऊ शकणारा. डबल पापण्या -पाठीचा आकार इंग्रजी आडव्या-D-

प्रमाणे. ब्यकट्रीयन -उंट -याची पाठ इंग्रजी आडवा मोठा बी-B प्रमाणे दोन उंचवटे असलेला. जाडजूड असा- चीन मधील.

लामा -दक्षिण आफ्रिकन केसाळ प्राणी.

जिराफ -उंच १२ ते १७ फुट. लांब मान. २२ इंच लांब जीभ असलेला. -आफ्रिका

दामा ग्याझल-पांढरे व मन तपकिरी असे रानटी बोकड -चारी पाय एकाचवेळी वर उचलून वेगात पळणारे. -उत्तर आफ्रिकेतील

अरेबियन ओरीक्स-पांढरी पाठ -पाय व पोटाचा भाग तपकिरी. गालावर काळे दाग असे हे. यांना म्हणे पावसाचा अंदाज येतो व त्याप्रमाणे ते तिकडे वळतात १००० मैल परिसरात वावर.

इलांड -आफ्रिका -बैला प्रमाणे ठेवण -टोकदार शिंगे. धोक्याचे वेळी पळताना एकमेकांचे अंगावरून उड्या मारत जाणारे.

पांढऱ्या दाढीचे रानटी बीस्ट ( ग्नू )-आफ्रिका -जन्मताच ५ मिनिटात चालू शकणारे.

नील गाय -भारत -निमुळते पाय -मानेवर वळयाचे जाळे.

याक-मध्य अशिया -हिमालय -रानटी कोल्हा. अंगावर केसाळ झूल. पर्वतावर चढण्यात -व -पोहोण्यात पटाईत.

बायसन -उत्तर अमेरीका -बोजड शरीर- पण पळण्यात तरबेज असलेला.

म्हैस -आशिया - कोणत्याही - -पाण्यात डुम्बणारी.

स्कॉट -हाय ल्यांड क्याटल -गरीब. लांब केसाळ. स्कॉटलंडमधील

वातुशी -आफ्रिका -"-गुरांचा राजा."दोन लांब ५-५ फुटी तिरकी शिंगे. ह्या शिंगा मधून रक्त वाहतूक होऊन थंड होऊन परत शरीरात जाते. ( बोडी रेदियेटर)

व्हिएतनामी ढेर पोटे डुक्कर (आय ) -चीन - फुटभर उंचीचे. चालताना पोट जवळजवळ जमिनीला टेकते ,. गाल गुबगुबीत.

झेब्रा -झिम्बाब्वे -आफ्रिका -अंगावर तपकिरी रंगाचे पट्टे. हे ग्रुपमध्ये -आळी- पाळीने झोपून आपले संरक्षण करतात.

ग्रेविज झेब्रा -केनिया -सोमालिया -अंगावर अरुंद काळे पट्टे असलेले. घोड्याचे वर्गातील रानटी जात.

असे प्राणी आनंदात मूक पणे- बागडताना दिसले. त्यांना खाद्यही आपण तेथून विकत - घेऊनच देऊ शकतो. आपल्यापासून फक्त कारच्या काचेचेच अंतरावर राहून त्यांचे दर्शन होते. बरेच प्राणी एकत्रित झाडाखाली गप्पामारताना दिसतात. तर काही पाण्याशी खेळताना दिसतात. त्यांना योग्य ती शिस्त लावण्यास चक्क- मनुष्य प्राणीही चाबूक घेऊन होतेच. आपल्या कारची वाट ते मोकळी करून देत. जिराफाला अन्न भरविण्यासाठी उंच स्टेजवर जाण्याची ही व्यवस्था तेथे होती.

काही प्राण्यांनी आपल्या नेहमीच्या सवयी प्रमाणे- पिंजऱ्यातच राहणे पसंद केल्याने. त्या माकडांना पिंजरे दिलेले आहेत. माकडाने आपले चाळे पिंजारभर खालीवर करून दाखविले. त्यास आम्ही त्याच्या भारतातील - दुकानाची आठवण करून दिली.

एक माकडाने काढलय दुकान त्यास. गिऱ्हाइके फार फार -या गाण्याची.

. अन -

-शेपटी वाल्या प्राण्यांची भरली होती सभा -

पोपट होता सभापती मधोमध उभा -याच्या संदर्भाने भारतातील सभेची.

तो मिस्कील पणे - हसला.!. म्हणाला अहो ते दुकान - केंव्हाच बंद केले इकडे येण्यापूर्वी,येथेच छान चाललाय आता आमच.

फ्लेमिंगो -पांढरे बगळे तळयाकाठी-एक पायावर डोळे- मिटून पाण्यातील माश्याच्या शिकारीकडे डोळे- लावून उभे होते

कासव- -भाऊ तर- सशाचीच नजर चुकवून इकडे आले म्हणे अन मग काय झाडाखाली निवांत झोपले होते गारव्यात निर्धास्त पणे.

कांगारू -पण आळसावलेले दिसले. पाळायला वावच नाही म्हणे येथे.

लोरीकत-पोपटांचे -रंगबेरंगी भाऊबंद ही होते. इकडून तिकडे उडत.

चित्ता -महाशय- त्या -पलीकडे राजेशाही थाटात -पहुडलेले दिसले.

सर्प महाशय -नेहमीप्रमाणे काचेच्या पेटीतच बंद होते. निपचित पडले होते , आयतेच -खाल्लेले भक्ष पचवीत.

कोंबडा -कोंबडीही -आपली वेगळी चूल मांडून बसलेले- नव्हे आनंदात बागडताना दिसले.

याला-भेटू की त्याला असे- होवून गेले दुपारचे उनही चांगलेच तापले होते.

सर्वांचा निरोप घेऊन आम्ही आमचे -पोटोबा कडे वळालो. तेथे माणसे -आपापसात चर्चा करीत होते या संमेलनाची. तेव्हा कळाले.

ससा -कावळा -कोकिळा -गाय -कुत्रा मांजर -यांचे व्हिसाच -नाकारले म्हणे U. S. कौन्सिलेटने-आयत्या वेळी

त्यामुळे ते सर्व आता- हिरव्या पोपटाला- पुढे करून भारतातच आपले एक वेगळे -की आगळे वेगळे -असे मिनी संमेलन नव्हे

पावसाळी अधिवेशन भरवून -अमेरिकेत स्थायिक झालेल्या आपल्या बांधवाना परत -बोलाविण्यासाठीचा ठराव मांडणार आहेत.

माणसांनी नाही का - स्विस बॅंकेतील भारताचा- पैसा- भारतात परत आणण्याचा प्रयन चालू केला- त्या धर्तीवर.

बघू या काय होते ते -? .

लवकर - कळेलच-C. N. N. -NEWS -वर -तेंव्हा - कळवूच पुन्हा -कधीतरी. अलाहिदा- -तो पर्यंत- बाय - बाय.

.

२१ ,ऑगस्ट २०११

“श्रीकृष्णाष्टमी”

## अमेरिकेतील - अपार्टमेंटचे अंगणातील- आठवणींचा ' पारिजात '.

.

“घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती. /
तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती. /

या घरट्यातून पिलू उडावे दिव्य घेवून शक्ती /
आकांक्षाचे पंख असावे उंबरठ्यावर भक्ती. /”

भारतातून आपल्या-'-लक्ष्मी छाया ' या - प्रिय घरापासून दूर- अमेरिकेतील घरे आणि भोवतालचे वातावरण कसे असेल याची मोठी उत्सुकता होती. माझा मुलगा- मिलिंद- HERNDON- या एका छोट्या गावात परंतु - Dulles- विमानतळापासून कार प्रवासाच्या केवळ १० -१५ मिनिटाचे अंतरावर रहातो. TREVORS RUN- -2444. Little

current Dr Apt 4442 Herndon VA 20171-4620 असा पत्त्यावर येताच बाहेर-सुंदर अक्षरात वरील अपार्टमेंटच्या नावाची पाटी सभोवती रंगीत फुलांचे अर्ध गोलाकार आकारचे मोहक ताटवे आपले स्वागत करतात. आत येताच कार लावण्यासाठी फुट पाथ चे बाहेर पांढरे शुभ्र पट्टे आपली नजर वेधून घेतात. त्या ठराविक जागेतच कार लावल्याने सर्व कार ओळीने शोरूम मध्ये लावल्या प्रमाणे आकर्षक दिसतात. अर्ध वर्तुळाकार अशी अपार्ट मेंटस, दुमजली - आकर्षक पण एकाच डिझाईन ची पांढऱ्या रंगाची एलेव्हेशन्स व मधोमध जिना.

मध्यभागी स्विमिंग पूल -टेनिस प्ले ग्राउंड -लहान मुलासाठी चे झोपाळे व अधे मध्ये बसण्यासाठी बाके. फुट पाथला लागून हिरव्यागार झाडांची रांग. एका बाजूला लाकडी पार्टिशन मध्ये भले मोठे त्र्याश बॉक्स. जिन्या खाली लेटर बॉक्स व सूचना फलक अगदी सर्व काही जेथल्या तेथे. सिमेंटच्या फुट पाथ वरून तुम्ही आरामात पायी चक्कर सभोवती मारू शकता. छोट्या पार्टीसाठी ग्रील असलेली आकर्षक लाकडी शेड सुद्धा आहे.



मध्यभागीच्या एका खोलीत जिम. त्यात रनिंग - सायकलिंग -वेट लिफ्टिंग इ. उत्तम चकाचक साहित्यासह सोयी सुविधा. आपले कडे येणाऱ्या गेस्ट साठी स्वतंत्र पार्किंग ची व्यवस्था. कारची ये- जा कोणताही आवाज न करता होर्न न वाजवता शांत पणे होत असते. जाता येता विविध देशाचे नागरिक रहिवासी- हाय -ह्यालो करत-' विश ' कताना दिसतात. सायंकाळी जेष्ठ नागरिक बाकावर गप्पा करताना दिसतात.

प्रत्येक घरात छोटेशे किचन त्यात ग्यास -ओव्हन -डीश वाशर- वाशिंग मशीन -मायक्रो वेव -व ऑटोम्याटीक बर्फाचे लहान लहान पिसेस एका ट्रे मध्ये जमाकरणारा मोठा फ्रीज ही ५ - ६ इलेक्ट्रोनिक- भावंडे एकाच नाळेने जोडलेल्या भावंडाप्रमाणे- एकदिलाने- कुरकुर न करता राहतात. अगदीच कोणी मधेच- रुसला तर त्याची समजूत काढून त्याला पूर्ववत- खुश करण्याची जबाबदारी घेणारी मंडळी येथे फोनच्या हाकेवर केंव्हाही-तत्पर सेवेस तयार असतात.

येथील हवामानानुसार ए. सी. ची यंत्रणा असते. वाश रूम - बेसिन -टब बाथ व आवश्यक असे गार गरम पाणी

असणारे बेसिन अशी उत्तम व्यवस्था बेमालूम पणे बसविलेली असते. घराच्या भिंती- फ्लोरिंग लाकडी त्यावर कार्पेट. त्याची सफाई करण्यास व्ह्याकुम क्लीनर ओघाने असतोच. घरातील रंग एकच ऑफ व्हाईट असतो.

आमचे अपार्ट मेंट चे मागील बाजूस भरपूर हिरवीगार उंच झाडांची फौज उभी आहे. खळाळत वाहणारा-'निर्झर'आहे.

तेथे सायंकाळी फिरताना 'वनराईतून' फिरल्याचा आनंद आम्ही दररोज घेतो. कधी मधी- चपळ’’हरणेही ‘‘दुरूनच दर्शन देतात. व आम्ही- रामराज्य सुख अनुभवतो. त्यांचे मोहातही पडतो व त्यास-’’एका क्लिकने"- क्यामेऱ्यात शूट करतो. आजू बाजूस देखण्या इमारतीतील हॉटेल्स - ऑफिसेस व भोवताली नेत्र सुखद हिरवळ असते , व त्यालगत कार पार्किंगचीही तीन -चार मजली इमारत पहावयास मिळते. सकाळ -सायंकाळ खुल्या - शुद्ध हवेतील फेरफटका घेवून व मित्रांशी गप्पामारत तेथील बाकावर बसून - आमचा प्रत्येक दिवस उद्याच्या तातडीच्या - प्रतीक्षेतच संपतो. (नाईलाजाने).



स्वच्छता - चकाचक परिसर हा तर येथील नागरिकांचा- ”आत्माच “जणू अशीच त्याची जपणूक होताना दिसते.

त्यामुळेच- घराला घरपण देणारी माणसे- इथेही भेटतात. यातच यादेशाच्या -यशाचे गमक आहे. याची देही याची डोळा -नंदनवनात वावरल्याचा स्वर्गीय आनंद हमखास मिळतोच मिळतो यात मात्र- तिळमात्र शंका नाही. त्यामुळेच जमिनीला पाठ टेकताच शांत झोप केंव्हा लागते कळतही नाही,-

अन , सकाळच्या प्रसन्न -पाखरांच्या चिव चिवाटाने नवा-पूर्वेकडील -पहाटेचा सूर्योदयही -झटकन होवून -नव्यादमाने - डौलाने पावले टाकीत तो - चालतच राहतो. चालतच रहातो- चालतच रहातो -सायंकाळच्या नयन मनोहारी रंगानी भरलेल्या- क्षितिजापलीकडील -पश्चिमेच्या सूर्यास्ता पर्यंत- पुन्हा -नव्या उद्याच्या शोधासाठी. अंगणात नवा -पारिजात फुलविण्यासाठी.

हा आठवणींचा पारिजात आता मोरपंखी आठवणी- बनून स्मृतीच्या”सेफ लॉकर”मध्ये लवकरच रवाना होईल.


TREVORS RUN
AT DULLES CENTER



येथील वास्तूत ६ महिने असे पुरेपूर वास्तव्य झाले -श्री. मार्कुस डाबरे या सारखे सुहृद लाभले व मिलिंद -मंदार -अश्विनी -अनुष्का -प्राजक्ता या सर्वां बरोबर आम्हा दोघांना काही दिवस एकत्रित राहून -श्री. गजानन कृपेने -दिवाळीपूर्व धमाका -साजरा करता आला आणि समाधान - आनंदाचा ' निर्झर ' पहाता आला व जीवनातील- नव्या उमेदीची एक पहाट उगवली अन- झुंजू मुंजू झाले.

उठा उठा सकळीक.

वाचे स्मरावा गजमुख.

ऋद्धी सिद्धींचा नायक ,.

सुखदायक भक्तांसी -असे भूपाळीचे स्वर कानी घुमू लागले.

डॉ अरविंद वैद्य

अमेरिका, गुरुवार ७ आक्टोबर , २०११

# अमेरीकेतील -लाईफ टाईम - याचिव्ह मेंट-

ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा -/ शांताबाई शेळके यांच्या- कवी मनाला दाद द्यावी तेव्हडी थोडीच आहे.

ही दूर दूर- जाणारी वाट आम्ही आमच्या गेल्या आठ दिवसाच्या सफरीमध्ये पाहिली आहे. गेल्या आठ दिवसात आम्ही मजल दरमजल करत सफर केली ती तब्बल ४००० की. मी. ची. ती वाट सभोवतालची भरगच्च हिरवाई -लांबवर पहुडलेले आरामदायी राजमार्ग -त्यावर असलेले मानव निर्मित फ्लाय ओव्हर्सची नाग मोडी उतरंड -समुद्रावर साम्राज्य गाजवून ७-७ मैल लांबीचे पूल बांधून त्यास उल्लंघून जाण्यासाठी केलेली मानवाची किमया पाहून तो सागरही नक्कीच सुखावलेला वाटला. शांतपणे आपल्याच तंद्रीत लाटांशी खो खोचा खेळ खेळत माणसाच्या प्रगतीत -खो- घालण्यापासून दूरच राहण्यात आनंद मानणारा दिसला.

अमेरिकेच्या स्वप्नमय जगतातील व्हर्जिनिया -नॉर्थ क्यारोलिना - फायेट व्हील येथील डेज इन -या मोटेल मध्ये ४-५ तासांच्या प्रवासानंतर रात्रीचा विसावा घेतला. सकाळी फ्रेश

होऊन -साउथ क्यारोलिना -जॉर्जिया भाग पार करून गेलो. -ओर्ल्यान्डो -ओलांडण्या अगोदर तेथेच बहामा बे-या नयनरम्य परिसरात वसलेल्या रिसोर्ट मध्ये बस्तान बांधले.

* सी वर्ल्ड- मधील डॉल्फिन नर्सरी पाहिली. अनटार्कटीक अश्या अतिथंड प्रदेशात वास्तव्य असलेल्या पेंग्विन -शार्क -सी गल माश्यांच्या सहवासाचा व तश्या निर्मिलेल्या वातावरणाचा अनुभव घेतला. डॉल्फिन माश्यांना विविध कसरती करावयास लावणारे प्रशिक्षक व त्याचे बरहुकूम शहाण्यासारखे वागणारे अजस्र डॉल्फिन माश्यांच्या कसरती पाहून डोळे दिपून न जातील तरच नवल. गमती जमती करत कोलांट्या उड्या मारत ,मध्येच तलावात फेरी मारताना शेपटीच्या फटकार्यांनी पाणी उडवून ग्यालरीत बसलेल्या प्रेक्षकांना ओलेचिंब करून सोडत व नकळत अंगावर शहरे आणीत असत. प्रशिक्षक त्यांच्या पाठीवर स्वार होऊन सर्फिंग करीत तर काही मासे आपल्या तोंडानी मुसंडी मारून प्रशिक्षकास हवेत उंच उडवीत व दोघेही आनंदित होऊन जात. त्या तलावावर बांधलेल्या तारांवरील हिंदोल्यान वर केलेली प्रशिक्षकांची सर्कस पाहूनही-मन आणि हृदय आणि डोळेही -

भरून आले. त्यामुळेच त्यांचा निरोप घेताना अनेकांनी त्यांचे बरोबर आपल्या प्रतिमा क्यामेर्यात बंदिस्तही केल्या त्या पुन्हा पुन्हा पाहून आठवणीना उजाळा देण्यासाठीच.

समुद्रात आढळणारे विविध रंगीत माश्यांच्या असंख्य रंगीत विविध आकाराच्या आणि प्रकाराच्या प्रजाती पाहून व गुण्या गोविंदाने नांदताना पाहून -पाण्यात राहून माश्याशी वैर-अशी"विरोधाभासी म्हण"माणसाने का तयार केली असावी.? असाच प्रश्न खरे प्रश्न पडला. याची कमतरता पडेल म्हणून की काय एका बंदिस्त थीयेटर मध्ये रंगीत माश्यांच्या वेशातील आबाल थोरांनी त्यांची सर्कसच पाण्याबाहेर राहून - आम्हाला दाखवून व हम भी कुछ कम नही /-हेच जणू त्या माश्यांना दाखवून दिले झाले. तो संपूर्ण दिवस त्या सी वर्ल्ड मध्ये माश्यांच्या जगात वावरताना कसा -एखाद्या माशी सारखा भूर दिशी उडून गेला कळलेही नाही. नात अनुष्कानेही त्याचा पुरेपूर आनंद घेतला. त्याच आनंदात आम्हीही सचैल न्हाऊन निघालो.

डॉ. अरविंद वैद्य २७ सप्टेंबर २०११

**अमेरीकेतील -लाईफ टाईम - याचिव्ह मेंट- (२ )-**

***

जेथे मिळे धरेला आभाळ वाकलेले /

अस्ताचलास जेथे रविबिंब टेकलेले /

जेथे खुळ्या ढगांनी रंगीन साज ल्यावा /

स्वप्ना मधील गावा स्वप्ना मधून जावे /

स्वप्नातल्या सुखांचा स्वप्नीच वेध घाव्या / -

अश्या सुखांचा वेध घेत आम्ही -आय ९५ नॉर्थ - या सरळ सोट रस्त्याने -क्रायस्लर ७ -सीटर कारने प्रवास सुरु केला. तो दिवस होता -१६ सप्टेंबर २०११ -संकष्टी चतुर्थी सायंकाळी ६ वाजताचा-गोरज मुहूर्त. मिलिंद -प्राजक्ता -मंदार -अश्विनी ही जोडी ड्रायव्हिंग ची भक्कम बाजू सांभाळीत होती. सोबत डॉ. सलील कुलकर्णी -संदीप खरे -वैशाली सामंत -बेला शेंडे -अवधूत गुप्ते -स्वप्नील बांदोडकर यांच्या सुस्वरानी भारलेल्या

मराठी गाण्याच्या सी डी ऐकत आम्ही आम्ही रस्ता मागे टाकीत होतो. मध्येच हिंदी जुन्या गाण्याची फर्माईश होई त्यावेळी खुद्द स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर आपल्या भावंडा समवेत - आभासी रूपाने आमच्या समवेत होत्याच. त्यामुळे वेळही मजेत जात होता.

डिस्ने वर्ल्ड - WALT DISNEY -या एके काळी पत्रकार -कार्टुनिस्ट असलेल्या हौशी माणसाने आपल्या कल्पकतेच्या जोरावर -मिकी माऊस चा अदभूत- चिरस्मरणीय असा राज दरबार तयार केला. त्यानेच त्यास पहिला उसना आवाज दिला व सगळ्या बाल जगताच्या गळ्यातील ताईत बनला आहे.

आणि -परीकथेतील राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का -?

अशी कल्पनेत रचलेली गाणी प्रत्यक्षात अनुभवास येतात. तो आनंद काही वेगळाच असतो. त्यामुळेच जगातील असंख्य नागरिकांची आपल्या मुलां नात्वान समवेत भेट देणारी अलोट गर्दी -येथे पहावयास मिळते. पण ना कोठे गडबड- ना कोठे गोंधळ सर्व काही शिस्त बद्ध रीतीने पहावयास मिळते.


THE MAGIC KINGDOM
Let the Memories Begin!

डिस्ने वर्ल्ड ची रंगीत कमान आपले स्वागत करते. आपली कार ओळीत पार्क करण्यास प्रशस्त जागा तयार असतेच. आकर्षक अश्या गाडीतून सर्वांना घेऊन एका रेल्वे जवळ येवून थांबते. ती रंगीत बुलेट ट्रेन पुन्हा सर्वांना घेऊन आपणास -अदभूत अश्या मिकी माउसच्या दुनियेत आणून सोडते. टोकियो -प्यारीस -हॉंग कॉंग येथेही याच्या शाखा आहेत.

त्या दिवशी आम्ही ही नात अनुष्का समवेत -त्या अदभूत दुनियेची सफर केली. मिकी माऊसचा दरबार -गुफी -प्लुटो -डोनाल्ड -मिनी यांना प्रत्यक्ष भेटलो. त्यांची अनोखी परेड रंगीबेरंगी कपड्यातील परेड पाहिली. भव्य स्टेजवर गाण्याच्या तालावरील डान्स पहिला ,मेरीगो राउंडची सफर -देशोदेशीच्या बाहुल्यांचे भव्य प्रदर्शन फारच नेत्रदीपक असे वाटले. येथे सर्व काही आखीव रेखीव असेच पहावयास मिळते. दिवसभरची भटकंती शेवटी अपुरी वाटू लागते. लहान थोरही आपले बालपणात रमून जातात.

संध्याकाळ होऊ लागताच सप्तरंगांच्या दिव्यांनी हे स्वप्न्यमय जगत दिवाळीतील रोषणाई प्रमाणे दही दिशा उजळून टाकते. परत जाण्यास आता बोटी ची वाट धरता येते. त्या विशाल तलावातून परत जाताना मागे दिसणारी-पाण्यात प्रतिबिंबित झालेली - ही दश दिशा रंगीत करणारी मिकी माउस ची दुनिया नेत्रपटलावर उमटवीतच आपण सस्नेह असा निरोप घेतो.

पुन्हा कधी तरी येवूच भेट द्यावयास याच आशेने ,अन तो पर्यंत भेटूच -टी वी मधील कार्टून फिल्मच्या रूपाने.

अन ,- लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा -याचे स्मृतीने.

डॉ. अरविंद वैद्य

२८ सप्टेंबर २०११

' घटस्थापना '

# अमेरीकेतील -लाईफ टाईम - याचिव्ह मेंट-( 3 )-

***

आय ९५- साउथ -

या राजमार्गाशी- पाठ शिवणीचा खेळ खेळतच आम्ही -बहामा बे -

या रिसोर्ट मध्ये आम्ही ३ रात्री मुक्काम केला. रिसोर्ट चा देखणा रुबाब त्यांचे प्रवेश दाराशी दिसणाऱ्या-छोट्या निर्झराने लक्ष्य वेधून घेतले. रूम्स चकाचक तर होत्याच पण त्यातील टोवेलच्या विविध आकृतींनी लक्ष्य वेधून घेतले. त्यात बदकांची जोडी बेडवर शांतपणे बसल्याने क्यामेर्यात बंदिस्त केलीच. वेल फर्निश्ड किचन -प्रशस्त डायनिंग टेबल -गुबगुबीत गाद्यांच्या बेड रूम्स मध्ये दिवसभराचा शीण रात्रीत नाहीसा होई झोपही छान लगत असे.

आजची भेट होती -युनिव्हर्सल ओर्लेन्डो रिसोर्ट ला - ( अर्थात युनिव्हर्सल स्टुडीओ -फ्लोरिडा )


UNIVERSAL

चंदेरी दुनियाची तीही अमेरीकेतील विशाल अश्या भू खंडावर पसरलेल्या फिल्मी नगरीची ही पाहिली वहिली भेट. तशी देशातील- रामोजी सिटी पाहिली होतीच. JAW-विंग ला कार पार्क केली व लिफ्टने एअर पोर्ट प्रमाणेच असलेल्या व्यवस्थे प्रमाणे पुढे सरकत्या जिन्याने आपले युनिव्हर्सल - ओर्ल्यान्डो नगरीत स्वागत होते. आत शिरताच भव्य सिनेमा पोस्टर्स- आपले लक्ष वेधून घेतात.

लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया -/

झळाळती ज्योती कोटी कोटी या हा हा -/

या-' शेजारी ' १९४१च्या सिनेमातील गाण्याची आवर्जून आठवण झाली. तसाच सगळा माहोल जमला होता येथे.

तेथे आत शिरणारी देशोदेशीची माणसांची गर्दी पाहिली की -''माणूस''- हा येथून तेथून मनोरंजन प्रिय असल्याचे ध्यानात येते तो मग भारतीय असो वा शेजारील चीनी वा दूरचा जपानी वा अमेरिकन. सर्व जण आपापल्या वेशात अन झोकात - मनोरंजनाच्या काशीयात्रेला उत्साहात आलेले दिसत होते.''प्र्याम''प्रिय बालकांचीही भाऊ गर्दी त्यात होती. त्यातही

अनेक ट्वीन प्रयाम्सही दिसत होत्या तर काही वयोवृद्ध व अपंग व्यक्तीही आपल्या दुचाकी अर्थात स्ट्रोलर कार मध्ये फिरून अन त्यात बसून या नेत्र दीपक दुनियेची सफर आनंदात करत असलेले पहावयास मिळत होते.

रुपेरी पडद्यावर मानवी स्वभावाचे अनेक पैलू दाखविणारी व आभासी दुनियेत घेवून जाणारी अनेक दालने या भव्य दिव्य अश्या नगरीत विखुरलेली आहेत. त्यासाठीची पायपिटी ची आपली तयारी मात्र जय्यत असावी लागते.

काल पाहिलेली बाल मनोरंजनाची मिकी माउसची डिसने ल्यांडची दुनिया तर आज होती आबाल थोर दोघांना विशेषतः तरुण तरुणींना - भूलविणारी न्यारी व प्यारी दुनिया.

या अतिविशाल परिसरात पसरलेल्या फिल्म बनविणारी असंख्य दालने पहावयास मिळतात. फिल्म तयार झाल्यावर ती '३डी ' फिल्म असेल तर त्यासाठी लागणारे चष्मे घालून पाहण्यासाठी वातानुकुलीत सुखेनैव बसून पाहण्याची छोटी सिनेमा गृहे आपला आनंद व उत्साह द्विगुणीतच करतात.

आपली अवस्था मात्र -

या- ,टोपी खाली दडलय काय.?

कोणी आम्हाला पटापट सांगेल काय.?

अशी होऊन जाते.

येथे- प्रोडक्शन सेन्ट्रल -न्यू यॉर्क -स्यान फ्रयान्सिस्को - वर्ल्ड एक्स्पो -हॉलीवूड अशी दालने आहेत. याच दालनात - JAWS -TERMINATOR-DISASTER-TWISTER-MUMMY-अश्या इंग्रजी चित्रपटांचे चित्रीकरण झालेले आहे.

किड्स झोन -अजून वेगळा आहे. एक दिवसाचे भेटीत या सर्वांचा आढावा घेणे केवळ अशक्य आहे. पण आपणास दुधाची तहान ताकावर भागविण्याची सवय असतेच त्यामुळे समाधान होवून जाते.

आमचेही त्याप्रमाणे दोन गट पडले -अनुष्का -आजी -अश्विनी यांनी कीड झोन कडे आपला मोर्चा वळविला. तर आम्ही मंदार -मिलिंद -प्राजक्ता यांनी धाडसाने -हॉरर मेकप -दालनात प्रवेश केला. तेंव्हा प्राजक्ताच्या मागून एक -भयानक

हात पुढे आला. थोडावेळ ती भांबावून गेली. पण तो मेकप केलेला हात घेवूनच एक आजीबाई सर्वांचे अनोखे स्वागत करीत असल्याचे दिसले. काही जण अचानक असा विचित्र हात पुढे आल्याने किंचाळत ही होते. व त्याचा खोटेपणा कळताच आपले आपल्यालाच पुन्हा खळाळून हसतही होते. इतरांना मात्र पाहायला मजा येत होती.

अर्धा तास त्या दालनात हॉरर मेकप कसा करतात,बंदुका अश्या उडवितात. -जखमा कश्या प्रकारे करतात यांचे प्रात्यक्षिक दाखविले जाई. त्यासाठी प्रेक्षकातूनच -बळीचे बकरे निवडले जात. अश्याच एका शो साठी -''सौ. प्राजक्ताची''निवड त्यांनी केली. हात कापण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तोडलेले चार पाच हाताचे नमुने तेथे होतेच ते हाताळण्यास दिले. नंतर टेबलावर हात ठेवून तो कापतानाचे आंखो देखा हाल सुरु झाला. धारदार चाकू आरपार घुसवून रक्त बंबाळ झालेला हात पण चेहऱ्यावर मात्र भितीदर्शक भाव आणून हसू अशी अवस्था होती तिची. हे सर्व कसे केले जाते याचा खुलासा करण्यात आला पण पाहताना मात्र अंगावर काटा आल्याशिवाय रहात नाही. असो अश्या प्रकारे अचानक

पणे -हॉलीवूड मध्ये- निवड झाल्याने आता -ऑस्कर काही दूर नाही- या आविर्भावातच आम्ही पुढच्या दालनात प्रवेश केला.

कीड झोन संपवून आम्ही पुन्हा लंच ब्रेक घेतला. ऊन खुपच तापले होते ,बाहेर पाण्याचे तुषारांची कारंजी थंडावा देण्यास सज्ज होतीच. त्याचा लाभ ही घेतला.

नंतर सर्वांनी मिळून DISASTER झोनला भेट दिली. तेथे इमारतीवरून माणसे कशी पडतात. इमारत कशी पाडली जाते. रेल्वे व ट्रयानकरची धडक कशी होते हेही प्रेक्षकातील काही निवडक लोक घेवून दाखविले त्यात सौ. जयश्री हिस ही बागकाम करणाऱ्या आजी बाईचा रोल मिळाला. हे सर्व पाहताना पडद्यावर दिसणाऱ्या दृश्यातील फोलपणा ध्यानात येतो व मजा ही येते.

हॉलीवूडला- एकाच घरातील सासू -सून - "अक्ट्रेस’’मिळाल्याने आम्ही ही खुशीत होतोच. त्यानंतर सर्वांनी मिळून - JAWS या चित्रपटाचे शुटींग कसे झाले याचा अनुभव बोटीत बसून व पाण्यातील छोट्याश्या बोटीची सैर करून घेतला. त्या पाण्यातून मध्येच वर येणारा शार्क मासा

पहिला. पण एव्हाना आमची भीतीही पार दूर पळाली होती. हॉरर शो पाहून आम्ही शूरही बनलो होतो.

संध्याकाळी झाली होती. परतीचा प्रवास ही करावयाचा होता. अजून खूप पाहावेसे वाटत होते. पण

अखेरचा हा तुला दंडवत. तुला दंडवत सोडून जातो गाव -हे गाणे आठवतच -

- नाईलाजास्तव त्या रुपेरी - चंदेरी नगरीचा हृद्य निरोप घेतला तो - तेथील स्टारबक्सच्या - चविष्ट चहाची चव जिभेवर रेंगाळत तर. मनांत दिवसभराच्या मजेशीर आठवणी घोळवतच.

डॉ. अरविंद वैद्य

२९ सप्टेंबर २०११

गुरुवार

## अमेरीकेतील लाईफ टाईम अचिव्हमेंट. (. ४ )

## KSC -

****

युनिव्हर्सल स्टुडीओचा “लोगो “असलेली - आसाभोवती फिरणारी निळीशार पृथ्वी दृष्टीआड झाली होती. आता लक्ष्य होते त्या बाहेरील दूरवरील जगाची जवळून ओळख करून देणाऱ्या KSC -अर्थात केनेडी स्पेस सेंटर ची. बहामा बे चा पाहुणचार संपवून सकाळीच आगेकूच सुरूझाली. काउंट डाऊन करत ११चे सुमारास त्या जी पी एस वर- अदृश्य असलेल्या के एस सी चे केंद्राचे- प्रत्यक्ष्य दर्शन झाले.

खरेच- माणूस हा नेहमी अतृप्तच रहात असल्याची खात्री पटली. पृथ्वी-आप -तेज -वायू -आकाश यांना आपल्या बुद्धीच्या जोरावर आपलेसे करूनही तो तृप्त न झाल्याने , पृथ्वी बाहेरील हजारो की मी दूर असलेल्या चंद्रावर जाण्यासाठी अमेरिकन शास्त्रज्ञानी धडपड सुरु केली. त्यासाठी अनेक- यानांची पडझड सुद्धा झाली अन माणसेही कामास आली

अतोनात धनही वाया गेले. तरी सुद्धा तसूभरही मागे पावूल न घेता एकदा उचलेले पावूल -थेट चंद्रावर उमटविलेला - तो मानवच , -नील आर्म स्त्रोंग ,आज जगापुढे -एक नव्या अंतरीक्ष युगाचा वेध घेण्यासाठीचा असा संगणक - विज्ञान जगतातील तरुण तरुणींना प्रोत्साहित करणारा “प्रेरणादायी आदर्श -”ठरला आहे.

त्याचीच ही - कहाणी सुरस -सुरम्य अन -साहसी अशी असलेली. आम्ही प्रत्यक्ष्य त्या कर्म भूमीस - अर्थात -NASA - NATIONAL AERONATIC SPACE ADMINISTERATION -या साठी कार्यरत असलेल्या- KSC या DELWARE NORTH PARKS AND RESORTS कंपनी तर्फे चालविलेल्या केंद्रास भेट दिली -21 सप्टेंबर २०११ या दिवशी.

( फ्ल्याश ब्याक- १९९८ साली मिलिंद एस एस सी बोर्डात जेंव्हा चमकला तेंव्हा- भविष्यात”अंतरीक्ष शास्त्रज्ञ”व्हायला आवडेल अशी”मनिशा “व्यक्त केली होती. त्याचे आदर्श आहेत डॉ. जयंत नारळीकर. त्याचाच थोडासा परीणाम म्हणूनच की काय -त्यास येथून जवळच असलेल्या -

अलाबामा हन्त्स व्हिले येथील युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळाला. व येथील संस्थेस प्रत्यक्ष भेट देण्याचा- तब्बल १३ वर्षांनी का होईना आम्हासही हा ‘‘कपिला शस्ठीचामहान योग ‘‘आला हे ही नसे थोडके. आयुष्यातील ‘‘वनवास’’संपवून वानप्रस्थाश्रमचे मार्गावरील अपूर्व अशी भेटच मिळाली त्यामुळे धन्यता वाटते)तर असो.



के एस सी -अमेरिकेचे तरुण तडफदार माजी प्रेसिडेंट जॉन एफ केनेडी - यांच्या प्रेरणेतून- गरुड भरारी घेतलेले हे केंद्र आज पर्यटकांच्या पसंतीसही उतरल्याने अनेकांची रीघ येथे पहावयास मिळते. अटलांटिक महासागराचे कुशीत सुमारे २२० एकर जागेत वसलेले हे अंतरीक्ष यानांचे -परीक्षेचे गावच जणू. येथील मोजक्या ए सी रूम मध्ये संगणक सुसज्ज यंत्रणा ,काचेची तावदाने असलेला उंच असा भव्य निरीक्षण मनोरा, येथूनच आपणास या ठिकाणाचे चोफेर सुस्पष्ट असे विहंगम परिसर दर्शन होते. ए सी बसेस मधून आपणास या परिसराला प्रदक्षिणा घडविली जाते. प्रत्यक्ष यानात बसल्याचा-''आभासी अनुभव''ही तर फारच अनोखी अशी पण काळजाचा ठोका न कळत चुकविणारी अशी सफर अनुभवता येते. त्यानेच आपणासही प्रत्यक्ष अंतरिक्षात झेपावणाऱ्या व महिनोन - महिने आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहणाऱ्या त्या अंतराळ वीरांच्या साहसाची-धैर्याची व जिद्दीची जवळून धुसरशी जाणीव होते.

अन -प्रयत्ने कण वाळूचे रगडीता तेलही गळे.!तसेच -जया अंगी मोठे पण तया यातना कठीण -

या शब्दांचा अर्थ येथे उमगतो अन समजतोही.

'३ डी ' फिल्म द्वारे सूर्य माला व अराउंड द वर्ल्ड ची सफरही घडते ती यु. एस. अस्त्रोन्याटच्या हॉल ऑफ फेम मध्ये. तसेच इच्छुकांना प्रत्यक्ष अंतराळ वीरान समवेत लंच घेत गप्पा मारण्याची संधी सुद्धा येथे उपलब्ध आहे. अमेरीका ,-अंतराळ संशोधनात किती अग्रेसर आहे याचे संपूर्ण दर्शन येथे आपणास घडते त्याचा लाभ घेण्याची चिकित्सक वृत्ती आणि जाणून घेण्याचा उत्साह मात्र हवा. मग - काय-स्काय इज द लिमिट-! ही रहाणार नाही.

एका भव्य दालनात यानांच्या भव्य प्रतिकृती-त्यातील अंतर्गत व्यवस्था -अंतराळ वीरांचे पेहेराव -तसेच चंद्राला ( तेथून आणलेल्या अवशेसास-दगडास ) प्रत्यक्ष स्पर्श करण्याची संधी सुद्धा मिळते. आणि हे सर्व अनुभवून - पाहून झाल्यावर पाय-पीटीने दमल्या भागलेल्या आपणास अल्पोपहाराचे रेस्तोरनट तेथेच उपलब्ध आहे. रेस्टरूम मधून फ्रेश होऊन यथेच्च ताव मारीत ,चंद्रावर जावून आल्याच्या सफरीचा-पृथ्वीवरील - खुर्चीत बसूनच आनंद. घेण्यात धन्यता मानायची.

अन,- चांदोबा चांदोबा भागलास का.?

लिंबोणीच्या झाडामागे लपलास का-?

या ओळी आठवीत आपल्या बालपणात रमून जाण्याचा आनंदही घेत राहायचा अन नात्वानाही नव्या अन खऱ्या - चांदोबाची ओळख करून देण्याचाच - ध्यास घ्यायचा हे मनाशी पक्के करूनच आम्ही येथील यान दर्शनाचे -काउंट डाऊन -संपवून पुढील -"की वेस्ट "कडील मार्गक्रमणा करण्यास दुपारी ४ चे सुमारास सज्ज झालो. क्रमश:-( ४ )

डॉ. अरविंद वैद्य

३० सप्टेंबर २०११

## अमेरीकेतील लाईफ टाईम अचिव्ह मेंट -(५)

****

“नासा “तील चांद्रयानाची - के सी एस ची अविस्मरणीय भेट संपवून फ्लोरिडाच्या -' की वेस्ट ' कडे आगेकूच करून पोहोचेपर्यंत- चांदोमामा-पार डोक्यावर येवून बसला.

की वेस्ट- म्हणजे मियामिचे लांबलचक शेपूट समुद्रावरील पुलानी जोडलेले दुसरे टोकच. फ्लोरिडा सीटी संपवून आणि समुद्रावरील ४-५ पूल पार करून 'की लार्गो - एस्लाम्राडो -म्यारेथोन -अशी छोटी छोटी बेटे पार करून एका सलग”७ मैल पुलावरून”पलीकडे आपण”किवेस्ट”अर्थात यु एस ए चे पूर्व- भागातील- दक्षिणे कडील शेवटचे टोकाचे बेटावर आमचे -”पहीले”पाऊल पडले. “डेजइन “या मोटेल मध्ये आम्ही रात्री १२. ३० ला पोहोचलो अन लगेच गाद्यांवर- पहूडलो देखील.

सकाळी निवांत उठून नाश्ता पाणी करून- की वेस्टच्या बीचवर गेलो तेथे विशाल सागर लांबवर पसरलेला दिसला. ऊन मी म्हणत होते. थोडावेळातच तेथून पळ काढला. कारनेच

गावात भटकंती केली. की वेस्ट हे टुमदार असे छोट्या छोट्या बंगल्यांचे गाव. आकर्षक व झाडांनी वेढलेले गुलमोहोरानी सजलेले. अमेरिकेत घरांवर नावाच्या पाट्या अभावानेच पहावयास मिळतात. तेथील एका बंगल्या बाहेर चक्क लाकडी पाटीवर-

"Earnest Hemingway's-Home"अशी पाटी दिसली. ती आम्ही क्यामेरा बद्ही केली. लिटरेचर -१९५४ - सालचे"नोबेल पारितोषिक विजेता"- हा हरहुन्नरी अमेरिकेतील लोकप्रिय - लेखक. त्याची भाषा सोपी व ओघवती इंग्रजी होती. पु. ल. देशपांडे यांनीही यांच्या पुस्तकाचे -"एका कोळियाने "(द ओल्ड म्यान अन्ड द सी ) या नावाचे पुस्तक भाषांतरित केले आहे. हा तरुण वयात दुसऱ्या महायुद्ध मध्ये अम्बुलंस चालवीत असे. त्या कालखंडावर एक पुस्तक लिहिले. पुढे पत्रकारिताही केली व नावारूपास आला. आयुष्य फार धकाधकीत गेले. वडील फिजिशियन तर आई मुझिशियन. चार लग्ने झाली. दारूचे व्यसनाधीन. ब्लड प्रेशर -डायबेटीस चा शिकारी बनला विमान अपघातातून मरणाच्या दाढेतून बचावला. की वेस्ट पासून ९० मैलावर "क्युबा"देशातही त्यांचे

वास्तव्य होते. पर्यटन -फिशिंग -शूटिंग -ड्रिंकिंग चा नाद. तेथेच - पुढे मानसिक रुग्ण -शॉक ट्रीटमेंटही घ्यावी लागली. लिहिता येणे अशक्य झाले. त्यास कंटाळून - तोंडात गोळया उडवून आत्महत्या केली. त्यांचे घरातील इतर 4 जणांचा मृत्यूही आत्महत्येने झाला. (वडील -भाऊ -बहिण-व मोडेल- अकट्रेस नात ) याचे की वेस्ट -''प्याराडाईज ''येथील 'घर' आज एक- ''त्याच्या स्मृतींचा ऐतिहासिक असा ठेवा झाला आहे.''

दुपारचा ५ वाजताचा आमचा वेळ चक्क- भर समुद्रावरील -हवेतच गेला. सर्वांनी - प्यारा सेलिंग केले. छोट्या बोटीतून आम्हाला भर समुद्रात नेले. तेथे गेल्यावर एक प्याराशूट हवेत उंच सोडले गेले. त्याचे एका टोकास झोक्यावर बसल्या प्रमाणे दोघांना बसविले. व हळू हळू पतंग जसा वर जातो त्या प्रमाणे आपण उंच जातो डोक्यावर प्याराशूटचा हवेशीर फुगा. बसताना चांगलीच भीती वाटली पण वर वर जाताना मात्र स्थिरता वाढतच गेली. त्या- खाऱ्या हवेतील - गोडवा चाखतच त्या ''हवेत- तरंगत रहातच सर्वांनी सपत्नीक

आनंद घेतला. थोडक्यात -पतंग हवेत गेल्यावर कसा स्थिर रहातो व डौलात असतो तसा अनुभव आला. तो ही ताशी - ३० मैल पाळणार्या बोटी-व समुद्रापासून-५०० फुट उंच. असा आगळा वेगळा अनुभव अमेरिकेच्याही- भू भागा बाहेर - पूर्व दिशेच्या - दक्षिण टोकावर घेतला. व अटकेपार झेंडा लावल्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

“२३ सप्टेंबर २०११-सकाळीच- मंदारला वाढ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

“सकाळी की वेस्टच्या बीचवर भटकंती. टुमदार बंगल्यांचे फोटो सेशन. समुद्रातील जेली फिश चे व्हीडीओ चित्रीकरण. अमेरिकेच्या सदर्न मोस्ट भू प्रदेशाचे प्वांईट ची - खुण-गाठ असलेल्या विशाल शिळे जवळील फोटो यातच वेळ गेला. एका टपरीवजा छोट्या - हॉटेल मध्ये गरमा गरम - अमेरिकन कॉफीचा आस्वाद घेतला.

मंदारच्या - ३२ व्या वाढ दिवसाचे सेलेब्रेशन हॉटेल रूम मध्येच -केक- कापून केले. वयाच्या- ३-३२ -५३ -व ६० या रेंज मध्ये असलेल्या आमचा हा अमेरीका वास्तव्यातील

अविस्मरणीय असा -क्षणही अनुभवला. त्याने की “वेस्ट”मधील वेळ -जरासुद्धा- वाया न जाता सार्थकी लागला.

दुपारी पूर्ण विश्रांती झाली. मिलिंद -मंदार -प्राजक्ता ४ वाजता स्नुबा डायव्हिंग साठी रवाना झाले व आम्ही समोरील -स्विमिंग पुलात डुंबत राहिलो. परत आल्यावर सर्वांनी मिळून अनुष्का सह तरन्गिनिचा पुरेपूर - फायदा घेतला. अश्या आगळ्या -वेगळ्या पद्धतीने आजचा दिवस आनंदातच अस्तास गेला. सायंकाळचे- डिनर- टी जी एस फ्रायडे मध्ये घेवून. पुढील दिवसाच्या अर्थात -परतीच्या प्रवासाचे आडाखे बांधीत निद्राधीन झालो.

डॉ. अरविंद वैद्य

३० सप्टेंबर २०११

अमेरीका

## अमेरीकेतील -लाईफ टाईम - याचिव्ह मेंट-

## (६ )

****

Will will find it's way. -इच्छा तेथे मार्ग.!

मार्ग- ही अनेक प्रकारचे असतात. हवाई -जल-भू मार्ग बरोबरच खुश्कीचे - काट्या- कुट्यानचे , खडतर -डोंगराळ - अन पाऊल वाट ते राजमार्ग असेही त्यांचे उपप्रकार अन आत शिरण्याचा व बाहेर पडण्याचा,चांगला व वाईट असेही पोट-प्रकार एक ना दोन. अन हो एक राहिलाच की जाण्याचा अन परतीचा सुद्धा मार्गच असतो.

की - वेस्ट-च्या- किल्लीचे आकाराचे”भू”भागास-गवसणी घातली अन लक्षात आले की येथून पुढील मार्ग तर जल मार्गाने- लॉक-झाला आहे. जवळच ९० मैलावर -क्युबा-नावाचा नवा देश वसला आहे. परंतु -पारपत्र जवळ नसल्याने परतीचा मार्ग चोखाळण्या शिवाय दुसरा पर्यायच नसल्याने

आम्ही महाराष्ट्रातील-' मान्सून 'प्रमाणेच घराकडे- व्हर्जीनियाकडील परतीच्या प्रवासाकडे प्रस्थान ठेवते झालो.

सकाळची- सूर्योदयाची प्रसन्न वेळ. थंडगार खारी हवा व सूर्य किरणांचा- की वेस्टच्या विशाल जलाशयावर पडणारा नेत्र दीपक ' फ्ल्याश' पहात ,आमच्या या ‘‘न भूतो न भविष्यति’’.! अविस्मरणीय - अश्या दूरदेशीच्या भूमीवरील ' फ्यामिली गेट टुगेदर ' सफरीच्या - विविध मुग्ध -मधुर आठवणी मनात बंदिस्त करतच आमच्या कारची चाके ' परतीच्या मार्गाला 'लागली. ३ वर्ष्याचा नातीने दिलेली सहर्ष्य - सक्रीय साथ ही एक मोठी -जमेची बाजू होती. पण परतीचा प्रवास थोडा सुखकर व्हावा या दृष्टीने आम्ही ऐन वेळी -"अनुष्का - सौ. अश्विनी व सौ प्राजक्ता’’तिघींना विमानाने पुढे पाठविण्याचा निर्णय घेतला. फोर्ट लोडर डेल-हॉलीवूड - इंटर न्याशनल - एअर - पोर्ट वरून दुपारी १. ३९ चे विमानाची तिकिटे ऑन लाईन बुक केली अन अजून - दोन दिवसाचा कारचा - प्रवास -दोन तासाचे विमान प्रवासातच संपणार होता. त्यानुसार निघालो सुद्धा.

परतीचा प्रवास भर उजेडी असल्याने येताना रात्रीच्या अंधारात पहावयास न मिळालेली चिंचोळया अश्या एकमेव मार्गाच्या सागर तीरावरच्या- नव्हे सागरावरील अधांतरी अश्या ''''७ मैल ''सलग पुलावरील व त्या जोडीला असलेल्या तीन - चार पुलावरून मार्ग क्रमणा सुरु केली. जी पी एस वर ही निळयाशार पार्श्व भूमीवर सरळ नाम ओढावा तसा एकच- गुलाबी भू -मार्ग दिसत होता. आकाशात ढगांच्या संमिश्र गर्दीने सूर्याचा लपंडाव ही सुरूच होता. ४-५ तासांचा एकेरी - मार्ग ४५ की मीच्या मर्यादेने लवकर संपत नव्हता. विमान तळावर पोहोचण्याची वेळ १२. ४५ अशी जी. पी. एस. दाखवीत होता. आजू बाजूच्या निसर्गरम्य दृश्यांचा वेध घेत मार्ग मागे पडत होता आणि आम्ही पुढे जात होतो.

' फ्लोरिडा ' मध्ये कार शिरताच राज मार्गावर गाडीचा वेग वाढला खरा पण डाऊन टाऊन जवळ येताच पुन्हा त्र्याफिक मुळे अपेक्षित वेळेत गाडी विमान तळावर पोहोचेल या आशा धुसर होऊ लागल्या. तेंव्हा नाईलाजास्तव फ्लाइट री -शेडूल करून त्या नंतर रात्री ८ ची करून घेतली. आम्ही विमानतळाव

यालाच म्हणतात -MAN PROPOSES AND GOD DIS-POSES. असो विमानतळावर- ७ तास मनमोकळ्या वातावरणात काढून पुढील हवाई प्रवासास शुभेच्छा देवून - त्या तिघींचा आम्ही निरोप घेतला व फ्लोरिडातील पुढील मार्ग क्रमणेस नव्या जोमाने शुभारंभ केला.

मिलिंद - गाडीचे सारथ्य सार्थपणे करत होता. मध्येच धुवांधार पावसानेही आपले -डोके वर नव्हे , वरून खाली जमिनीकडे जोरदारपणे मुसंडी मारत -करून आमच्या अपेक्षित वेगात -खो - घालत आमच्याशी लपंडाव खेळत राहिला २. ३० वाजता कॉफी ब्रेक घेवून मंदारने कारचे स्टीअरिंग हाती घेतले ते थेट -शानटी येथील होवर्ड जोन्सन या मोटेलवर मध्यरात्री मुक्कामास थांबलो. भारतीय वन्श्याच्या पटेल स्त्रीचे ते मोटेल होते.

सकाळी उठून त्यांचाच भरपेट ब्रेकफास्ट करून व्हार्जीनियाकडील शेवटच्या टप्प्याच्या प्रवासास सुरुवात केली. अनुष्का -अश्विनी -प्राजक्ता रात्री ११. ३० लाच हंडन ला घरी पोहोचल्याने चिंता नव्हती. आम्ही चौघेही निवांत

गप्पामारीत ही सकाळी - ९ वाजता निघालो ते थेट मध्ये एक कॉफी ब्रेक घेवून सायंकाळी ५ ३० ला -लीटल करनट ड्राइव्ह येथील घरी सुखरूप पणे पोहोचलो.

अमेरिकेत आल्यावर सहजच - मंदारला आम्ही दिवाळीचे गेटटुगेदर इकडेच ट्रीप करून करूयात असे सांगितले त्याप्रमाणे त्याने यु. एस. व्हिसा साठी अर्ज केले व महिन्याच्या अवधीत व्हिसा मिळून आम्ही मनात योजलेली ट्रीप प्ल्यानिंग नुसार पारही पडली. त्यासाठीची पूर्व तयारी -हॉटेल बुकींग- साईट सीन दर्शन वगैरेची तयारी महिना भर अगोदर सौ. प्राजक्ताने केली. आम्ही त्यास अनुमती दर्शविली. ड्रायव्हिंग ची जबाबदारी चौघांनी समर्थ पणे स्वीकारली.

-आजी - आजोबा -मुले- सुना आणि - नात अनुष्कासह “तीन”पिढ्यांच्या ह्या अभूतपूर्व -दीर्घअश्या

- कार सफरीचा- आनंद -आम्ही , सर्वांनी सहकुटुंब मिळून - लवकरच दारी येणाऱ्या - दसऱ्याच्या आगमना अगोदरच -अक्षरश: दसऱ्याच्या सोन्या प्रमाणेच मनसोक्तपणे लुटला.!

आणि - २००७ - इंग्लंड - मंदार कडे * यॉर्क युनिव्हरसिटी येथे यॉर्क मधील भारतीयांचे गेट टुगेदर.

२०१० - इंग्लंड. -मंदार कडे * अबिंग्दन -ऑक्सफर्ड ,येथे बाळ शेटे यांच्या घरी गेट टूगेदर.

२०११ -अमेरीका -मिलिंद कडे * हंडन येथे-ट्रेवोर्स रन येथील घरी गेट टूगेदर.

अशी''भारताबाहेरील- सिमोन्ल्लघनाची आमची ''ह्याट्रीक ' पूर्ण झाली व स्मृतीतील क्षण''सुवर्ण-कणमय''झाले.

दसरा सण मोठा आनंदा नाही तोटा .

२०११-च्या

विजया -दशमीच्या सहृदय -हार्दिक -हार्दिक शुभेच्छा - आपणा सर्वांनाही -

दिवाळीचा’’सह -कुटुंब एकत्रित येण्याच्या’’-’’आनंदाचा बोनस ‘‘-यंदाची-

दिवाळी मायदेशीच्या दारी' येण्या अगोदरच मिळालाही आणि धन्य झालो.

डॉ. अरविंद वैद्य आणि कुटुंबीय

६ ऑक्टोबर - २०११

दसरा ( सीमोल्लंघन -३ )

अमेरीका

## सनीवेल मधील ज्ञान सागरास भेट -!

****

अमेरिकेत प्रत्येक शहरामध्ये आबाल वृद्धांच्या बुद्धीला चालना देण्यासाठी विपुल ग्रंथांनी सज्ज असलेली सम्रुद्ध ग्रंथालये आढळून येतात.

थेंबे थेंबे तळे साचे- हे सर्वश्रुत आहेच. तसेच शब्द शब्द मिळून पुस्तके अन ग्रंथ तयार होत असतात. दूध जसे पूर्णान्न तसेच शब्द हे सुद्धा ज्ञांनान्नच असते येथील ‘‘सनीवेल पब्लिक लायब्ररी ‘‘स भेट देण्याचा योग्य आला. पुण्यात ‘‘फर्ग्युसन कॉलेजला ‘‘असताना वाटेवरील रानडे इन्स्टिट्यूट लगत असलेले छोटेखानी ‘‘ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी ‘‘ग्रंथालयास भेट दिल्याची आठवण जागी झाली. तेथील स्वच्छ व शांत वातावरणात रॅक व काचेच्या कपाटातील इंग्रजी ग्रंथ सम्रुद्धी पाहून अप्रूप वाटे. त्याची मेम्बरशिप मिळविण्यास सुद्धा कांही कालावधी लागे.


SUNNYVALE PUBLIC LIBRARY
Entrance



ते दिवस भावी जीवनाचा पाया घडविण्याचे असल्याने फक्त अभ्यासाची पुस्तकेच तेथील २ वर्षाच्या अल्प काळात संपर्कात हाताळता आली. ती ग्रंथ संपदा पाहूनच इंग्रजी भाषेला ‘‘वाघिणीचे दूध ‘‘का म्हणतात हे समजले. ते मिळण्यास अन पचविण्यास तितकेच जड असते. पु ल सारख्या थोर मराठी लेखकांनी सुद्धा या भाषेचा यथेच्छ समाचार घेऊन त्यातील सौन्दर्याचा अविष्कार ‘‘तीन पैशाचा तमाशा ‘‘ती फुलराणी अशा मराठी नाटकातून आपल्या समोर आणला. शालेय जीवनात ड्याफोडील्स या कवितेचे विल्यम वर्ड्सवर्थ -टेनिसन -टेल ऑफ टू सिटीज चे चार्ल्स डिकन्स - शेक्सपिअर- यांची फक्त तोंड ओळख झालेलीच होती.

पी जी वूड हाउस- , टॉलस्टाय - अर्नेस्ट हेमिंग्वे अश्या थोर इंग्रजी लेखकांचा मागोवा घेण्याचे राहूनच गेले याची खंत आता वाटते. पण असो बेटर लेट द्यान नेव्हर म्हणतातच ना. असो या लायब्ररीत पाऊल ठेवता क्षणीच- मन पाखरू फ्लॅश ब्याक मध्ये गेले खरे. -पाहू या आता- या ज्ञान सागरातून किती पाणी चाखता येते ते.

समोरच “वेलकम टू सनीवेल पब्लिक लायब्ररीचा “पिवळ्या रंगातील आकर्षक असा फलक आपले लक्ष वेधून घेतो व येथेच आपली ज्ञान पिपासेची तहान भागणार हे लक्षात येते. शासकीय असल्याने मुक्त प्रवेश असतो. उजव्या दालनात सुटीमध्ये लहान मुलांसाठी स्टोरी टाईम - इंग्रजी ऱ्हाईम्स हावभावासह गाऊन दाखवून मुलांचे मनोरंजन व लायब्ररीची तोंड ओळख होण्या साठीची उत्तम सोय असते. अश्या कार्यक्रमासाठी पालकांसह १२० लोकांना बसता येईल एव्हढा हॉल असतो. येथे सर्व ठिकाणी जेथे जेथे लोकांनी एकत्र जमण्याची जागा असते अशा मंदिरातही तेथे किती लोकांनी जमावे या बाबत बंधने असतात व ती कटाक्षाने पाळली जातात. बाजूच्या हॉल मध्ये लहान मुलांसाठी वयानुसार कमी उंचीच्या रॅक मध्ये रंगीत मुखपृष्ठांची - लहान मुलांना सहजपणे उलटता येथील अश्या जाड पानांच्या पुस्तकांचा भरगच्च भरणा असतो. येथे खाली बसून तसेच टेबल खुर्ची वर बसून आपल्याला हवे ते पुस्तक वाचण्याची सोय असते. याच मनमोहक वातावरणात मुलांची अन त्या बरोबर पालकांचीही वाचनाची आवड वाढीस लागते. आणि “वाचाल तर वाचाल “याची अनुभूती येऊ लागते.

दुसऱ्या बाजूस मोठ्यासाठी वाचनासाठीची सोय असते. सभोवताली असंख्य रॅक मध्ये विषयानुरूप पुस्तके व अनेक सिनेमांच्या ( हिंदी - इंग्रजीसह ) डी व्हीडीज क्रमवार लावलेली आढळून येतात. मध्य भागी लांब लचक टेबलवर कॉम्पुटरर्स ची व्यवस्था असते. तेथे बसून आपल्याला घरच्या प्रमाणे तो हाताळता येतो. आपणास एखादे विशिष्ट पुस्तक हवे असल्यास त्याचे नाव टाकून कॉम्पुटर स्क्रीनवर त्याचा क्रमांक व ते कोणत्या रॅक मध्ये मिळेल याची माहिती मिळून येते. काही भाग रिसर्च करणाऱ्या अभ्यासूंसाठी व शांतता राखण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले दिसतात. मधूनच पाणी पाण्यासाठीची व वॉशरूमची सोय असते. स्वतंत्रपणे एकट्याने बसता येईल अशीही सोय असते. सगळीकडे शांत असे वातावरण असते. भिंतीवरील सूचना फलक योग्य ते मार्गदर्शन करतात. अनेक अभ्यासू - रसिक वाचक याचा मोफत व मुक्त आनंदाने लाभ घेत असल्याचे दिसून येतात. जेष्ठांसाठी मोठा टाईप असलेली पुस्तके असतात. आपल्याला पुस्तकाच्या पानांची झेरॉक्स / स्क्यानिंग हवे असल्यास त्याचीसुद्धा येथे तत्परतेने सोय केल्याचे दिसून येते. येथील-”शासकीय ग्रंथालयाची”अशी

समृद्ध ठेव पाहूनच - विद्या विनयेन शोभते!व -ग्रंथ हेच आपले गुरु - याचा गर्भितार्थ अनुभवास येतो.

घरी नेण्यासाठीच्या पुस्तकांच्या संख्येवर येथे बंधन नसते, ती कितीही नेऊ शकता पण डीव्हीडीज साठी मात्र आठवड्याला २० असे बंधन आहे. त्याची नेल्याची नोंद आपणच आपल्या मेम्बरशिप कार्ड द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने क्लिक करून ( मॉल मध्ये बिलिंग करतात त्या प्रमाणे ) घ्यावी लागते. ती परत करण्यासाठी लायब्ररीचे बाहेरील बाजूस खास खिडक्याचे झरोके ठेवलेले आहेत. त्यातून एकेक पुस्तक आत सोडवायचे प्रत्येक वेळी हिरवा दिवा लागतो. व पुस्तक मिळाल्याची नोंद होते. लायब्ररी बंद असली तरी ही व्यवस्था चालूच असते. त्यामुळे सुटी दिवशी सुद्धा दिलेल्या मुदतीत पुस्तके केंव्हाही परत करता येतात व दंडा पासून दूर राहता येते. आजू बाजूस हिरवळ व झाडांची वनराई व चहापानाची ( स्वतःची पदरमोड करून ) व्यवस्था असते. यामुळे वातावरण अधिकच प्रसन्न झालेले दिसते.

सनीवेल पब्लिक लायब्ररी टाइम कॅप्सूल -१९८५-ते २०८५ -अशी पाटी असलेली कोनशिला जमिनीवर

आढळली. त्याची पार्श्वभूमी अशी- या कोनशिले खाली १९८५ साली अस्तित्वात असलेली पुस्तके - चलने -पेहेराव - इ येथील संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या वस्तू १०० वर्ष जतन करून ठेवल्या जातात. २०८५ सालीच ती शिला उघडून त्या वेळच्या लोकांना मागील १०० वर्षांपूर्वीच्या परंपरेची माहिती व्हावी हा त्या मागील उद्देश असतो असे समजले.

अश्या ह्या ग्रंथ संपन्न सागराची धावती भेट घेऊन पुनःश्च भेट देण्याचे आश्वासनाने आम्ही घराकडे परतलो. पाहू या आता- हात कितीसे ओले होतात ते.! -

****

सनीवेल अमेरिका एप्रिल २० -२०१७

## **नायगऱ्याच्या -तुषारांनी चिंबभिजलेले- क्षण**

***

२८ मे २०११ -आज येथे येऊन एक महिना झाला देखील.

पूर्व नियोजित’’लॉंग विक एंड’’च्या प्ल्यान नुसार सोनेरी सकाळी-. निसान - ALTIMA-कारने आम्ही सर्वजण निघालो.

वर्जिनिया -मेरील्यान्ड-पेनसिल्वानिया -ह्या तीन स्टेट पलीकडील न्यूयोर्क येथे पोहोचण्यास- आठ तास लागले

. एव्हढा प्रदीर्घ प्रवास असूनही प्रशस्त रस्ते -सभोवतीची हिरवळ -दाट वृक्षराजी मुळे प्रवास नयन मनोहारी झाला. रेड कार्पेट- मोटेल (लोजिंग ) मध्ये येऊन फ्रेश झालो

लगेच तेथून -१० मैल दूर असलेल्या मुख्य आकर्षणाच्या ओढीकडे आपोआपच ओढले गेलो.


न्युयोर्क मधील सायंकाळच्या रहदारीतून वाट काढीत आम्ही''नायगरा धबधब्याच्या''-NIAGARA -FALLS-NEWYORK STATE PARK ''परिसरात प्रवेश केला.

डाव्या बाजूस संथ अश्या विस्तीर्ण पसरलेल्या नायगरा नदीचे पात्राचे दृश्य दिसू लागले.

कार पार्क- करून पायी त्या ऐस- पैस पसरलेल्या बागेतून कामेर्या सह. हिरवळीचा लांब रुंद पट्टाओलांडून नदीकाठाने फिरू लागलो.

हळू हळू नदीच्या पाण्याच्या पात्राचा खळखळाट ऐकू येऊ लागला. जसजसे पुढे निघालो तसा नदीचा अवखळ पणा वाढू लागला.

पात्रातील दगड धोंडे खाच खळगे ओलांडतही मंजुळ पणे आवाज करत वेगाने पुढे वहात होती. सफेद फेसाळ लेले पाण्याचे वाढत जाणारया फुगवट्यानी नदीचे पात्र अधिकच देखणे दिसू लागले अन- क्यामेर्याचा किलकिलाट- (क्लिक -क्लीकाट )केंव्हा सुरु झाला हे कळलेच नाही.



आजू बाजूस विविध देश वासीय आपापल्या पेहेरावात -प्रसन्न भाव मुद्रेत आपली छाप उमटवीत होते.

रस्त्यावरून हिरव्यारंगाची जोड बस पर्यटकांना विस्तीर्ण बागेचे दर्शन घडवीत मजेत फिरविताना दिसत होती.

नदीवरील पुलावरून जाणारे येणारे उत्चाही जन सागर त्यावरून दिसणाऱ्या व वेगाने पुढे पळणाऱ्या पाण्याच्या शुभ्र धवल मोठ्या लाटा पाहत भान विसरून जाऊ लागला.

पूल ओलांडून पलीकडे”महाजनो गतः - सः पंथः  नुसार मार्ग क्रमण करू लागलो. वृक्ष वेलीतून वाट उताराचे दिशेने उतरत होती. कांही पायऱ्या उतरून आम्ही एका विशाल टप्प्यावर आलो नी उजव्या बाजूस पहातो तो काय -? नदीच्या सफेद - फेसाळ पाण्याचा लांब रुंद पडदा - खोलवर दरीत झेपावणारा- घनगंभीर आवाजातील प्रपात!

. अहाहा.!

वाउ- हे शब्दही अपुरे पडतील असे ते नेत्र सुखद-दृश्य.

नायगऱ्याचे प्रथम दर्शनातच -' ती पाहता मधुर-बाला कलिजा-खलास झाला ‘‘अशी अवस्था न होईल तरच नवल.

ते दृश्य पाहण्याचे आपणही साक्षीदार आहोत याची प्रत्यक्ष्य छबी उमटविण्याचा सर्वांची अहमहमिका सुरु होतीच.

अंधार पडू लागला. दिवे चमकू लागले. नदीतील पाणी खोलवर दरीत आतापर्यंतच्या धावपळीने दमछाक झाल्याने संथ गतीने जाताना दिसत होते.

समोर नदी पलीकडे ‘‘क्यानडा ‘‘देशाची राजधानी ‘‘टोरांटो शहरातील देखणी उंच अशी रीव्हाल्विंग हॉटेल - क्यासिनो आदी इमारतीचा देखावा तिकडे येण्यास खुणावत असतो.

क्षण भरातच समोरून दिव्यांचे फोकस पाण्याच्या प्रपातावर पडून निळेसर -गुलाबी- हिरवे रंगांचे पट्टे वाहताना दिसू लागले. या धबधब्यातून पडणाऱ्या पाण्याचा प्रचंड अश्या पाण्याच्या पांढऱ्या शुभ्र तुषारांवर पडणारे प्रकाशझोत इंद्रधनुष्याची मजा आणतात.

तसेच या नदीच्या दरीतून दोन्ही तीरांना जोडणाऱ्या महाकाय लोखंडी कमानीवर”RAINBOW BRIDG"हा पूल दिमाखात उभारून येथील निष्णात तंत्रज्ञाची कालाकुश्लताही नजरेत भरते.

त्या वरून पायी व कार द्वारे हाकेच्या अंतरावरील क्यानाडा -अमेरिका वाहतूक निर्धोकपणे वहात असल्याचे दिसून येते. त्यासाठी आवश्यक असते ती फक्त अधिकृत पारपत्राची

# नायगऱ्याच्या -तुषारांनी चिंबभिजलेले- क्षण
# भाग २

*****

मनुष्य हा एक सदा अतृप्त प्राणी असतो. हे येथील इतर ५ आकर्षानावरून दिसून येते. आतापर्यंत नेत्रसुख दिलेल्या ‘‘नायगऱ्याच्या ‘‘अधिकाधिक जवळ जाण्यासाठी ती असलेली ती ५ आकर्षणे या विस्तीर्ण परिसरात आहेत.

१ ) MAID OF THE MIST -एका मोठ्या मनोऱ्या वरून धबधब्याचे तीन भाग दिसतात. १ AMERICAN FALLS- BRIDAL VEIL FALLS-HORSESHOE FALLS

येथील ‘‘ओब्झर्व्हेषण ‘‘टोवर मधील लिफ्टने खोलवर दरीतून नायगरा नदीकाठी क्षणात उतरायचे. तेथील दुमजली बोट आपणास नदी पात्रात खोलवर पडणार्या पाण्याचे प्रपाताचे

जवळून फेरफटका मारून आणते. त्यासाठी रेनकोट घालावे लागतात. पण बोट जेंव्हा त्या जवळ येते तेंव्हा पाण्याच्या प्रचंड तुषारांच्या धूसरपणाचा फायदा घेत ते पाणी आपणास नख शिखांत भिजवून मोकळे होते. ही अनोखी रंग पंचमीची मजा सर्व पर्यटक आनंदात फोटो घेत लुटतात.

२ ) CAVE OF THE WINDS - यासाठी डोंगर पोखरून सोय केलेल्या लिफ्ट मधून नायगरा नदी तळाशी येतो. तेथून लाकडी जिन्याने HURRICANE DECK WAR वरून पडणाऱ्या पाण्याचे तुषारांच्या थंडगार लोंढ्याने सचैल आंघोळ करण्याचा मनमुराद आनंद घेता येतो. 3 ) NIAGARA GORGE DISCOVERY CENTER- छोट्या थियेटर मध्ये चित्रपटाद्वारे या नायगर्या नदीचा इतिहास उलगडला जातो.

४) AQUARIUM OF NIAGARA - विविध माशांचे प्रदर्शन येथे पहावयास मिळते.

५ )NIAGRA FALLS SCENIC TROLLEY - अर्ध्या तासाच्या या जोड बसमधून आपल्याला या पार्कचा

अखंड प्रवास घडतो. वरील सर्व ठिकाणे पाहून झाल्यावर यामधून पुढे- पुढे प्रवास करत आरामात टाईम पास होतो.

हौशी पर्यटकांसाठी -Rainbow Air -HELICOPTER TOUR-above and around the falls to enjoy the majestic power and beauty of the falls from air is available.

अश्या अत्याधुनिक यांत्रिक सुख सोयींनी-''नायगऱ्याने पुढे केलेल्या दोन हातांच्या प्रचंड मिठीत सामावण्याचा एक प्रयत्न अमेरिकन कुशल तंत्रज्ञांनी केलेला दिसून येतो आणि आपणही त्याची मजा लुटतो.

हे सर्व पहात असताना पायपीटही भरपूर होते. उदर भरणासाठी आम्ही''कोहिनूर''या पंजाबी हॉटेलच्या बुफे जेवणाचा आस्वाद घेतला. तेथे चक्क -कढी- भाजी -पालक पनीर -बुंदी रायता बटाटा-कोबिमिक्स भाजी चपाती आणि भरपूर पाणी सुद्धा असा भरपेट इंडिअन मेनू होता.



न्यू योर्क मधील''तोनावंदा ''शहराच्या कोंदणातील ''नायगरा'' ह्या पांढरा शुभ्र हिऱ्याची नेत्रदीपक चमक डोळयात साठवून त्याचे पाण्याने ''चिंब भिजूनच ''आमची दोन दिवसांची लॉंग विक एंड टूर ची सांगता झाली. आमच्या ''पर्यटन खात्यात ''पंच ज्ञानेन्द्रीयाना तृप्त करणारी जगप्रसिद्ध निसर्ग किमयेची NIAGARA - FALLS ची नोंद झाली ती कायमची.

# गोल्डन गेट ब्रीज -!(लोकल ते ग्लोबल )

***

ओढ्यावरती पूल बांधती इकडून तिकडे जाण्याला ,तिकडून इकडे येण्याला -हे सुपा. गावी. आजोळी ओढा पहात आळवलेले बालगीत आणि

सेतू बांधारे सागरी-सेतू बांधारे सागरी -असा गीत रामायणातील वानर सेनेचा उद्धोष हीच काय ती सेतू बद्दलची ओळख. हळू हळू पुण्यातील संभाजी पूल (लकडी पूल ) हा पूल अगोदर लाकडांचा होता. अशी पुलाबद्दलची ओळख वर्षा गणिक वाढत गेली.

आज मितीला मानव क्षणार्धात जमिनीवरून आकाशात अन जल मार्गानेहि परदेशात जात आहे व सारे जग काबूत घेण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु जलाशयाने विभागलेल्या दोन जमिनीच्या टोकांना पुलांनी जोडण्या शिवाय पर्याय नसतो. त्यामुळेच दोन्ही बाजूंच्या लोकांचे दृष्टीने जाणे येणे सुखकर होते. अश्याच एका महाकाय पुलाचे दर्शन आज अमेरीकेत झाले.





तो म्हणजे स्यानफ्रॅन्सिस्को खाडी अन प्यासिफिक महासागर याना जोडणारा गोल्डन गेट ब्रीज. १९३४ ते १९३७ या चार वर्षात बांधून झालेला व कुशाग्र बुद्धीच्या इंजिनिअर्सचा महत्वाकांक्षी जगभरचा त्या काळातील १ नंबरच प्रकल्प ठरला होता. त्या मुळेच त्यांची नावे तेथील पोलवर कोरून ठेवलेली आहेत. ,.

दोन भव्य उंचीचे पिलर्स व त्यांना दोन्ही बाजूस जोडणारी जाडजूड सुमारे तीन फूट व्यासाची ‘‘‘सस्पेन्शन केबल्समुळे ‘‘त्याची भव्यता जाणवते. त्या केबलचा एक ५फूट लांब व ३ फूट व्यास असलेला दंड गोल तुकडा पर्यटकांना तेथे ठेवण्यात आलेला आहे तो एखाद्या तोफेपेक्षा कमी नाही. त्यावेळी याची उभारणी कशी केली असेल याची कल्पनाच केलेली बरी. संपूर्ण पूल लालभडक रंगानी रंगविलेला असल्याने त्याचे सौन्दर्य सूर्याचे लख्ख प्रकाशात चांगलेच उजळून दिसत होते. बऱ्याच वेळी पर्यटकांना धुक्याने अथवा ढगांनी वेढलेल्या अवस्थेतील पुलाचे दर्शनावर समाधान मानावे लागते.

पुलाच्या कडेने पर्यटक आणि सायकलस्वार यांच्या भ्रमंतीसाठी सुरक्षित पदपथ आहे. त्यावरून आम्ही मोठ्या पिलर्स पर्यंत जाऊन पुलावरील थंड वाऱ्याला अंगा खांद्यावर खेळवले. असंख्य पर्यटक आपल्या इवल्याश्या कॅमेऱ्यात त्या भव्य पुलाला बंदिस्त करण्याचा करण्याचा आटापिटा करताना दिसत होते. परतीच्या मार्गावरून समोरचा चकाकता सागर किनारा. सिलीका◌ॅन व्हॅली आणि डोंगरावर चढत जाणारी स्यानफ्रॅन्सिस्को मधील घरांची उतरंड मनोवेधक दिसत होती.

आजोळ सुपे- येथील दगड धोंड्याचा ओढ्यावरील- लोकल पुलापासून सुरु झालेला प्रवास - पुण्यातील संभाजी पूल-. तसेच नवी मुंबई येथील खाडी ब्रीज -वांद्रे येथील नवीन झालेला “सी लिंक ब्रिज”-हृषिकेशचा लक्ष्मणझुला - रामेश्वरचा पंबन ब्रीज -इंग्लंड चा लंडन ब्रीज २००७ त्यानंतर आज १० वर्षानंतर २०१७ साली अमेरिकेतील- गोल्डन गेट ब्रीज पर्यन्त पोहोचून ग्लोबल झाला आणि दृष्टीसुद्धा दसपट विशाल झाली आहे.

. ओढ्यावरील पुलासारखाच या सर्व पुलांचा वापर इकडून तिकडे अन तिकडून इकडेच जाण्या येण्यासाठीच होतो. फरक एव्हढाच ओढ्यावरील पुलावर गावातील मूठभर मंडळींचीच हालचाल असते तर या जगप्रसिद्ध पुलांवर देशोदेशीचे पर्यटक आपली चहल पहलची हौस भागवून घेताना दिसतात तर कधी चित्रपटांतून याचे नेत्रसुखद दर्शन होते. अहो पण हे सर्व घडण्यास कारणी भूत ठरतात ते दोन महत्वाचे कागदी पूलच आणि ते म्हणजे आपणास परिचित असे- पासपोर्ट आणि व्हिसा.! -

*****

सनीवेल

एप्रिल २४ / २०१७

# अमेरिका -कॅलिफोर्नियातील- जुना बाजार -

# -( ग्यारेज सेल )-!

****

या पृथ्वी तलावर बदल हा एक नैसर्गिक रीवाज आहे. त्यामुळे प्रत्येकासच आपल्या जीवनात बदल हवा असतो. त्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील असतो.

अन्न -वस्त्र- निवारा या मूलभूत गरजा देखील स्थल कालानुसार बदलाव्या लागतात हेच अनुभवास येते.

असे असेल तर जुन्या झालेल्या वस्तूंचे करायचे काय.?

देश तसा वेश अन खानपानाचा हि वेगळा सोस अवलंबावा लागतो.

हे पर्यटनात हि चांगले अनुभवास येते.

जुन्या वस्तूंचा आढावा आपण दिवाळी दसऱ्याचे आगमनापूर्वी घराची स्वच्छता करताना घेतो. अनेक जुन्यावस्तू आपण माळ्यावर ठेवल्याचे लक्षात येते

अश्या वस्तूंचा आपण ३-६ महिने उपयोग करत नसू तर सरळ जुन्या बाजारात भंगार भावात लवकरात लवकर विकून घर हलके करीत जावे.

अथवा आपल्या ओळखीच्या गरजूना घरी बोलावून विनामुल्य त्याचे दान करावे व सत्कार्य केल्याचे वेळीच समाधान मिळवावे.

या मुळे गरजू देखील आनंदून अन हरखून जातो असे दिसते.

पुण्यामध्ये संगम पुलाजवळ असा जुना बाजार दर बुधवारी -अन रविवारी रस्त्यावरच अर्धी बाजू बंद करून भरविला जातो.

या बाजारात फेरफटका मारला असता अनेकविध वस्तू खरेदी करण्यासाठीची भाऊ गर्दी तेथे पाहावयास मिळते.

साधे वर्तमानपत्राचेच घ्याना , आजचा पेपर उद्याची रद्दी होते.

तोच पेपर भेळवाला -दुकानदार -इस्त्रीवाला -प्याकिंग व्यवसायात -लेडीज पर्स विकणाऱ्यास अमूल्य असा असतो.

हल्ली कपड्यांची क्वालिटी उत्तम असल्याने ते फाटत नाहीत व असे बरेच कपडे कपाटात न वापरता पडून असतात.

लहान मुले मोठी होतात. त्यामुळे त्याचे कपडे- खेळणी वारंवार बदलावे लागतात. पण जुने आपण लवकर दूर न करता घरातच पडून राहतात

याचे सर्वांनीच वरचेवर अवलोकन करून गरजूना देऊन टाकून मानसिक समाधान मिळवावे. हे बरे.

. आमच्या अमेरिकेतील वास्तव्यातील याबाबतचा अनुभव पुढील प्रमाणे- ( भाग १ )

-

येथे आल्यानंतर प्रथम राहण्यासाठी लीजींग अपार्टमेंटचा आश्रय घ्यावा लागतो.

घरात राहणाऱ्या व्यक्ती नुसार वन रूम किचन -२बेडरूम -अश्या अपार्टमेंट मध्ये राहावे लागते.

त्यामुळे मोजक्याच घरगुती वस्तू घरात असतात.

हळू हळू त्यात भर पडत जाते अन जेव्हा घर बदलण्याची वेळ येते तेंव्हा सगळ्याच वस्तू घेऊन जाणे अवघड होऊन बसते.

यामध्ये इकडील पश्चिमात्य घरातील गरजेनुसार पुढील वस्तूंची खरेदी करावीच लागते.

व्ह्याकुम क्लिनर. (घर साफ करण्यासाठी)

गारबेज कंटेनर. सायकल. ऑफिस दूर असल्यास कार अत्यावश्यक. त्यामध्ये. प्र्याम तसेच. छोट्या बेबीसाठी. ५वर्ष. व त्यावरील मुलांसाठी स्वतंत्र असे कार सीटस्. असावी लागतात. त्या शिवाय लहान मुलांना कारमध्ये बसविता येत नाही.

वयोमानानुसार विविध खेळणी. तीनचाकी सायकल. होपिंग स्कूटर. स्केटिंग बोर्ड. ऋतु माना नुसार कॉटन. व गरम कपडे. कॉटन तसेच थंडीसाठी

ची ब्लँकेटस्. एक ना अनेक गोष्टींनी घर भरते.

घरातील अत्यावश्यक फर्निचर अजून वेगळेच. या सगळ्यांची एकच भाऊगर्दी घरात होते.

दुसऱ्या गावी अन्य ठिकाणी रहावयाचे जायचे झाल्यास. सामान गोळा करताना अनेक अनावश्यक गोष्टी असल्याचे लक्षात येते. तसेच सर्व सामान घेवून जाणे सुध्दाअडचणीचे होते.

अश्यावेळी अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावण्यासाठी येथे या वस्तूंचा आपल्या ग्यारेजमधेच सुटीदिवशी " सेल " लावला जातो. त्याची व्हॉट्स अप तर्फे जाहिरात केले जाते. तसेच गॅरेज बाहेर छोटासा बोर्ड लावला जातो.

अश्या प्रकारे वस्तूंची घरबसल्या यथायोग्य भावात गरजूंना विक्री करतात.

कमी वस्तू असतील तर गॅरेज बाहेरच उघड्यावर ठेवल्या जातात. त्यावर फ्री. किंवा अपेक्षित किंमत लिहून फोन नंबर देऊन ठेवल्या जातात.

गरजू त्यानुसार घेवून जातात.

बेड. गादी. कपाटे अश्या जुन्या वस्तू वेळीच विकल्या न गेल्यास नाईलाजास्तव स्वखर्चाने त्याची विल्हेवाट लावण्यासाठी माणसे बोलवावी लागतात. अन् अक्कल खाते डॉलर्स जमा करावे लागतात.

येथे युज अँड थ्रो ची चलती असल्याने जुन्याची विक्री. दुरुस्तीची सोय नसते.

तसेच किरकोळ वस्तू पॅकिंग स्वरूपातच मिळतात. त्याची जुळणी देखील आपणास त्यातील सूचनेनुसार घरीच करावी लागते.

चांगल्या आवश्यक सामानासाठी मुव्हरस अँड प्याकर्स मार्फत डॉलर्स पेड बहुमूल्य सर्व्हिस उपलब्ध असतेच.

अन् या वेळी " जुने ते सोने " याची महती पटते.

चला आपल्यालाही लवकरच " दसऱ्याला सोने लुटावयाचे " आहे ते ठेवण्यास थोडी जागा घरात निर्माण करण्यास लगबगीने सुरूवात करू या.

(भाग. २)

Sannyvel

California

USA

**अमेरिकेतील -( कॅलिफोर्नियातील ) “हनुमान टेकडी”.!**

*****

आपल्या पुण्यनगरीमध्ये पेठापेठातील गणपती तसेच मारुती मंदिरासाठी सुपरिचित आहे.

सारसबाग -हनुमान टेकडी तर पुण्यातील पेन्शनरांची फिरण्याची हक्काची ठिकाणे.

दोन्ही दैवते विघ्न नाशक आणि संकट मोचनासाठी प्रसिद्ध आहेत.

पुण्यातील घरा -घरातील अनेक मुले आपल्या बालवयातील याच दैवतांच्या -

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची -या आरतीच्या आवर्तनाने आणि

मनोजवम मारुतीतुल्य वेगं अशा मारुतीला शरण जात -

भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती -या रामदास रचित संकट निरसन करणाऱ्या स्तोत्रांचे पठण केल्याने

तीसुद्धा त्यांच्या कृपाप्रसादाने ‘‘वायुवेगाने ‘‘इंग्लंड -अमेरिका -ऑस्ट्रेलिया -युरोप येथे जाऊन राहू लागली आहेत.

त्यांच्या मागोमाग त्यांच्या पालकांनाही अश्या वायूवेगाचा परदेश प्रवास घडताना आज दिसत आहे.


पण यंदाच्या गणेश आगमना पूर्वीच्या ‘‘वीकेंडच्या आऊटिंग ‘‘ला चक्क या ‘‘संकट मोचन मारुतीरायाचेच दर्शन'

आम्हाला येथे अमेरिकेतील वृक्षराजींनी वेढलेल्या माऊंट मेडोना टेकडीवरील, प्राणवायूने भरलेल्या मोकळ्या वातावरणात घडले.

अर्थात आपल्या भक्तांपाठोपाठ बलोपासक मारुतीरायांनाही इकडे येण्याचा मोह आवरता आला नाही हेच या वरून दिसते.

त्याचीच ही सुवार्ता. -.



बाबा हरिदास या भारतीय व्यक्तीने -माऊण्ट मेडोना सेंटर -वॉट्सनविले -कॅलिफोर्निया येथील मंदिराची पाया भरणी २००३ मध्ये केली.

बाब हरिदास हे भारतातील अल्मोरा येथील १९२३ मध्ये जन्मलेले वैष्णवी वैरागी.

त्यांनी १९५२ पासून मौन व्रत धारण केले.

२०१२ मध्ये येथे गणेश मूर्तीची देखील येथे स्थापना झाली.

त्यांच्या मते -

HANUMAN-is one of the main characters in the Ramayan, spiritual classic from India.

He is regarded as the embodiment of pure devotion, service,, and prana ( vital life force )

Hanuman symbolizes the connection between the individual self and the infinite spirit.

The temple complex continues. to evolve.

. A percentage of all temple donations go to support the children of our orphanage in India.

येथील आपल्याकडील तळजाई वजा घाटमार्गाच्या टेकडीवर ,भरपूर झाडे ,शांत वातावरणात रहिवासासाठी प्रशस्त जागा,माऊंट मेडोना स्कुल ,

योग तसेच आयुर्वेदाचे वर्ग ,कायाकल्प वेलनेस केंद्र व पोटपूजेसाठी अंजनेय वर्ल्ड कॅफे व पुस्तक विक्रीकेंद्र एवढ्या सुविधांनी सज्ज आहे.

Welcome to a place of inspiration -

MOUNT MADONNA CENTER-

IS truly a place for reflection, learning and dropping into a deeper connection to the earth, self, and others.

Our resident community is honored to host our guests as well as to steward the sacred natural environment.

Enjoy this space of beauty-redwood forest, ponds majestic, oaks with sweeping views of the valley and ocean.

Opportunity for friendships, connections, transformations and more. await your discovery.

अशी आकर्षक जाहिरात करून हौशी पर्यटक येथे आरक्षण करून आकर्षित होतात त्यांचा अनुभव-अभिप्राय पुढील प्रमाणे-

What a beautiful home you all hold, deep within your hearts, deep within your souls.

Thank you for creating the opportunity to connect and practice, to release, and to grow.

I learned so much about myself, yoga, life, love, and community.

आतापर्यंत सीतामाईच्या शोधासाठी अशोकवनापर्यंत श्री लंकेला भेट दिलेला व “संजीवनी “आणण्यासाठी

मरुत वेगाने द्रोणागिरीपर्यंत दूरवर गेलेला हनुमान माहिती होता.

पण आपल्या असंख्य एन आर आय भक्तांच्या ओढीने थेट अमेरिकेतील कॅलिफोर्नियात हवेशीर वातावरणात

येऊन रुळलेल्या अश्या आगळ्या वेगळ्या संकट विमोचन हनुमंतास भेटण्याचा "योग"

आजच्या शनिवार दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ रोजी आला.

****.

सनीवेल , अमेरिका

२ सप्टेंबर २०१९

( गणेश चतुर्थी

# अमेरिकेतील डी एन्झा पार्क मधील -

# पॉटलकचा -जॅकपॉट -

# अर्थात

# (वनभोजन )-!

****

A potluck is a communal gathering where each guest or group contributes a different, often homemade dish of food to be shared.

चौरस आहाराला आपल्याकडे चांगलेच महत्व आहे.

सर्व मित्र - आप्त मिळून एखादे वन भोजन केल्याने आपले मैत्रीचे संबंध अधिक धृढ होत जातात.

इकडे परदेशात येथील अपार्टमेंट मध्ये भारतातील विविध भाषिक तामिळ -कन्नड -हिंदी -तसेच मराठी पंजाबी तसेच चीन -जपान -इ. कुटुंब रहात असतात.

बहुतांशी पती -पत्नी कामास व मुले डे केअर संस्थेत दिवसभर अडकून रहातात.

५ दिवस काम शनिवार - रविवार आठवड्याची कामे व आउटिंग मध्ये वेळ कसा जातो हे कळत नाही.

शाळेची उन्हाळी सुटी दोन महिने असते या काळात आजी आजोबाचेही देशातून आगमन होते.

त्यांचीही एकमेकांची ओळख होते व त्यांचाही वेळ गप्पात मजेत जातो.

आता लवकरच शाळा सुरु होणार. आहे

त्यापूर्वी जवळील डी -एंझा पार्क मध्ये आज एका पॉटलक पार्टीचे आयोजन केले होते.

प्रत्येकाने एक एक पदार्थ आणण्याचे ठरले. एकूण ५ कुटुंबांनी भाग घेतला.

त्यामुळे ५ विविध गृहिणींच्या तसेच आलेल्या आजीच्या हातच्या चवीचे पदार्थ आणले गेले.

सोबत ३ वर्षा पासूनच्या जोशनी पासून -लोही -रावी -रुमानी -पार्थ -प्रणव-अथर्व आणि अवनी या १३ वर्षा पर्यंतच्या छोट्या मुलांची पलटण होतीच.

बागेतील हिरवाई ,मुलाना खेळण्यास मुक्त संचार , बसण्यास बाके व झाडाखालील थंडावा अन प्राणवायूचा अखंड पुरवठा मुक्त पणे उपलब्ध असतो.

मुलांची अंगत पंगत उरकली अन ते आपापल्या खेळात दंग देखील झाली.

गृहिणींचा व पुरुषांच्या ग्रुप आपापल्या गप्पात अन आणलेल्या पंचपक्वान्नांचा आस्वाद घेण्यात मग्न झाली.













हैद्राबादी -केरळी -मध्यप्रदेश -उत्तराखंड -महाराष्ट्र प्रदेशातील गृहिणींच्या पाककलेचे नमुने एकत्रित चाखण्यास मिळाले.

यामध्ये नवीन ओळखी बरोबरच नवागतांचे स्वागत तर देशात परत निघालेल्या कुटुंबास पुनःश्च भेटण्यासाठी सेंडऑफ दिला जातो.

कांही वेळा सायंकाळी बागेतच -बारबेक्यू (A meal or gathering at which meat, fish, or other food is cooked out of doors on a rack

over an open fire or on a portable grill. -)

चे हि आयोजन केले जाते. यामध्ये बागेतच भट्टी पेटवून त्यावरील गरमागरम ग्रील -केलेल्या पदार्थांचा समाचार घेतला जातो.

त्याची गंमतही वेगळीच असते.

बागेतील वृक्षवेलींच्या सहवासातील पॉटलकचा नवा जॅकपॉट अनुभवण्याचे भाग्य आम्हास यंदाचे ‘‘श्रावणी रविवारी ‘‘दुपारी लाभले.

अन मन प्रफुल्लित होऊन वीक एन्ड संम्पन्न होऊन नव्या दमाने पुढील वीक चे स्वागतास स्ट्रॅांग झालो.

***

सौ. जयश्री व डॉ अरविंद वैद्य

सनीवेल

अमेरिका

१२ ऑगस्ट २०१९

## -अमेरिकेचे अनोखे अंतरंग.! २०१९

****

कोलंबसने शोधलेली अमेरिका खूप विस्ताराने पसरलेली आहे. विविध राज्यात अनोखी अशी नेत्रदीपक सौंदर्याने नटलेली स्थळे आहेत. त्यापैकीच एक. रुबी फॉल.!

अशी स्थळे ट्रॅव्हल कंपनी मार्फत पहावयास मिळत नाहीत. या साठी स्वतःच " कार " पीट करीत लाँग ड्राईव्ह साठी एकदिवस घालवावा लागतो.

दुतर्फा उंच हिरवी कंच झाडी लांबलचक नागमोडी वळणाचा एक्स्प्रेस हाय वे सोबतीला असतातच.

टेनिसी राज्यातील चेट्टानुगा येथील.

रुबी फॉल. उंच तसेच २६ मजले खोलवर असलेला धबधबा आहे.

१९२८ मध्ये लुक आऊट माउंटन खाणींमध्ये उत्खनन करीत असताना लिओ Lambert

या अवलियास याचा प्रथम शोध लागला.

गुहेमधील अरुंद अश्या वाटेने पुढे पुढे जाताना असंख्य नैसर्गिक रित्या दगडामध्ये तयार झालेली सुंदर हिरे माणके पाहताना डोळे दिपून जातात. ही अंधारी वाट विद्युत दिव्यांनी खुबीने सजव लेली असल्याने फारच मोहक दिसते.

अधून मधून नैसर्गिक पाणी झिरपत असल्याने आत थंडावा व ओल असते.

मासे. हत्तीचा पाय. बटाटा चिप्स. झुकता मनोरा. नायगारा धबधबा. झुंबरे. अश्या आकारातील नक्षीकाम पहावयास मिळते.

पुढे गेल्यावर उंचीवरून कोसळणारा पाण्याचा विलोभनीय प्रपात पाहण्यास आपली मान आपोआपच उंचावते.

येथील या नयन मनोहर दृष्यास रंगीत विद्युत प्रकाश झोताने अधिकच रंगत येते. येथेच पहात रहावेसे वाटते. परंतु मागे रांगेत असलेल्या असंख्य वाट सरुंना वाट करून देण्याची सूचना प्रकाश ,झोत बंद करूनच दिली जाते.

डोळ्यात ते मोहक क्षण साठवित आपण गुहे बाहेर पडतो.

सुमारे दीड तास चालणारा हा प्रवास कसा संपतो कळत नाही.

या दगडी हिरा रुपी गुहेचा शोध लावणाऱ्या लिओ याने आपली पत्नी रूबी हीचे सन्मानार्थ ह्या सौंदर्य स्थळास " रुबी फॉल " नाव बहाल केले.

अमेरिकेचा ऐतिहासिक वारसा असलेली ही भूमिगत गुहा पाहण्यास असंख्य पर्यटक धाव घेताना व मोबाईल मध्ये ते क्षण बंदिस्त करण्याचा आटापिटा करताना येथे पहावयास मिळतात ते एक वेगळेच दृष्य असते. त्याचा अनुभव आम्ही दोघांनी मुला. नातींसह ५ जुलै २०१९ ला घेतला.

***

टेनिसी

अमेरिका

६ जुलै २०१९

## आमचा इको फ्रेंडली)

## “पर्यटक- गणपती बाप्पा”-!

*****

*गणेशोत्सवा निमित्त कोकणासाठी जादा एस टी गाड्या सोडण्यात येणार अशी बातमी

वर्तमानपत्रात झळकते अन कोकणातील चाकरमान्यांची गावाकडे जाण्याची लगबग सुरु होते.

गणपतीसाठी आपल्या गावाकडे जाण्याचे हे स्थानिक “पर्यटन “ऐन पावसाळयात सुरु होते.

लाडक्या बाप्पासाठी सजावटीचे साहित्य विविध खाद्य पदार्थ तसेच गणेश मूर्तींची पसंती

अश्या गोष्टींसाठीची दुकाने सजू लागतात अन बाजारपेठेलाही रंग भरू लागतो.

पुण्यातही जादा बसेस सोडण्याची तयारी सुरु होते.

शाडूच्याच मातीचा गणपती असावा असा आता आग्रह दिसू लागला आहे

. गत काळात केलेल्या आपल्या असंख्य चुकांचे भयंकर परिणाम

दिसू लागल्याने शासन अन भक्तगण चांगलाच जागृत झाला आहे.

प्रदूषण मंडळ सुद्धा आपली कामगिरी काटेकोरपणे बजावण्यात दक्ष असल्याचे दिसते आहे.

आमची मुले परदेशी असल्याने एप्रिल / मे महिन्यापासून तिकडे जाण्याचे बेत आरक्षित केले जातात.

पुढील सहा महिन्याच्या वास्तव्यात गणपतीचेही आगमन असल्याने आमची तयारी याच वेळी सुरु होते.

परदेशातील प्रदूषण रक्षणासाठी असलेले अतीकठोर नियमावली असल्याने,

आम्ही सुदधा २००५ पासूनच गणेशाच्या चांदीच्या ‘‘छोट्या ‘‘मूर्तीला पसंती दिली.



मोजकेच डेकोरेशन रंगीबेरंगी विद्युत माळा अन स्थानिक फुले याने छान डेकोरेशन केले जाते.

२०११-(व्हर्जिनिया )- वॉशिंग्टन -२०१७ अन यंदा २०१९ मध्ये (सनीवेल ) कॅलिफोर्निया

अशी अमेरिकेत ‘‘पर्यटक गणेशोत्सव ‘‘साजरा करण्याची आमची ३री वेळ.

मुले -अन नातवंडा समवेत तो आनंदात साजरा केला जातो.

सुख कर्ता दुःख हर्ता ची प्रचिती येते. तसेच अथर्व शीर्षाचे पठणाने डोके हि शांत रहाते

आपल्याकडील धडाकेबाज ढोल लेझीम -कर्ण कर्कश हृदयाची धडकन वाढविणारे डी. जे , अन रेटारेटी करीत

गणपती दर्शन याचा अतिरेक आम्हा जेष्ठ नागरिकांना असह्य होऊ लागल्याने इकडील शांत वातावरणात गणेशोत्सव साजरा केल्याचे मनोमन समाधान मिळत आहे.

या निमित्तानेच आमच्या लाडक्या बाप्पाचे ''पर्यटक गणपती बाप्पा ''असे समयोचित नामकरण झाले आहे.

****

डॉ. अरविंद वैद्य

सनीवेल

अमेरिका

५ सप्टेंबर २०१९

( शिक्षक दिन )

## सण - सुट्ट्या अन जल्लोष -!

*****

## ( अमेरिकेतील -ह्यालोवीन )

-

चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून अर्थात गुढीपाडव्यापासून ते थेट फाल्गुन महिन्यातील होळी पौर्णिमा असे तिथी नुसार सर्व सण साजरे केले जातात.

अपवाद आहेत ते १५ ऑगस्ट -२६ जानेवारी आणि शिवजयंती जी तिथी व इंग्रजी तारखेनुसार साजरी करण्यात येते.

सण लोकांनी एकत्र येऊन आनंदाने साजरे करण्याचे दिवस असल्याने त्यामध्ये जोश अन जल्लोष यांची एकच सरमिसळ असते.

त्यामुळेच दसरा सण मोठा आनंद नाही तोटा. दिवाळी पण अंगणात येऊन थांबली आहे.

अमेरिकेत सणांचा उत्सव भव्य अश्या स्टेडियममध्ये अथव हॉल मध्ये केले जाते. सामूहिक रित्या फटाके वाजविले जातात.

ह्यलोवीन हा शांतपणे साजरा केला जातो. आपल्याकडील पितृपंध्रवडा सदृश कल्पना असते.

उन्हाळा संपून हिवाळा सुरूअसण्याचे सुमारास व दिवस लहान होण्यास सुरवात होण्याचे सुमारास

हा सण साजरा केला जातो.

आपले पूर्वज आपणास भूत सदृश अवतारात भेटावयास येतात अशी धारणा आहे.

त्यामुळे सापळा सदृश अंगरखे घालतात. कवटी- -विचित्र दात सदृश मेकअप करून रात्री घरा समोर उभे राहतात. आपणास ते भीती सदृश वाटते.

डिनर पार्टी असते त्यात तुटके हात -पाय अश्या आकाराचे लाल भडक रंगाची चॉकलेट अथवा भीतीदायक स्वरूपातील खाद्य पदार्थ असतात.

लाल भोपळ्याचे पीक भरपूर आलेले असल्याने व त्याचे कवच कडक असल्याने. त्यामध्ये कार्व्हिंग करून रात्री दिवे लावले जातात.

घराबाहेर आपल्या आकाश कंदील स्वरूपात भीतीदायक असे भूत सदृश्य अश्या वस्तू लटकविलेल्या असतात.

लहान मुले सुद्धा असे पेहराव करून घरोघरी जाऊन चॉकलेट कॅण्डी गोळा करतात व रात्र गमती जमती करीत घालवितात.

सर्व माहोल नवीन माणसाला घाबरवणारा पण गमतीशीर असा असतो.

Halloween-

Festival is at the Doorstep. This

is an annual holiday celebrated each year on October 31,

It originated with the ancient Celtic festival of Samhain when people would light bonfires and wear costumes to ward off ghosts.

In the eighth century, Pope Gregory III designated November 1 as a time to honor all saints; soon,

All Saints Day incorporated some of the traditions of Samhain.

The evening before was known as All Hallows Eve, and later Halloween.

Over time, Halloween evolved into a day of activities like trick-or-treating,

carving jack-o-lanterns, festive gatherings, donning costumes and eating sweet treats.

Children of all ages dress up in costumes and travel from house to house

to receive treats in response to their call of “trick or treat!" The phrase is a subtle suggestion that,

if a treat (like candy) is given, then the child will not perform a “trick" (mischief) on the owner of the house.

In the United States, pumpkins go hand in hand with the fall holidays of Halloween and Thanksgiving.

An orange fruit harvested in October, this nutritious and versatile plant features flowers, seeds, and flesh that is edible and rich in vitamins.

Pumpkin is used to make soups, desserts, and bread, and many Americans include pumpkin pie in their Thanksgiving meals.

Carving pumpkins into jack-o’-lanterns is a popular Halloween tradition that originated hundreds of years ago in Ireland.

Back then, however, jack-o'-lanterns were made out of turnips or potatoes; it wasn't until Irish immigrants arrived in America and discovered the pumpkin that a new Halloween ritual was born.

****

Dr. Arvind Vaidya

Sunnyvale

Californiya

U. S. A.

13th October 2019

( Kojagiri Pornima )

## योसेमिटी -जॉन मुईरने साकारलेले एक निसर्गसुंदर स्वप्नशिल्प -

****

It is by far the grandest of all the special temples of Nature I was ever permitted to enter. -

JOHN MUIR-

Yosemite,s natural beauty can be found in things big and small, from towering grinities cliffs and giant sequoias to diminutive wild flowers. Varied conditions in four geographic areas-

1) High sierra 2),Granite cliffs,3) Sequoia groves and Valley -makes diversity possible.

Explore Yosemite's many facts , take in its many moods and enjoy its views, sounds , and smells.

जॉन मुईर -हा शेतकऱ्याचा मुलगा -मेंढपाळ -संशोधक निसर्गप्रेमी -साहसीप्रवासी -लेखक -वनसंरक्षक अश्या गुणांनी समृद्ध असल्याने त्याचेच शब्दात योसेमिटी कशी आहे याची वरील शब्दातून आपणास कल्पना येते.

योसेमिटी येथील नैसर्गिक सौन्दर्य टिकवून ठेवण्यात पुढाकार घेऊन व त्याचा पाठपुरावा करण्यात तो यशस्वी झाला.

सुमारे ६००० फूट खोल अशी नैसर्गिक दरी म्हणजे ग्रॅनाईट खडकांचे उंच उंच सुळके तसेच अर्धवर्तुळाकार डोम - उंच लांब सडक देवदार झाडांनी वेढलेले जंगल अन तितक्याच उंचीवरून खोलवर दरीत झेपावणारे धबधबे व त्याचेच पुढे खळाळत वेगाने वहात जाणारे व रुंदावत जाणारे फेसाळ ‘‘मर्सेड-’’नदीपात्र. हे सर्व पहात घाटातील वळणे घेत जाणारी आपली बस. -

-खरेच देहभान विसरायला लावणाऱ्या निसर्गरम्य असं वातावरणाचा आम्ही लाभ घेतला.





जॉन मुईर - हा जॉन ऑफ द माउंटन -म्हणून देखील नावाजला गेला. पुनःश्च त्याचेच शब्दात-

Valley “Everything is flowing-. going some where,animals and so called lifeless rocks as well as water". Most of the year, the Merced River flows peacefully through Yosemite valley.

Shrubs and decidues trees enrich the river banks with green ribbon of life.

Moist meadows give way to black oak trees that provide nutritious acorn deer, bears, and wood peckers, as they did for early Indian people.

A flooding Merced however, seems to shout “change “and reconfigures the handiwork of both humans and natures.

खरेतर अश्या शब्दातीत वर्णन करणाऱ्या अश्या - योसेमिटे व्हॅली पाहण्यास जगभरातील हौशी पर्यटक दरवर्षी येत रहातात.

अनसेल ॲडम्स -फोटो ग्राफरच्या मते -"Yosemite Valley , to me is always a sunrise, a glitter of green and golden wonder in a vast edifice ( शिल्प ) of stone and space. -

****

डॉ. अरविंद व सौ. जयश्री वैद्य

सनीवेल

अमेरिका

जून २७ २०१७

# शंभर नंबरी. अश्टोन ब्रुक. अपार्टमेंट.

*****

उन्हाळ्याची सुटी म्हटलेली आमची मामाच्या गावाची सफर ठरलेलीच असते.

पावसाळा आला की ज्ञानरायाच्या पालखीची धामधूम सुरु होते. तुकोबा. मा ऊ ली यांची पंढरीकडे वाटचाल सुरू होते.

यंदा आम्ही याच काळात आम्ही कॅनडा. न्याश विल. Huntsville. चेट्टा नुगा. या गावांना भेट देवून आलो.

आम्ही पश्चिमेकडे तर मामा पूर्वेकडे. जगाबरोबर नातीही आपली जागा आता बदलू पाहत आहे.

त्यामुळे यावेळी मात्र आम्ही नातींच्या मावशीकडे व रूचाकडे त्यांचे बरोबरच " न्याशविल " ह्या टेनीसी राज्यातील छोट्या गावी गेलो ते ही ४ तासाचा विमान प्रवास करून.

डोमेस्टिक. छोटेखानी अलास्का विमानाने आम्ही न्याशवील विमानतळा वरील गरम हवेतच उतरलो.

ललितची कार तयार होतीच.

100 ,Ashton Brook. या टूमदार अश्या दुमजली अपार्टमेंट मध्ये प्रवेश केला.

घरात आमचे स्वागत करण्यास " फ्रेस्नो " हा छोटा पाळीव कुत्रा होताच. त्याने उच्च स्वरात आमचे सर्वांचे आनंदात स्वागत केले अन् आसमंत दुमदुमून गेला.

थोड्याच वेळात तो सर्वांचा मित्र बनून गेला अन् नातींची आमच्या पासून सुटका द.

२ जुलै - छोटी नात चि. रावी चा वाढदिवस असल्याने. औक्षण केले. केक कटिंग करून जोशात वाढदिवस मावशीकडे साजरा झाला.

येथील मुक्कामात जवळील प्रेक्षणीय असणारी रुबी फॉल. अंतराळ संशोधन केंद्र तसेच रोकेट सेंटर.

. रॉक सिटी. इनक्लाइन रेल्वे राईड घेतली. तसेच येथील गणपती मंदिर दर्शन घेऊन पुण्य गाठीशी जोडले.

येथे फिरताना सुंदर घरे त्याभोवती प्रशस्त हिरवळीचे च कंपाऊंड मेपलची डेरेदार झाडे असा नेत्रसुखद माहोल पहावयास मिळाला.

१०० Aston Brook. अपार्टमेंट.

परिसर आम्ही येथील ४ -५ दिवसाचे मुक्कामात पिंजून काढला. शेजारीच असलेल्या तळ्यातील थुई थूई उडणारे कारंजं. खेळाची मैदाने लहान मुलांची खेळण्याची निर्मळ जागा.

सायंकाळी बागेत फिरावयास येणारी आमच्या सारखीच आलेली उडती पाखरं भेटल्याने गप्पाही रंगल्या.

येथील मुक्कातील अखेरच्या सायंकाळी सभोवताली फेरफटका मारताना.

येथील घरे जणू शोरुम मधील चकाचक गाड्या अन् सभोवतालची हिरवी गार झाडे म्हणजे प्राणवायुचा अखंड स्रोतच. हिरवळीवर स्वच्छंद पणे उड्या मारणारा ससा तसेच तुरुतुरू पळणारी खार पण भेटायला आली.

सुर्य अस्ताला जातानाचा मोहक देखावा मोबाईल मध्ये बद्ध केला.

सभोवताली भरगच्च झाडी , अंधार पडू लागलेला सायंकाळची वेळ तशी उदासवाणी भासते पण त्याची भरपाई झाली.

गवताच्या व झाडाभोवती चमकू लागलेल्या अंधारातील दिव्यांच्या असंख्य काजव्यानी समोर दत्त म्हणून लपंडाव खेळू लागली.

तो प्रसंग मोबाईल फोन मध्ये बंदिस्त करण्याचा थोडा प्रयत्नही केला

आणि ते द्रुष्य पाहून. कट्यार मधील. शंकर महादेवन यांचे -

मन मंदिरा. तेजाने उजळून घेई साधका -हे स्मरले.

शहरात पाहावयास न मिळणारे हे दुर्मिळ दृश्य येथे पाहावयास मिळाल्याने ते गाणे गुणगुणतच प्रसन्न मनाने १०० नंबरी असलेल्या Ashton Brook या सुंदर घरकुल परिसराचा हृद्य असा निरोप घेतला.

अशा प्रकारे नातीननी मावशीच्या मायेचा तसेच रूचाच्या मैत्रीचा अनुभव घेतला व घरी बनवलेल्या कुकीज ची शिदोरी घेवून आम्ही परदेशातील नातीच्या आजोळचाच जणू निरोप घेत कॅलिफोर्निया कडे उड्डाण केले.

****

डॉ. अरविंद वैद्य

SANNYVALE

USA

12 July 2019

## फिनिक्स भरारी -

****

ग्रीक -जपान -चीन - पौराणिक कथेमध्ये ‘‘फिनिक्स ‘‘हा गरुड सदृश्य पक्षाचा उल्लेख आढळतो. त्यानुसार हा पक्षी दीर्घायुषी असतो. याचा सूर्याशी सम्बन्ध असतो

आगीच्या ज्वाळात हा स्वतःला झोकून देतो व त्याच्या राखेतून नव्या फिनिक्स जन्म घेतो.

शेक्स पिअरच्या " हेन्री ८वा ' नाटकात देखील त्याचा संदर्भ दिसून येतो. आपल्या लाडक्या लेकीला प्रोत्साहन देण्यासाठी तो एक कविता वाचून दाखवितो त्यावरून प्रेरित होऊन ती पुढे एलिझाबेद राणी होते.

Nor shall this peace sleep with her; but as when The bird of wonder dies, the maiden phoenix,

Her ashes new create another heir

As great in admiration as herself;

So shall she leave her blessedness to one,

When heaven shall call her from this cloud of darkness,

Who from the sacred ashes of her honour

Shall star-like rise as great in fame as she was

And so stand fix'd.

थोडक्यात प्रतिकूल परिस्थितीतून नव्या जोमानें उठून जो बाहेर पडतो अश्या साठी-''फिनिक्स भरारी ''हा शब्द प्रयोग वापरण्यात येतो. जपानी लोकांनी हिरोशिमा -नागासाकी बॉम्ब हल्यानंतरही अल्प कालावधीत आपले वर्चस्व सिद्ध केले केले ती होती त्यांची- फिनिक्स भरारी.

हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे आम्ही सुद्धा - सनीवेल मधून साऊथ वेस्ट एअर लाईन्सच्या निळी पाठ व लालरंगाचे पोट असलेल्या विमानाने सनीवेल मधून घेतलेली दोन तासांची ' फिनिक्स ' भरारी.

निमित्त होते आमची पुतणी प्राजक्ता हीचा अरिझोना स्टेट युनिव्हर्सिटी मधील (ए एस यू ) -ग्र्याड वॉक -अर्थात एम. एस. - पदवीदान समारंभ.

अमेरिकेतील रखरखीत वाळवंट सदृश विस्तीर्ण प्रदेशात या शहराची निर्मिती झालेली आहे. ए एस यु च देखणा हिरवागार झाडांनी वेढलेला - हिरवळीचे गालिचे असलेला असा शांत परिसर व त्याचे पार्श्व भूमीवर असलेले उजाड असे हिरवळ नसलेले डोंगर.

येथे दूरवर येऊन येऊन पदवी मिळवणे म्हणजे आपल्या भारतीय परंपरेतील परिचित -सांदिपनी ऋषींच्या आश्रमातील श्रीकृष्ण - बलरामाने घेतलेले धडे , लव कुशानी वाल्मिकींकडून घेतलेले प्रशिक्षण ,द्रोणाचार्यांच्या आश्रमातील पांडवांनी केलेला धनुर्विद्देचा सराव तसेच अलीकडील रविंद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन मधील गुरुकुल प्रशिक्षणाचे आधुनिक रूपच भासते दुसरे काय.?

येथील दुमजली,- ग्रंथांनी ओसंडून वाहणारी " हेडन लायब्ररी “लेक्चर हॉल्स - मिटिंग केबिन्स -एकांतात अभ्यास करावयाच्या स्वतंत्र क्युबिकल्स. ठिकठिकाणी कॉप्युटर

असलेली टेबल खुर्च्यांची व्यवस्था. प्रांगणात मन प्रसन्न करणारे व पाण्याचे तुषार अंगावर उडविणारे थुई थुई नाचणारे कारंजे. अभ्यास करून कंटाळा आल्यानंतर रिफ्रेश होण्यास ( पोट पूजेस ) आवश्यक असणारी कॉफी शॉप्स - स्टारबक्स फूड आउट लेट्स हि सर्व दालने तेथे विद्यार्थ्यांना भरभरून उपलब्ध आहेत.

ह्या सर्वांचा योग्य तो सदूपयोग करून ग्र्याड वॉक ला सामोरे जाण्यास सर्वजण उत्सुक असतात. हीच तर असते त्यांच्या उज्ज्वल भविष्याची नांदी.

येथील प्रांगणात फिरताना प्रदुषण रोखण्यासाठी सायकलचा मुक्त वापर विद्यार्थी करताना दिसतात. सायकली ठेवण्यास स्ट्यांड ची व्यवस्था असते. पण येथेही आधुनिक कंस व रावण कुलूप बंद सायकलींची चाके , सीट्स पळवून नेण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येतात. असो.

अश्या या देखण्या वातावरणातील प्रशस्त हॉल मध्ये उद्या सायंकाळी पदवीदान समारंभ होणार आहे. एखाद्या लगीन घाई प्रमाणेच येथील सारा माहोल दिसून येत आहे. त्याची

उत्सुकता आहेच. त्या साठी पुढील लेखाच्या प्रतीक्षेत राहावे लागेल. त्या पूर्वीचा हा मध्यानंतर..!

*****

( टेमपी ) फिनिक्स

अरिझोना

मे ११  २०१७

# . ऋतू.

*****

सही -हीच माणसाची ओळख असते. तसेच ऋतू म्हणजे निसर्गाची ओळख.

लहानपण -तरुणपण -म्हातारपण -अन वानप्रस्थापण -असे ढोबळमानाने माणसाच्या आयुष्याच्या अवस्था असतात. त्यामुळे तो काहीसा अस्वस्थ होतो खरा. पण त्यास कोणाचाही इलाज चालत नाही. यासाठी तर इंग्रजीतून- वय सांगताना त्याची बालपणा पासूनच ओळख करून दिली जाते. ओघाने त्याचीही सवय होऊन जाते. अवस्था बदल हा कधी सुखावह तर कधी मोहरून टाकणारा तर कधी निराशा-जनक असाही असतो. ऋतू सुद्धा असाच असतो. कारण बदल- हाही ऋतूचा आत्मा असतो. त्या शिवाय त्यात ना राम -ना- चार्म.

निसर्ग -हे एक अजब - रसायन आहे- ऋतूंचे. कधी ते -भावते ,कधी -रुसते ,कधी- फुगते ,कधी -भुलविते तर कधी मोहोरविते. अन कधी होत्याचे नव्हतेही करून टाकते.

कवींचा तर हा जिवलग सखाच नव्हे उजवा हातच. त्या पासूनच त्यांना स्फूर्ती आणि दिगंत अशी कीर्तीही मिळते.

. -ऋतू हिरवा -ऋतू बरवा -

पाचूचा वनी रुजवा -

युग विरही हृदयावर , सरसरतो मधु शिरवा -

नभी उमटे इंद्रधनू मदनाचे चाप जणू.

गगनाशी धरणीचा , जुळवितसे सहज दुवा. ( शांत शेळके -श्रीधर फडके -अशा भोसले )

अश्या चपखल शब्दात त्यांचे वर्णन -शांताबाईंनच्या लेखणीतून झरझरते अन श्रीधर फडक्यांच्या संगीत साजाने, आशा ताईनच्या गळयातून' सुस्वरासह झिरपते'. अन भाव गीताचा साज ल्याते ते उगीच नाही.

ऋतुराज मनी आला. ऋतुराज वनी आला.

नवथर शीतल सुंदर-' निर्झर 'त्यात रंगुनी गेला. -( विद्याधर गोखले -प. राम मराठे ,प्रभाकर भालेकर -मधुवंती दांडेकर )असे गाणे.''मदनाची मंजिरी''अश्या सुमधूर - नाट्य गीताने एखादी -हरणी त्यातील- शब्द बाणांनी घायाळही होऊन जाते ते वेगळेच.

तर असे हे- ऋतुराज आपल्या सग्या सोयर्यांनसह बहुरुपाने पृथ्वीवर अवतरतात ते -

-हिवाळा-उन्हाळा -पुन्हा पावसाळा-या सृष्टी चक्रात बसूनच. विविध मनमोहक रंगी शालू. पाचू अन निर्झरांच्या बटा स्वैरपणे उडवीतच दऱ्या खोर्यांना हिरव्या गार शालुनी नटवित ,सजवीतच धरणीवर अवतरतात.

परदेशात हेच ऋतू - -फॉल-विंटर-ऑटम -समर -या अनोख्या नावात अन अदभूत रुपात अवतरतात अन सृष्टीतील सौंदर्याला नेत्रदीपक असा बहार आणतात. पावसाळा त्यांचे लेखी स्वतंत्र ऋतू नसतोच. त्यांचे ठिबक सिंचन वर्षभर -चालूच असते. त्यानेच येथे - शुद्ध हवा - अहोरात्र वीज-अन मुबलक पाणी अशी सुजलाम सुफलाम , चकाचक -असा

भूमीवरील-स्वर्ग अवतरलेला पहावयास मिळतो. अन तन मनाला प्रसन्न करत रहातो.

फॉल - झाडांना त्यांचे रंगीबेरंगी वसने लेऊन ती मनमोहक करतो. त्यानंतर निष्पर्ण अशी अवस्थाही आणतो अन ओकी बोकीही करतो.

जन पळभर म्हणतील हाय हाय -

मी जाता राहील कार्य काय-? अशी अवस्था होऊन जाते.

पण त्याची भरपाई अंगावर पांढरे शुभ्र असे बर्फ भिर - भिरून त्यावर मोत्यांचा साज चढवितो. थोड्याच दिवसात तपश्चर्येला बसलेल्या पांढर्याशुभ्र दाढीवाल्या साधूचे रूप घेतो. अन तपश्चर्या फळाला येताच पुन्हा हिरव्या पानांच्या मेंदीने अन रंगीत फुलांनी सर्वांग बहरून टाकतो व पांढऱ्या रंगाचाच मी अविष्कार असल्याची जाणीवही करून देतो झाले.

वसुंधरेस हेच ऋतू -जादुगार बनून - नख शिखांत मोहरून टाकतात. तरू तळी भरून अन भरून जातात. काळी

माती हिरवागार शालू लेवून फुला-फळांनी खुलून जाते. माणसासही रीझवितात -मोहवितात. एखाद्या रागावलेल्या क्षणी होत्याचे नव्हतेही करून टाकतात. पण माणसावरील अतूट प्रेमाने -

ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी -

भेटीत तुष्टता मोठी.

या न्यायाने त्यांचे जवळ येतो ,बसतो. हसतो आणि -कधी धुसफुसतोही. पृथ्वीच्या भ्रमंतीत तिलाही साथ देत. सूर्य -चंद्रांसह लपाछपीचा खेळ खेळतच रहातो, अहोरात्र -

माणसानेच दिलेल्या -आराम हराम है -! या मंत्राला जागून पण -आपल्याच तंत्राने चालत असतो -चालतच रहातो.

न जन्मदेचे ऋण फिटे -!-ह्याची जाण ठेवून.

१५ सप्टेंबर २०११

गुरुवार

**अमेरिकेतील- आठवणींचा-' गाशा '- गुंडाळताना** -

****

अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेऊनी जाते.

दोन दिसांची रंगत -संगत दोन दिसांची नाती -.

कुठे कुणाच्या घडल्या भेटी -

गीत एक मोहरले. ओठी

त्या जुळल्या हृदयांची गाथा सूर अजुनही गाती -

( मंगेश पाडगावकर -यशवंत देव -सुधीर फडके )

स्वप्नवत -वाटणाऱ्या अन -मुलांनी घडविलेली - "अमेरीका -सफर". २०११. आज शेवटच्या टप्प्यावर येवून थांबली आहे ,अन काऊन्ट डाऊनही संपला आहे.

येथे अनुभवलेले - स्वा-नुभव -भेटलेले सुहृद -पाहिलेले अवर्णीय असे निसर्ग सौंदर्य -व माणसांचे- जीवन सुखमय करून टाकणाऱ्या ,-अचंबित करावयास लावणाऱ्या प्राथमिक सुखसोई अन संपूर्ण प्रवासात - हमखास धक्का देणारे -खड्डे

न भेटल्याने. बसलेला आश्चर्याचा -सुखद धक्का. बसलाच की शेवटी. असो धक्काच होता तो. पण सुखावह असा.! हे सर्व , आता ‘‘स्मृतींच्या पानामध्येच ‘‘पहावयास अन वाचावयास मिळणार आहे. ‘‘गत स्मृतींची पाने चाळताना-! पुढे असेच कधी तरी.

याच साठी -'दिसामाजी काही तरी लिहित जावे. या समर्थ रामदासांच्या उक्ती प्रमाणे आचरणही करणे झाले.

आपल्यासी जे जे ठावे ते ते -दुसर्यांना सांगावे -शहाणे करावे सकल-जन  असा -असमर्थ-का होईना अल्पसा प्रयत्न करून पहाता आला. अन -"अमेरीका सफर - टाइम्स-ची तात्पुरती आवृत्ती ई-मेल द्वारे काढून -जी मेल द्वारे सहजपणे आपल्या घरातील पी सी पर्यंत पोहोचविता आली चक्क एका क्लिक द्वारे,. गुगल मार्फत त्याने मतीही गुंग होते कधी कधी.

मागे वळून पहाताना - २००७ मधील- छोटी चि. अनुष्का आता चांगलीच मोठी' बडबडी' -इंग्रजी बोलणारी अशी -२०११ मध्ये- बोलकी बाहुलीच झाली आहे. तिचीही अनपेक्षित -अमेरीका सफर झाली अन -नात -भेटीचा आनंद ही अनुभवला. (-२१ दिवस -गजाननाचा कृपा-प्रसाद समजून).

लहानवयातच पर्यटनाचा दांडगा अभ्यास करावयास मिळत असल्याने -तीचा पासपोर्ट- देशो देशीच्या ठ्श्यानी तर- आमचे मन- तृप्तीच्या समाधानाने भरत चालल्याचे जाणवत आहे. प्रत्यक्षात -दूरवर पसरलेली जगाची टोके या- पर्यटनाचे निमित्ताने - क्षणात जवळ येत आहेत हेही जाणवले.

अमेरिकेच्या या - सफरीने जगाचे -पश्चिम टोकाच्या-' पूर्वे कडील ' सूर्योदय पहाता आला. नायगरा धब-धब्याचा जगभर असलेला ' 'दबदबा' अनुभवला. न्युयॉर्क -स्टयाचू ऑफ लिबर्टी, वाशिंग्टन मोन्युमेंट - व्हाईट हाउस- स्मिथसोनियन म्युझियम्स- लुरे केव्ह्ज -बाल्टी मोअर फोर्ट - सिटी -वर्ल्ड ट्रेड सेंटर -एम्पायर स्टेट -अश्या जगप्रसिद्ध -वास्तू मान-उंचावून पाहण्याचा -अपूर्व -असा योग आला व एका नव्या-''जगाची तोंड-ओळख झाली.

हंडन - व्हर्जिनिया जवळील- मेरील्यांड -अना पोलीस येथील''यु. एस. ए. नेव्हल अकादमी"चा सागरी पसारा क्रुझ वर फेरी घेवून पहिला. हर्शीज-येथील चोकलेट फ्याक्टरी - आणि व्हर्जिनिया सफारी-मधील वन्य प्राण्यांचे मुक्त जीवन अनुभवताना बाल जगतात रमून गेलो. न्याचरल ब्रिज ची भव्य

कमान पाहून निसर्गाची ' स्थापत्य अभीयांत्रिकी 'पाहून चक्रावूनही गेलो.

पूर्व दिशेलाही- -पुन्हा उत्तर व दक्षिण अशी दोन टोके असतात. त्यामुळे दक्षिणे कडे मोर्चा वळविला. ओर्ल्यान्डो - मधील-''डिस्ने वर्ल्ड -सी वर्ल्ड -युनिव्हर्सल स्टुडीओ''- नात अनुष्कासह सहकुटुंब पहिला. त्या पलीकडील ''केनेडी स्पेस सेंटरला ''भेट देऊन- चान्द्र्यानाचा आभासी का होईना अनुभव घेतला. धन्य झालो. न भूतो न भविष्यति असाच तो-सुवर्ण क्षण होता.

' अर्नेस्ट हेमिंग्वे'-या महान लेखकाचे दृष्टीने - ' प्यारडाईज '-असलेल्या-कि-वेस्ट पर्यंत त्यांचे सागरकिनारी असलेल्या घरापर्यंत मजल मारली व लिखाणाची नवी स्फूर्तीच मिळाली.

येथे अमेरिकेत दारापुढे-रांगोळी काढण्याची- परंपरा नाही. पण घरासमोरील रस्त्यावर येताच, सुरु होणारे- पांढरया - पिवळ्या रंगांच्या पथदर्शक खुणांची- रेखावली- सतत आपल्या पुढे पायघड्या पसरीतच असते. रस्ता वळेल तशी- झोकात वळणे घेणारी सुस्पष्ट अशी रस्त्याची दुभाजक रेखावली

सुद्धा सुंदर रांगोळी प्रमाणेच मन लुभावते. खंडित तर कधी अखंडित पळणाऱ्या रेघांची -' म्यारेथोन ' प्रवासात अगदी शेवटच्च्या ईप्सित टप्प्या पर्यंत आपला हात आणि साथ सोडीत नाही. त्यामुळे एकटेपणाही भासत नाही. एकसे भले दो-ची जाणीव ही होत रहाते अधून मधून कार मधील सुमधूर गाण्यांचे साथी प्रमाणे.

दिनांक -९ - आक्टोबर २०११च्या-' कोजागिरीपूर्व- रम्य रविवार सायंकाळी'-

येथील- दुर्गा टेम्पल ला भेट दिली. एकाच भव्य हॉल मध्ये सर्व देवादिक ठाण मांडून आपल्या भक्तांची- त्यांच्या कल्याणासाठी आतुरतेने वाट पहात स्थानापन्न झालेले दिसले. येथेही २१ डॉलरची नारळ -नैवेद्याची पूजा थाळी होतीच. भाविक आपले भक्ती भाव देवीस विनम्रपणे अर्पिताना दिसत होते. बाहेरील पटांगणात -रावण दहनाचा-मिनी सोहळाही पहावयास मिळाला. दशानन ' रावणाने 'येथेही ' अटलांटिक महासागर 'ओलांडून आपले स्थान अढळ केल्याचे आढळले व त्याचा महानतेची प्रचीती आली. असो एकंदरीत पृथ्वी गोल

असल्याचा आणखी एक पुरावा मिळाला व भौगोलीक सत्याची पडताळणी झाली.

श्री. मार्कुस डाबरे कुटुंबीयांकडे -स्नेहपूर्ण -सेंड ऑफ कम डिनरचे आयोजन होते. सौ. क्याथरीन वहिनी -धाकटा मुलगा सुनील -सौ. रोविना त्यांच्या मुली एमिली ,सोफिया. जेष्ठ मुलगा विजय त्याची मुले क्यारलीन -व जस्टीन सर्वांच्या प्रेमळ सहवासातील अमेरीका वास्तव्यातील या सफरीच्या भेटीचा -शेवटचा क्षण गोड व अविस्मरणीय असाच झाला.

लिटल करंट ड्राईव्ह मधील - अल्पश्या वास्तव्यात' त्र्याव्होर्स रन 'मधील प्रांगणात आमच्या जेष्ठानच्या गप्पा रंगल्या -मुलांची मैत्री झाली -त्याच प्रांगणात आमच्या नाती -एमिली -सोफिया व अनुष्का यांच्याही बाललीला रंगल्या व येथील स्मृतींनी आमच्यातील स्नेह -प्रसन्न -झाला. योगायोगाने दोन्हीही कुटुंबे हा परिसर सोडून लवकरच -अन्यत्र रहावयास जात आहेत. जणू आमची' भेट' होण्याचाच योग यायचा होता. असो आम्हाला आता पुन्हा अमिरिकेत यायचा-योग आला तर एक हक्काचे घर तयार झाले आहे कारण सुनील

येथून नव्या- स्वतःचे घरात रहावयास जात आहे. तर मिलिंद येथून जवळच लहान फ्ल्याट मध्ये रहावयास जात आहे.

येथील मुक्कामात नव्या देशात -मिलिंदचे मित्र -स्वप्नील कार्येकर -तुषार व सौ. ईशा गोखले (यांचे लग्नही येथेच झाले ) बडोद्याचे श्री व सौ. डॉ. कुलकर्णी(ईशाचे आई वडील ) -सतीश -संगीता -त्यांची मुलगी रिचा -खेडकर -गौरी -श्वेता -ललित -सचिन -रुचा -अम्रिता -जय व डाबरे कुटुंबीय-गोडबोले नव परिणीत जोडपे -फोंडा व अरुणेश -असे नवे-' गणगोत ' जमले आणि भेटले. आणि एक छान असे -२०११ चे मराठी भाषिक -'स्नेह संमेलन' हंडन व्हर्जिनिया येथे -यशस्वीपणे पार पडले - तेही अध्यक्ष पदाच्या - वाद-विवादा विना.

येथील निसर्गही आता आपला चेहरा मोहरा बदलून -फॉलची - रंगपंचमी -खेळण्याच्या मूड- मध्ये -रंगू लागला आहे.

आठवणी दाटतात-!- धुके जसे पसरावे -/

जे घडले ते सगळे-सांगा कसे विसरावे -?

फॉलच्या रंगीबेरंगी उधळणीचे पश्चिमेकडील - विहंगम दर्शन डोळे भरून पहात व स्मृतीत साठवतच आम्ही आता दिनांक -१२ आक्टोबर २०११च्या -लुफ्तांझाच्या सायंकाळच्या ६च्या फ्लाईटने- झुरीच मार्गे माय देशाकडे अर्थात- पूर्वेकडच्या”आपल्या भारतभूमीकडे “झेपावत आहोत. लवकर समक्ष भेटूच.

.

काहीना -”स्वानुभवाचे हे - कथन -कीर्तन “-भावले असेल -ओळखीचे वाटले असेल -कांहींचे मनोरंजनही झाले असेल -काहीना मार्गदर्शक वाटले असेल तर. काहींना- ”अनाहूत आलेल्या पाहुण्या प्रमाणे “कधी. खुपलेही असेल. बोअर सुद्धा झाले असेल- प्रदीर्घ अश्या वर्णनाने. त्यातही काही अनावधानाने “उणे दुणे”राहिले असेलच की.!

असो -पिंडे पिंडे मतिर्भिन्ना - हेही असतेच ना -!. तरीही - मजा आली-त्यांनी ते मनमोकळे पणाने कळविले सुद्धा. खूप आनंद झाला.

काहीजण -' मौनं सर्वार्थ साधनं ' -च्या शांती पाठात मग्न असल्याचे ही जाणवले. असो ,पण त्यानेच

पुन्हा पुन्हा- लिहिण्यास, नव- नवीन उर्जा मिळाली. इ-मेल् चे पेन मधील शाई सुद्धा. अजून शिल्लक आहेच.

पण -कुठेतरी - द-एन्ड - असतोच ना.!

असेच भेटत राहू -अधून मधून वर्षणाऱ्या- ‘‘वळवाच्या पावसाप्रमाणे"- आनंदाचा शिडकावा घेत आणि देत राहू.

अशा आभासी भेटीच्या आठवणीत भिजत राहू.!

( भारत- इंग्लंड - अमेरीका )

' कोजागिरी '

अश्विनी * पोर्णिमा

११ ,आक्टोबर २०११

## दुर्ग दुर्घट भारी

## आसेतूहिमाचल

## सुंदर हा देश

### त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ. संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा. esahity@gmail.com